शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

आज मायानगरी

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २७ । अंक १७९ । शनिवार, दि. २२ जून २०२४ । पाने १०+४ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू

**अलिबाग ।** मुंबईतील रिझवी महाविद्यालयातील वर्षासहलीसाठी आलेल्या ४ विद्यार्थ्यांचा बडून मृत्यू झाला. खालापूर तालुक्यातील वावर्ले येथे असलेल्या छोट्या धरणात ही घटना घडली. रिझवी कॉलेजमधील ३७ विद्यार्थी खालापूर तालुक्यातील सोंडई येथे ट्रेकींगसाठी आले होते. ज्यात १७ मुलींचाही समावेश होता. ट्रेकींग आटोपल्यानंतर सर्वजण धावडी नदीवर असलेल्या छोट्या बंधाऱ्यावरील सांडव्यात डुंबण्यासाठी उतरले. मात्र वर्षासहलीचा आनंद लुटत असतांना यातील चार जण बुडाले.


## पुढच्या ५ दिवसांत मुसळधार

**पुणे ।** केरळ, कर्नाटक, कोकण, गोव्यात पुढील पाच दिवस मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. किमान २० राज्यांमध्ये पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. नैऋत्य मान्सून आता महाराष्ट्र, विदर्भाचा उर्वरित भाग, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल, काही भागात पोहोचला आहे. येत्या तीन ते चार दिवसांत मान्सून गुजरात, उर्वरित महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशात पोहोचणार आहे.

**विनम्र अभिवादन!**



संत कबीर यांची जयंती.



गुरु गोविंदसिंह यांची जयंती.

## भाजपात लवकरच पुनरागमन : महत्त्वाची जबाबदारी मिळणार

# खडसेंना रक्षाकवच!

## नाथाभाऊंनी सुनेसह घेतली अमित शाहांची भेट

**नवी दिल्ली ।** आ.एकनाथराव खडसे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा एकनाथराव खडसेंच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांनी जोर धरला आहे. नवनिर्वाचित खासदार अन् केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आणि एकनाथराव खडसेंनी गुरुवारी रात्री अमित शाहांची भेट घेतली. एकनाथराव खडसे अजूनही भाजप प्रवेशाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे अमित शाहांसोबतची त्यांची भेट अत्यंत महत्वाची मानली जात आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीत असताना नवनियुक्त केंद्रीय मंत्री सीआर पाटील, मध्य प्रदेशचे मंत्री कैलाश विजयवर्गीय, बिप्लव देव यांची भेट घेतली. त्यासोबतच नवनियुक्त केंद्रीय युवक कल्याण मंत्री रक्षा खडसे यांच्यासह एकनाथराव खडसे यांची अमित शाह यांनी भेट घेतली. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेल्या एकनाथ राव खडसेंच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा पुन्हा रंगल्याचे पाहायला मिळतेय. एकीकडे एकनाथराव खडसे यांचा भाजप



प्रवेश अडलेला असताना, दुसरीकडे अमित शहांसोबतच्या भेटीला राजकीय वर्तुळात मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

भाजपची साथ सोडून राष्ट्रवादीत प्रवेश केलेले खडसे पुन्हा स्वगृही परतणार असल्याच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला सोडचिठ्ठी देत एकनाथराव खडसे यांनी पुन्हा भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र लोकसभा निवडणुकांचा निकाल लागला तरीदेखील आ.खडसे यांच्या पान २ वर

### खडसेंचा अन् माझा संपर्क नाही-महाजन

आ.एकनाथराव खडसे आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट झाली असेल. त्यांच्या भेटीकडे मी चांगल्या दृष्टीकोनाने पाहतो. भाजपमध्ये येण्यासंदर्भात अमितभाई आणि खडसेच सांगू शकतील. त्यांच्यात काय चर्चा झाली? याची मला कल्पना नाही. एकनाथराव खडसे यांचा आणि माझा अशात नाही आणि कशातच संपर्क नाही, अशी प्रतिक्रीया ना.गिरीश महाजन यांनी खडसे-शाहांच्या भेटीवर दिली.

## वायकरांच्या विजयाविरोधात याचिका

### अपक्ष उमेदवाराने दिले निकालाला आव्हान





**मुंबई ।** लोकसभेच्या मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातील रवींद्र वायकर यांच्या संशयास्पद पद्धतीने निवडणूक जिंकण्याचे प्रकरण आता उच्च न्यायालयात पोहोचले आहे. मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढविणारे उमेदवार भरत खिमजी शाह यांनी मुंबई उच्च न्यायालयात शुक्रवारी असीम सरोदे, विनय खातू आदींच्या मदतीने याचिका दाखल करून ४ जूनला रोजी झालेली मतदारसंघातील निवडणुकीची मतमोजणी आणि जाहीर झालेल्या निकालावर स्थगिती द्यावी, अशी मागणी केलेली आहे. शाह यांनी दाखल केलेल्या याचिकेत केंद्रीय निवडणूक आयोग, मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी, रवींद्र वायकर तसेच राज्य पोलीस महासंचालक यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाला मोकळ्या आणि पारदर्शक वातावरणात निवडणुकीचे तसेच मतमोजणीचे काम करण्यात अपयश आले आहे. ४ जून रोजी उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी नेस्को मतदान केंद्रावर झाली. सातत्याने विजयाचे दिशेने आघाडीवर असलेले अमोल कीर्तिकर यांना विजयी घोषित करण्यात आल्यानंतर टपाली मतमोजणी करण्याची मागणी वायकर यांच्या तर्फे करण्यात आली.

या निवडणुकीत पोलिसांनी त्यांची भूमिका कायद्याच्या चौकटीत पार पाडली नाही. मतमोजणी केंद्राबाहेर असलेल्या तात्पुरत्या कंट्रोल रूममध्ये तीन तास बसून ठेवल्यावर आणि नंतर वनराई पोलीस ठाण्यात नेऊन दोन तास बसून ठेवल्यावर या प्रकरणाची दखल पोलिसांतर्फे घेण्यात आली. परंतु हा संपूर्ण कालावधी रवींद्र वायकर यांचा मेहुणा मंगेश पांडिलकर याच्या ताब्यात संशयास्पद मोबाईल फोन होता. तो सतत मोबाइलवर कार्यरत होता तसेच फोनकॉल घेत होता, याकडे भरत शाह यांनीन्यायालयाचे लक्ष वेधले आहे. मतमोजणी केंद्रात बेकायदेशीरपणे वापरलेला हा मोबाईल फोन जप्त करताना कायदेशीर आवश्यकतेनुसार सील केला नाही.

## संपादकीय

### जशी मायभूमी तशी मातृभाषा

मातृभाषेतून शिक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मातृभाषेतून शिकल्याने मुलांना विषयाचे स्पष्ट आकलन होते. बहुभाषिक असण्याचा अर्थ दुसऱ्या भाषेतून शिकणे असा होत नाही. अन्य भाषा शिकणे हा त्याचा अर्थ आहे, असे मत राष्ट्रीय शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे संचालक दिनेश सकलानी यांनी माध्यमांकडे व्यक्त केले. ओडिसा भागातील दोन आदिवासी भाषांमध्ये आणि आगामी काळात १२१ भाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार केली जाणार आहेत. त्यामागचा उद्देशदेखील तोच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकारी शाळांमध्ये अत्यंत चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. मातृभाषेतून शिक्षण यावर सातत्याने विचारमंथन सुरुच असते. मातृभाषेतून का शिकावे? हे निदान शहरी भागातील पालक नक्की जाणून असतील. मुल पहिला शब्द त्याच्या मातृभाषेतूनच उच्चारते. त्याच्या कुटुंबात आणि अवतीभवती तीच भाषा बोलली जाते. मातृभाषेशी त्याचा आईच्या पोटात असतानापासूनच ऋणानुबंध जुळलेला असतो, असे म्हटले तर ते वावगे ठरु नये. त्याच भाषेत त्याने शिक्षण घेणे ही खरे तर आपसूकच घडणारी प्रक्रिया आहे. याआधी घडतही होती. तथापि अचानक पालकांचा इंग्रजी भाषेकडे ओढा पान २ वर



कोईम्बतूर । आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्त भारतीय लष्कराच्या जवानांनी कोईम्बतूर येथील आदियोगी, ईशा योग केंद्रात योगासने केली.

## काश्मीरमध्ये लवकरच महाराष्ट्र सदन

**मुंबई ।** राज्य सरकारच्या वतीने काश्मीरमध्ये महाराष्ट्र सदन उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. त्यादृष्टीने काश्मीरमध्ये जमीन खरेदी करण्यासाठी विभागाच्या वतीने ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद केल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या काश्मीर दौऱ्यात काश्मीरमध्ये महाराष्ट्र सदन उभारण्याची घोषणा केली होती. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने पुढील कार्यवाही सुरु केली आहे. जम्मू आणि काश्मिर सरकारने बडगाम जिल्हयातील इच्चगाम तालुक्यातील २.५० एकर जमीन महाराष्ट्र सरकारला महाराष्ट्र भवन बांधण्यासाठी प्रदान केली आहे. जमीन खरेदीची प्रक्रिया महाराष्ट्र आणि जम्मू-कशिमर सरकार यांच्यावतीने पूर्ण झाली आहे.



धुळे । शहरातील काळूबाई मंदिरातील तृतीयपंथीयांनी परंपरेला छेद देत सुवासिनींचा सण असणारा वटसावित्री पौर्णिमा साजरी केली. यावेळी तृतीयपंथी, जोगतींनी एकमेकांचे औक्षण केले. तसेच वडाला सात फेरे मारत मनोभावे पूजा-अर्चा केली.

## जामनेरात तणाव; जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**जळगाव ।** जामनेर पोलीस ठाण्यावर गुरूवारी चिंचखेडा येथे नऊ दिवसापूर्वी एका चिमुकलीवर अत्याचार करून खून करणाऱ्या फरार आरोपीला आणल्याच्या अफवेवरून जमावाने पोलिसांवर दगडफेक केली. या घटनेमुळे जामनेर शहरात तणाव निर्माण झाल्याने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी आज जामनेरला भेट दिली. चिंचखेडा घटनेतील आरोपी सुभाष भिल याला एलसीबी पथक व भुसावळ पोलिसांनी अटक करून त्याला ताब्यात घेऊन जळगाव येथे रवाना केले. मात्र सदर आरोपीला जामनेर पोलीस स्टेशनला आणल्याची अफवा वाऱ्यासारखी पसरली व रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास दीड ते दोन हजार लोकांचा जमाव लाठ्या- काठ्या, दगड -धोंडे घेऊन पोलीस स्टेशनवर चालून आला. जमावाने पोलीस स्टेशनची तोडफोड करून पोलिसांवरही हल्ला चढवला. यात आठ ते दहा पोलीस गंभीरित्या जखमी झाले. या घटनेनंतर जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि पोलीस अधीक्षक डॉ. ए. रेड्डी यांनी जामनेर शहराला भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच जामनेर मध्ये तणावपूर्ण शांतता असून अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर पवार या जामनेरमध्ये तळ ठोकून परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत.

सविस्तर वृत्त/आतील पानात

## ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही-मुख्यमंत्री

**मुंबई ।** ओबीसी नेत्यांचे शिष्टमंडळ आणि राज्य सरकार यांच्यातील बैठक संपली असून त्यामध्ये काही महत्त्वाच्या बाबींवर एकमत झाले आहे. ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागू देणार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ओबीसी नेत्यांना आश्वासन दिले असल्याचे राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. कुणालाही खोटे कुणबी दाखले दिले जाणार नाहीत असेही मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्याचे भुजबळ म्हणाले. तसेच मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मनोज जरांगे यांच्यासोबत समोरासमोर चर्चा व्हावी अशी ओबीसी नेत्यांची भूमिका आहे. ओबीसी नेते आणि मनोज जरांगे यांना समोरासमोर बसवून चर्चेतून तोडगा काढण्याची भूमिका ओबीसी नेत्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर व्यक्त केली. काही जण वेगवेगळे दाखले घेऊन लाभ घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे हे दाखले आधारकार्डला जोडण्याची संकल्पना ओबीसी नेत्यांनी मांडली. त्यामुळे कुणीही एकापेक्षा जास्त प्रवर्गात आरक्षणाचा लाभ घेऊ शकणार नाही असे छगन भुजबळ म्हणाले.

### उपसमितीची स्थापना करणार!

मराठा समाजाच्या समन्वयासाठी जशी नेत्यांची उपसमिती आहे तशीच ओबीसी उपसमिती स्थापन केली जाणार असल्याची माहिती छगन भुजबळांनी दिली. मराठा समाजाच्या विकासासाठी जितका निधी मिळतोय तितका निधी आता ओबीसी समाजासाठीही दिला जाणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती भुजबळांनी दिली. तसेच लक्ष्मण हाके यांनी उपोषण संपवावे यासाठी ओबीसी नेते जाणार असल्याचे भुजबळांनी सांगितले.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1750 |
| नवती (२) | : 1600 |
| पिलबाग | : --- |
| वापसी | : --- |

**मिश्कीली**





## मुक्ताई पालखीचे बुलडाण्यात जंगी स्वागत



**बुलडाणा । दीपक सुरोसे ।** मलकापूरमार्गे विदर्भात प्रवेश करणाऱ्या आदिशक्ती मुक्ताईच्या आषाढी पालखीचे आज संध्याकाळी बुलडाणा शहरात आगमन झाले. यावेळी पालखीचे हजारो बुलडाणावासीयांनी जंगी स्वागत केले.

विठूनामात तल्लीन होत सात किलोमीटरचा अवघड राजूर घाट करीत पार केला. शंभर दिंड्यातील वारकरी, भाविक घाटावरील बुलडाणा नगरीत दाखल झाले.

हजारो बुलडाणेकरांनी शुक्रवारी (दि. २१) सायंकाळी पालखी सोहळ्याचे पारंपारिक उत्साहात जोरदार स्वागत केले. तब्बल १०० पान २ वर

### पालखीचा पुढील मार्ग

उद्या शनिवारी (दिनांक २२) सकाळी रामनगरात दुपारचा विसावा घेवून येळगाव येथे मुक्कामासाठी सोहळा मार्गस्थ होईल. शनिवारचे अन्नदाते शैलेश कुलकर्णी आणि प्रल्हाद किकराळे हे आहेत.रविवारी हातनी मार्गे कूच करणारी मुक्ताईची पालखी रेणुकानगरी चिखली येथे २३ तारखेला मुक्कामी राहणार आहे. यानंतर २४ला बेराळा फाटा, भरोसा फाटा,२५ ला अंढेरा फाटा व देऊळगाव मही असा पालखीचा मार्ग आहे. २६ तारखेला गणपती मंदिर आळंद येथे मध्यान्ही विसावा घेत रात्री मुक्ताईची पालखी बालाजी नगरी देऊळगाव राजा येथे मुक्कामी राहील. यानंतर मुक्ता बाईंची पायदळ वारी बुलढाण्याचा निरोप घेऊन वाघरुळ, जालना मार्गे मराठवाड्यात प्रवेश करणार आहे.

## केजरीवालांचा तुरुंगातील मुक्काम वाढला



**नवी दिल्ली ।** अरविंद केजरीवाल यांना ईडीच्या याचिकेवर निकाल लागेपर्यंत जामीन देण्याच्या ट्रायल कोर्टाच्या आदेशाला दिल्ली उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देणाऱ्या ईडीच्या याचिकेवरील निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने राखून ठेवला. ईडीच्या याचिकेवर हायकोर्टाचा आदेश २५ जूनला येऊ शकतो. गुरुवारी दिल्लीच्या राऊस व्हेन्यू कोर्टाने केजरीवाल यांना जामीन मंजूर केला होता, मात्र शुक्रवारी या प्रकरणात ट्विस्ट आला. अंमलबजावणी संचालनालयाच्या याचिकेवर सुनावणी पूर्ण होईपर्यंत दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांच्या जामिनाला स्थगिती दिली. याआधी रेव्ह्युन्यू कोर्टाने केजरीवालांना जामीन मंजूर केला होता. त्यामुळे त्यांच्या सुटकेच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या.

पुण्यासह मुंबई व जळगाव येथील शाखेतही **उद्या जळगावात** पुण्याचे नाडीतज्ञ वैद्य प्रविण पाटील M.D.(Ayu), आयुर्वेद वाचस्पती, आयुर्वेदाचार्य, पुणे

जळगाव शाखा **रविवार,** दि. २३ जून २०२४ रोजी डॉ.उभाड पाटील मुलांचे व डोळ्यांचे हॉस्पिटल तेली समाज शॉपिंग कॉम्प्लेक्स, जळगाव | वेळ- स.१० ते संध्या ६

**सर्व विकारांसाठी नाडी परिक्षनाने परिपूर्ण आयुर्वेदीय उपचार**

● सुदृढ व निरोगी आपत्य प्राप्तीसाठी● हृदयविकार (रक्त वाहिन्यांमधील ब्लॉकेज) ● पाठीच्या मणक्याच्या विकतीसृाठी● स्त्रीयांचे/बालकांचे विकार ●गर्भसंस्कार ●त्वचारोग/सोरयसिस ● संधिवात/ आमवात● स्थूलपणा वजन वाढविणे ● मधुमेह (डायबेटीस) ● किडनी फेल्युअर, मुतखडा ● जुनाट सर्दी/ दमा आम्लपित्त व पचनाच्या सर्व तक्रारी. ● (PCOD) मासिक पाळीच्या तक्रारी ● गर्भसंस्कार-गर्भाच्या उत्तमवाढीसाठी तसेच सदृढ व निरोगी संततीसाठी महिने ९ उपचार.● उंची वाढविणे सल्ला

॥ श्री विश्व आयुर्वेदामृत ॥ आयुर्वेदाचार्य वैद्य प्रविण पाटील

आयुर्वेदीय पंचकर्म चिकित्सालय व संशोधन केंद्र, पुणे. For Appointment : 9423252791 / 9970266600

● पुणे मुख्य शाखा- सोम ते शनि ● जळगाव येथे २ऱ्या व ४थ्या रविवारी ● मुंबई येथे ३ऱ्या रविवारी

Ayurveda Cure with Care | WATCH संस्थेमार्फत जनहितार्थ

## भरड धान्य ज्वारी खरेदीचा शुभारंभ

पाळधी ता. धरणगाव । वार्ताहर अण्णासो.साहेबराव पाटील सहकारी फ्रूट सेल सोसायटी पाळधी व महाराष्ट्र राज्य सह मार्केटिंग फेडरेशन मार्फत पणन हंगाम २०२३/२४ किमान आधारभूत किंमत अंतर्गत भरड धान्य ज्वारी खरेदी शुभारंभ आज शासकीय गोडाऊन धरणगाव येथे नायब तहसीलदार सातपुते साहेब यांच्या हस्ते करण्यात आला, त्या प्रसंगी फ्रूट सेल सोसायटी चे चेअरमन प्रा.एन.डी.पाटील, व्हा.चेअरमन श्री.रवींद्र भीलाजी पाटील,संचालक श्री बाळकृष्ण बोरसे, गोडाऊन प्रमुख श्री.राजपूत साहेब,शेतकरी मनोज पाटील,श्री. संदीप पाटील,व्यवस्थापक श्री.पी. जी.चौधरी उपस्थित होते.प्रथम खरेदी सन्मान मिळालेले शेतकरी



श्री.गोकुळ मोतीराम चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.

संस्थेचे चेअरमन प्रा. एन.डी. पाटील यांनी ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट जिल्ह्याला व तालुक्याला वाढउन मिळावे म्हणजे सर्व शेतकरी बांधवांना न्याय मिळेल अशी मागणी केली. ज्वारी खरेदी हमी भाव रू ३१८० आहे व बाजार भाव रू.२२००/२३०० पर्यंत आहे.

शेतकरी वर्गाला न्याय मिळण्याकरिता जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्री.गुलाबराव पाटील यांनी लक्ष घालून जिल्ह्याचे ज्वारी खरेदी उद्दिष्ट शासनाकडून वाढउन मिळावे अशी अपेक्षा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची आहे.


## निधन वार्ता

### मंगलबाई सोनवणे; आज अंत्ययात्रा




**गुढे ता.भडगांव । वार्ताहर ।** येथून जवळच असलेल्या सायगांव ता.चाळीसगांव येथील रहिवासी ह.भ.प.गं.भा.मंगलबाई श्रीपतराव सोनवणे (वय ९१) यांचे दि. २१ रोजी दुपारी २ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि.२२ रोजी सकाळी १०:३० वाजता राहत्या घरुन निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्या उंबरखेड येथील सर्वोदय शिक्षण प्रसारक संस्थेचे सहसचिव सुरेशराव श्रीपतराव सोनवणे व इंजि.किशोर श्रीपतराव सोनवणे यांच्या मातोश्री आहेत.

### भगवानदास चुनीलाल पारेख



**जळगांव । प्रतिनिधी ।** येथील जुना खेडी रोड, श्रीराम चौक, गीताई नगर, ज्ञानदेव नगर जवळील रहिवासी भगवानदास चुनीलाल पारेख (वय ७७) यांचे शुक्रवार, दि. २१ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज शनिवार दि. २२ रोजी सकाळी ८ वाजता राहते घरून निघून नेरी नाका वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार होतील. त्यांचे पश्चात पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते पंकज, पराग, पियूष यांचे वडील तर विपुल, अतुल पारेख यांचे ते काका होत.

### पीतांबर गरबड पाटील; आज अंत्ययात्रा



**सुनसगाव ता. भुसावळ । वार्ताहर ।** येथून जवळच असलेल्या गोंभी येथील सामाजिक कार्यकर्ते व विविध कार्यकारी सोसायटीचे स्विकृत सदस्य पीतांबर गरबड पाटील (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने दि. २१ जून रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. २२ जून रोजी सकाळी ९ वाजता गोंभी येथून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सूना, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते राजेंद्र व विलास पाटील यांचे वडील होते.

### सुशीला शिवराम वाल्हे; आज अंत्ययात्रा



**भुसावळ । प्रतिनिधी ।** कालकथीत सुशीला शिवराम वाल्हे (सोयंके) (वय ६४) यांचे दि २० रोजी हृदविकाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. २२ सायंकाळी ५ वाजता त्यांच्या राहत्या घरून साईचंद्र नगर नवजीवन फर्निचरच्या बाजूला तापी नदी रोड भुसावळ येथून निघेल त्या द. शि. विद्यालय निवृत्त शिक्षिका व लक्ष्मण कौतिक सोयंके भाजपा मा. शहाध्यक्ष यांच्या पत्नी होत.

### विलास चिंतामण चौधरी



**यावल । प्रतिनिधी ।** विलास चिंतामण चौधरी रा. महाजन गल्ली,यावल (वय २२ वर्ष) यांचे दिनांक २० रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्याच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी. नातवंडे,असा परिवार आहे. ते प्रशांत चौधरी यांचे वडील होते.

### इंदुबाई सुधाकर चौधरी

**फैजपूर, ता.यावल । वार्ताहर ।** आमोदा, ता. यावल येथील



रहिवासी इंदुबाई सुधाकर चौधरी (वय ६८) यांचे आज दि २१ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सून, जवाई, नातवंडे असा परिवार आहे. त्या सुधाकर चौधरी यांच्या पत्नी तर नितीन चौधरी यांच्या मातोश्री होत.

### प्रमिला भागवत पिंपळे



**फैजपूर, ता.यावल । वार्ताहर ।** भालोद ता.यावल येथील रहिवासी प्रमिला भागवत पिंपळे (वय ६८) यांचे दि २१ जून राजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, जवाई, नातवंडे असा परिवार आहे. त्या भागवत गोविंदा पिंपळे यांच्या पत्नी तर चेतन पिंपळे यांच्या मातोश्री होत.

## करमाड खुर्द येथून मुलासह विवाहिता बेपत्ता

**पारोळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील करमाड खुर्द येथील २१ वर्षीय विवाहिता आपल्या



दीड वर्षे लहान मुलांसह बेपत्ता झाल्याची घटना दि. २० रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास घडली याबाबत दि. २१ रोजी पारोळा पोलीस ठाण्यात त्या दोघांचे हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. याबाबत आज २१ रोजी दत्तात्रय बापू पाटील राहणार करमाड खुर्द यांनी पारोळा पोलीस ठाण्यात खबर दिली की, पत्नी रिंकु दत्तात्रय पाटील (वय २१ वर्ष), मुलगा देवेंद्र दत्तात्रय पाटील (वय दिड वर्ष) दोन्ही रा. करमाड खुर्द ता. पारोळा हे दि. २० जून रोजी सकाळी १० वाजता माझी पत्नी रिंकू ही घरी म्हणाली की, मी मुलगा देवेंद्र यास गावात लसीकरण करुन येते असे सांगुन कुठेतरी हरविली असुन तिचा आजुबाजुचे परिसरात व नाईवाईक यांच्याकडेस आज पावेतो शोध घेतला असता ते मिळुन आली नाही. तिचा मोठा मुलगा भावेश हा घरीच असून महिलेच्या उजव्या हाताच्या अंगठ्यावर इंग्रजीमध्ये आर गोधलेले आहे. तरी वरील दोघी मायलेक कोणास आढळल्यास पारोळा पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

पान १ वरुन ...

### जशी मायभूमी तशी मातृभाषा

वाढत चालल्याचे आढळू लागले आणि मातृभाषेतून शिकण्याचा-शिक्षणाचा मुद्दा विचारमंथनाचा बनला. इंग्रजी भाषा जागतिक भाषा मानली जाते. त्यामुळे मुलांच्या भविष्यासाठी पालकांना ती भाषा खुणावू शकते हेही एकवेळ समजण्यासारखे आहे. तथापि विद्यार्थी दशेत मुलांना विविध विषयांचे आकलन होणे, संकल्पना स्पष्ट होणे आणि शिकण्याची प्रक्रिया सहजपणे पार पडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यासाठी मातृभाषा हेच शिकण्याचे माध्यम हवे. पायाच भुसभुशीत राहिला तर त्यावर उभी राहाणारी भविष्याची इमारत पक्की असू शकेल का? हेच कदाचित सकलानी यांनाही सुचवायचे असावे. मराठी माध्यमांच्या शाळेत पहिलीपासून इंग्रजी भाषा शिकवली जाते. मराठीतून शिकताना ती भाषादेखील मुले आपलीशी करु शकतात. त्यांच्यात ती क्षमता असते. इंग्रजी भाषेची गोडी लावून त्या भाषेचे आकलन वाढवले जाणे शक्य आहे. मराठी माध्यमात शिकून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयस्तरावर भविष्य उज्ज्वल करणारी अनेक उदाहरणे लोकांच्या अवतीभवती असतात. सक्षम आणि बहुभाषी पिढी घडविण्यासाठी आणि शिकणे आनंददायी होण्यासाठी सरकारी संस्थेने पुढाकार घेतला आहे. विविध भाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार केली जात आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यात त्यावर भर देण्यात आल्याचे सांगितले जाते. गरज आहे ती पालकांनी साथ देण्याची. भविष्याच्या भीतीने मुलांचे शिकणे आनंददायी होणे पालक नाकारणार नाहीत आणि मातृभाषेतून सहज शिकण्याची संधी मुलांना देतील, अशी अपेक्षा करावी का?

### खडसेंना रक्षाकवच!

यांच्या पक्षप्रवेशाचा मुहूर्त काही ठरताना दिसत नाही. तसेच लोकसभेच्या रणधुमाळीदरम्यान गृहमंत्री अमित शहा यांनीही भेटीसाठी वेळ दिला नसल्याचे बोलले जात होते.

अशातच गुरुवारी रात्री केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आणि ज्येष्ठ नेते एकनाथराव खडसे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. नवी दिल्लीमध्ये अमित शहा आणि खडसे कुटुंबियांची भेट झाली. ही सदिच्छा भेट असल्याचे सांगण्यात येत असले तरी खडसे लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत.

### मुक्ताई पालखीचे बुलडाण्यात जंगी स्वागत

दिंड्यांचा सहभाग, रथ ओढणारी खिल्लारी बैलांची जोडी, रथाला करण्यात आलेला फुलांचा साज, विठुमाऊली आणि आदिशक्ती मुक्तबाईचा जयघोष करणारे शेकडो वारकरी, असा पालखीचा थाट आहे.

विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नि:स्वार्थ भक्त यावेळी हजर होते. त्यांनी मनोभावे पालखीचे दर्शन घेतले. अनेक स्वयंसेवी संस्था, मंडळाकडून वारकरी भाविकांसाठी ठिकठिकाणी चहापाण्याची व्यवस्था केली होती.

जुन्यागावातील हनुमान मंदिर संस्थानमध्ये पालखी शुक्रवारी मुक्कामी आहे. शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत भाविकांची दर्शनासाठी हनुमान मंदिरात रिघ लागल्याचे पहावयास मिळाले. पालखीत सहभागी वारकऱ्यांच्या रात्रीच्या भोजनाचे यजमान वसंत राव जोशी आणि सुनील पांडे परिवार आहे.

यापूर्वी संत मुक्ताबाई समाधीस्थळ श्रीक्षेत्र कोथळी येथून १८ जून रोजी प्रस्थान केले होते. दसरखेड, मलकापूर, दाताळा, यानंतर मोताळा तालुक्यातील शेलापूर, तालखेड, टाकरखेड, तांदुळवाडी, मोताळा गावांचे आदरातिथ्य घेतले.

मोताळा मुक्कामावरुन अंत्री, शिरवा, टाकळी, वाघजाळ मुर्ती या गावाचा सन्मान घेत सोहळा राजूर येथे पोहचला. तेथील ग्रामस्थांची सेवा घेत घाट चढण्याकरिता वारकरी मार्गस्थ झाले.

अर्जदार वकीलः अँड मनोहर खैरनार

**जाहिर नोटीस**

क्र.कुका/दंडप्र/SR अर्ज क्र.९४/२०२४ दि.२८/०५/२०२४

**शेख मोहम्मद अकबर अब्दुल्लाह** ...अर्जदार
**रा.सालार नगर, प्लॉट नं. ६० गट क्र. १४**
**मु.पो. जळगाव**

**विरूध्द**

**मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर**
**ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव** ...सामनेवाला/प्रतिवादी

**या प्रमाणे जाहिर नोटीस देण्यात येत आहे की,**

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्ज केलेला असून त्यात असे निवेदिलेले आहे की, त्यांचा स्वतःहाचा जन्म दि. ०१/०६/१९६२ रोजी मौजे मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर येथे जन्म झाला/झाले आहे. उपरोक्त अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंद होवून मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल करून मुख्याधिकारी नगर पंचायत मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव यांना जन्म नोंद होणेचा आदेश करण्याची मागणी केलेली आहे.

त्या अर्थी, याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर अर्जदाराचे अर्जा विरुध्द कोणाचाही काही हितसंबंध सांगणाऱ्या / दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तीना या द्वारे नोटीस देण्यात येते की, त्यानी आदेश देण्यापुर्वी काही हरकत असल्यास त्या सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन किंवा दि. ९/७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जि.जळगांव येथे स्वतः अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत अर्जदाराचे अर्जावर आदेश निर्गमीत होणेपुर्वी नावे व कार्यवाही पहावी. सदरची जाहिर नोटीस माझ्या सही व शिक्क्यांनिशी दिली असे.

**स्वाक्षरीत/-**
**(गिरीश वखारे)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी मुक्ताईनगर**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Contractors/Vendors of MSETCL. **RFx.No. 7000031515** E-tender No. **CE/EHV PC O&M ZONE/ NSK/T-12/2024-25, Particulars of Work:** Annual Transport Contract for Work of Transportation of Power Transformers, ICTs & Reactors along with Loading, Unloading, winching and dismantling from one site to another site under EHV O&M Circle, Bhusawal. **Estimated cost of work:** Rs.75Lakhs, **E.M.D.(Aprox.1% of Est. cost):**Rs75,000/-, **Tender Fees:** Rs590/-, **Sale period:**20.06.2024 to 27.06.2024, **Last Date of Submission:** 27.06.2024 upto13:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 27.06.2024 at 15:00Hrs(If possible), **Contact person:** Executive Engineer, EHV PC O&M Zone, Nashik. Phone No. 0235-2403016,01,02 Fax No. 0253-2403000, For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Chief Engineer EHV PC O&M Zone, MSETCL, Nashik.**

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २९-०४-२०२४ ०४-०५-२०२४ | ७७९ ३३ ५८० | ५६८ ९२ १३८ | २३० ५८ १८९ | ३४९ ६० १३६ | १४५ ०८ ४६८ | ३९० २४ २५७ |
| ०५-०५-२०२४ ११-०५-२०२४ | १४७ २७ २५० | ५८९ २१ ३३५ | ३५७ ५४ ३४७ | ३५९ ७९ १८० | ६६८ ०१ ४८९ | १५८ ४४ ७८९ |
| १३-०५-२०२४ १८-०५-२०२४ | २३४ ९८ ३६९ | १४९ ४० ५६९ | ३४७ ४५ २४९ | ५६८ ९६ ४५७ | २६७ ५३ ७७९ | २३८ ३० १९० |
| २०-०५-२०२४ २५-०५-२०२४ | १५६ २६ १५० | ३४९ ६६ ११४ | १३३ ७० ११८ | १३६ ०२ ५८९ | ३९९ १६ २४० | ३४७ ४२ १४७ |
| २७-०५-२०२४ १-०६-२०२४ | ३७८ ०० ५७८ | २५९ ६३ १२० | १२६ ९४ १३० | ४५५ ४४ ३३८ | ४०० ४६ १७९ | १५७ ३४ ६८० |
| ०३-०६-२०२४ ०८-०६-२०२४ | ६८८ २७ ८९० | १७८ ६३ ५९९ | ७९९ ५० १२७ | ११३ ५३ ५९९ | २६९ ६२ ३९० | २७७ ६२ ३९० |
| ०३-०६-२०२४ ०८-०६-२०२४ | ६८८ २९ ३७९ | २२३ ७५ ६९० | १४४ ९० ३८९ | ११६ ८२ २२८ | ३५९ ७० ६७७ | ५५६ ६५ २४९ |
| १७-०६-२०२४ २२-०६-२०२४ | ६६९ १५ २४९ | ४८० २५ १४० | ३५९ ७५ ७८० | २३७ २६ ६०० | २४७ ३१ १४६ | |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९-०४-२०२४ ०५-०५-२०२४ | ३४६ ३३ १३९ | १८९ ८९ १२६ | ४६९ ९५ ३५७ | ३६९ ८९ ३७९ | १७७ ५६ १६९ | २६८ ६६ १७८ | ● |
| ०५-०५-२०२४ ११-०५-२०२४ | ६०० ६४ १५८ | १७९ ७९ १३५ | ११६ ८३ ६७० | ६८८ २९ १९९ | ९०० ९४ ११२ | १२४ ७७ २६९ | ● |
| १३-०५-२०२४ १९-०५-२०२४ | २७९ ८२ १३८ | १४७ २९ २३४ | १६७ ४९ ३७९ | ४५७ ६५ १४० | ३३४ ०८ १७० | ५९९ ३७ ११५ | ● |
| २०-०५-२०२४ २६-०५-२०२४ | ११४ ६५ ६९० | १६० ७७ ३४० | १३५ ९४ ७८९ | २५७ ४३ ६७० | ६८९ ३५ २६७ | २३८ ३८ १७० | ● |
| २७-०५-२०२४ १-०६-२०२४ | ३३९ ५९ २७० | ४७९ ०२ २४६ | ९९० ८६ २५९ | ३८० १६ १७८ | ३४४ १० १३६ | ५७७ ९८ ४४० | ● |
| ०३-०६-२०२४ ०९-०६-२०२४ | १२७ ०१ १४६ | २४० ६२ १४७ | ३४९ ६९ ३३३ | ३४५ २५ २६७ | ५८८ १२ ४८० | २३४ ९४ २५७ | ● |
| ०३-०६-२०२४ ०९-०६-२०२४ | ४६८ ८६ ८८० | १६७ ४४ १५८ | १४६ १५ २५८ | ६७० ३९ ६६७ | १७८ ६० ३७० | ३४० ७८ ५५८ | ● |
| १७-०६-२०२४ २३-०६-२०२४ | ३३४ ०० २३५ | २९० १४ १५८ | ४९० ३२ १४७ | १४९ ४७ ४६७ | १२८ १० २३५ | | ● |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| २७८ ७८ ४५९ | १५५ ११ ३७९ | २५६ ३९ ९०० | ३३६ २९ १८० | २३५ ०२ १२९ | २८० ०९ ४५० |
| ४६८ ८२ १२९ | ४०० ४० २४४ | १३७ १७ ४४९ | २३९ ४३ २४७ | २७९ ८९ ४७८ | ४७८ ९१ १३७ |
| ४४५ ३५ १४० | १६७ ४३ ३४६ | १६७ ४६ ८८० | ५९० ४२ ५८९ | ३५० ८४ १५८ | १४९ ४७ ५५७ |
| ५९० ४० १२७ | २४६ २५ ६९० | ३५० ८६ ३४९ | २४९ ५७ १६० | ७८९ ४४ १३९ | २४९ ५७ २५० |
| ३८० १९ ४७८ | १७० ८९ ३७९ | १५७ ३५ २३० | १४८ ३२ ६७९ | २६९ ७६ २६८ | २३० ५९ ५६८ |
| ५६७ ८५ २६७ | ३५८ ६३ १४८ | ६८० ४३ ७८८ | १४८ ३० २८० | १३७ १५ ८८९ | ५५७ ७९ ३६० |
| ३४९ ६७ ३४० | ३६० ९५ ६९० | २३६ १५ २३० | २७८ ७२ १३८ | ३६९ ८९ १३५ | ६८० ४८ १८९ |
| ३७० ०१ २३६ | ६६८ ०० १९० | ३९० २२ २०० | १७० ८८ ५६७ | १३७ १ | |

जाहिरात छोटी किमया मोठी

## क्लासिफाईड

### नावात बदल

माझ्या सीआयएससीई बोर्ड नवी दिल्लीच्या दहावी मार्कसिटवर अफझल अहमद इफ्तिकार असे नाव असून ते पिंजारी अफजल इफ्तिकार अहमद असे असावे. यापुढे पिंजारी अफजल इफ्तिकार अहमद या नावाने ओळखले जाईल. (सीएम)

### नशिबाची परीक्षा

शनिवार २२/०६/२०२४

* मिलन डे *
१७९ २७८ ३७७ ७-४ १४९ २३९ ५८० सिंगल ७-१-०
जोड ७६-३४-२१-०८-४९

* कल्याण बाजार *
११० २८० २४४ ०-१ १४६ ४७० ३४४ सिंगल ०-३-६
जोड ०७-४१-३९-६२-१५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

गुरुवार २०/०६/२०२४
मधुर नाईट -११०-२४-१६७
धनलक्ष्मी नाईट-१८९-८७-३४०
मेन बाजार -३८०-१८-३६९
मिलन ना.-१७०-८८-५६७

शुक्रवार २१/०६/२०२४
मधुर मॉर्निंग-२५६-३५-३४८
मधुर डे-१३६-०४-६८०
मधुर नाईट-२४०-६
धनलक्ष्मी डे-५६०-१०-२२६
धनलक्ष्मी नाईट-१२७-०
मेन बाजार -
कल्याण-२४७-३१-१४६
मिलन डे -१२८-१०-२३५
मिलन ना.-१३७-१

### पाहिजेत

१०/१२वी ITI, DIPLOMA, GRADUATE मुले/ मुली जळगाव, नाशिक, औरंगाबाद, पुणे, MIDC साठी पाहिजेत. बालाजी जॉब प्लेसमेंट प्रालि जळगाव. ०२५७२२२०६४४, ९२२६१९४२९५ (व्हीएम-२०/३/२५)

### १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www. drpalve nashamuk tikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00554)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ. पालवे अॅडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... अॅडमिट सुविधा... * (विशेष) गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२५)(CRINV-2324JL/CRG00555)

### ज्योतिषी

श्रीभृगू ज्योतिष कायमस्वरूपी समाधान, कठीण समस्याओं का, ७ दिनों में तुरंन्त प्रभाव (तीन पीढ़ियों से), (गायत्री उपासक) जलगाँव,९८२२७७४१५१, ९८२३०४७८११ (व्हीएम-२०/३/२५)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघे दुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकन गुनीया, जुनाट अॅलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२५) (CRINV-2324JL/CRG00556)

### लॅपटॉप

०% फायनान्स ०% डाऊन पेमेंट घेऊनजा DELL, HP, MSI, कंपनीचे लॅपटॉप/ डेस्कटॉप गिफ्टसह, क्रिस्टल सिस्टीम स्टेडियम कॉम्प्लेक्स जळगाव ८६२६०७४४४४ (व्हीएम-२०/३/२५)

### छोटी जाहिरात संकलन केंद्र

जळगाव शहरात देशदूततर्फे छोट्या जाहिरातदारांचा सोयीसाठी खालीलठिकाणी छोटी जाहिरात संकलन केंद्र सुरु करण्यात आले आहे. तरी छोट्या जाहिरातदारांनी त्याचा लाभ घ्यावा.

**व्ही.एम.स्पेस** - एफ.१५, दुसरा मजला, गोलाणी मार्केट, ०२५७-२२४०७१०, ३२९२३७३, मो.९३७०१९७११०.
**चंचल कम्युनिकेशन** - दौलत नगर, मोहाडी रोड, मो. ९४२३९५४४६०, ९४०३४८२८९६.
**ईश्वर अॅड एजन्सी** - २३ दिनानाथवाडी, रिंगरोड. ०२५७-२२२९७००, मो.९४२२२०४६३३, ९४२२७७६४८८.
मार्केट, जळगाव. मो.७५०७७७७७०४.
**प्रदीप अॅड.** - ४३ मारोती पेठ भावसार मळीजवळ मो. ९८२२११९५१४.
**मुदंडा अॅड.** - १७९, नवीपेठ, ०२५७- २२३६७७५. मो.नं. ९८९०६७३८२०.
**श्रेयस अॅड.** - सी-१५२, पहिला मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. मो.९८६०८४९०४८.
**गणपती अॅड.** - गट नं.५८/७, प्लॉट नं. २/२, रुबी बिल्डिंग मागे, लक्ष्मीनारायण नगर, अयोध्यानगरजवळ, जळगाव. मो. ९८२३०२१०३३.
**यश अॅड.**- न्यू.बी.जे.मार्केट जळगाव मो.८७९३१३२८१५.
गोपाळकृष्ण अॅड.- कोयल निवास, श्रध्दा कॉलनीजवळ, जळगाव. मो. ८८३०८१८६७६.
**नेवे अॅड.**-रामभाऊ जोशी मार्केट, जळगाव मो.९८२३०१५६०३

**देशदूत**

जळगाव आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.७/-प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै.'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै.'देशदूत', 'देशदूत कार्यालय' ई-७ व ९ व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला नवीपेठ, जळगाव या पत्त्यावर पाठवावा.

**सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

अशोक DOLBY DIGITAL (एअरकंडिशन में) जनता की खास फरमाईशपर ता. २३ से रोजाना १२, ३, ६ व ९ बजेसे

अल्लू अर्जुन (पुष्पा फेम) जोरदार एक्शन मारधाड का जबरदस्त धमाका




मै हू लकी दी रेसर (हिन्दीमे)

कलाकार : अल्लू अर्जुन, शृती हसल, प्रकाश राज, आशीष विद्यार्थी, मुकेश ऋषी

(नोट - BMS पर online booking शुरु है.)

ता. २७ से अशोक मे जोरदार धमाका "कलकी"

थोडक्यात...



## ना.अनिल पाटील यांनी केली रसमंजू कॉम्प्लेक्सची पाहणी

**अमळनेर। प्रतिनिधी –**

शहरात झालेल्या मुसळधार पावसात भागवत रोडवरील रसमंजू कॉम्प्लेक्स मधील भिंत अचानक पडून संपुर्ण कॉम्प्लेक्समध्ये पाणी शिरल्याने व्यावसायिकांचे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान झाले होते. यासंदर्भात मदत व पुनर्वसन मंत्री नामदार अनिल भाईदास पाटील यांनी मुख्याधिकारी तुषार नेरकर यांना सोबत घेऊन पाहणी केली. पालिकेची गटार चोकअप झाल्याने हा प्रकार घडल्याचे निदर्शनास आल्याने मंत्री पाटील यांनी मुख्याधिकारी तुषार नेरकर यांना सूचना करत तातडीने ही समस्या सोडविण्याचे सूचित केले. श्री. नेरकर यांनी देखील तातडीने काम करण्याची ग्वाही दिली. तसेच मंत्री पाटील यांनी ज्या व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले त्यांनाही धीर देत त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी राष्ट्रवादी चे तालुका कार्याध्यक्ष प्रा. सुरेश पाटील यासह नागरिक व व्यापारी बांधव उपस्थित होते.

## मुक्ताईनगर येथे आज शब्दयोद्धा आत्मचरित्र प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी –**



महाराष्ट्राचे ख्यातनाम कवी गायक स्मृतीशेष प्रताप सिंग बोदडे यांचा अमृत महोत्सव जयंती उत्सव सोहळा उद्या दिनांक बावीस रोजी करण्यात आला असून त्या निमित्ताने गाणं प्रताप सिंगांच या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले असून शब्दयोद्धा या प्रतापसिंग बोदडे यांच्या स्व हस्ताक्षरातील आत्मचरित्र पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम मुक्ताईनगर येथील प्रवर्तन चौकात दि. २२ जून २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक ऋषिकेश कांबळे ,पोलीस उपाधीक्षक दौलतराव मोरे ,उपसचिव मंत्रालय मुंबई सिद्धार्थ खरात ,कामगार नेते संभाजीनगर विलास जगताप ,अथर्व प्रकाशन जळगावचे युवराज माळी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सदर कार्यक्रमास प्रकाशनाथ पाटणकर ,भास्कर सकपाळ , नागसेनदादा सावदेकर ,शाहीर डी. आर. इंगळे , शाहीर विजय मांडकेकर ,स्वरसम्राट कुणाल बोदडे ,रागिनी बोदडे ,कवी गायक प्राध्यापक डॉक्टर किशोर वाघ , मेघानंद जाधव , अजय देहाडे , अमोल विजयानंद जाधव ,चेतन चोपडे , सपनाताई खरात ,साधना मेश्राम आदी प्रमुख गायकांची उपस्थिती लाभणार असून गाणं प्रताप सिंगांच हा प्रबोधनात्मक गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.तरी सर्व आंबेडकरी अनुयायांनी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी असे आवाहन प्रतापसिंग दादा बोदडे जयंती उत्सव समिती व समस्त समाज बांधव मुक्ताईनगर यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## ओबीसीमध्ये इतरांना आरक्षण देण्यास एरंडोल येथे विरोध; रास्ता रोको आंदोलन

**एरंडोल । प्रतिनिधी –**

ओ बी सी आरक्षणामध्ये इतर समाजांना आरक्षण देण्याच्या विरोधात एरंडोल येथे ओ बी सी समाजातर्फे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर अमळनेर नाक्या नजिक दि.२१ जून २०२४ रोजी सकाळी ११.३० ते ११.४५ दरम्यान जवळपास १५ ते २० मिनिटे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनामुळे राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही बाजूला थांबलेल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.यावेळी पोलिस निरीक्षक सतीश बोराडे व नायब तहसीलदार दिलीप पाटील यांना निवेदन देण्यात आले.जालना जिल्ह्यात लक्ष्मण हाके या ओ बी सी कार्यकर्त्याने आरक्षण बचावासाठी ९ दिवसांपासून सुरू केलेल्या प्राणांतिक उपोषणास पाठिंबा देण्यासाठी एरंडोल येथील सर्व ओ बी सी समाज एकवटला.त्यांच्या आंदोलनाकडे शासनाने दुर्लक्ष केल्याबद्दल शासनाचा तीव्र धिक्कार करण्यात आला.शासनाने त्यांच्या आंदोलनाची तात्काळ दखल घ्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या आंदोलनात माजी जि.प. सदस्य नानाभाऊ पोपट महाजन, सामाजिक कार्यकर्ते भगवान महाजन, माजी नगराध्यक्ष देविदास महाजन, दशरथ महाजन, राजेंद्र चौधरी, रमेश महाजन, विजय महाजन, अशोक चौधरी, कैलास महाजन, गोरख चौधरी, पुंडलिक चौधरी, भगवान महाजन, हिंमत महाजन, विजय गायकवाड, रमेश महाजन, जितेंद्र महाजन,हरिश महाजन, विठ्ठल आंधळे, आनंदा चौधरी, गणेश महाजन ,दिगंबर बोरसे, प्रविण बडगुजर, विनोद लखारी, दगडू महाजन, कैलास चौधरी आदी ओ बी सी समाज बांधव सहभागी झाले होते.

## महावेधचे अधिकारी चुकीच्या दुरुस्तीसाठी अमळनेरात येणार

### तीन दिवस उलटूनही नोंदीत सुधारणा नाही

**अमळनेर। प्रतिनिधी –**

महावेधच्या पावसाच्या नोंदीची त्रुटी किसान काँग्रेस व काँग्रेसच्या नेत्यांनी निदर्शनास आणून दिल्यानन्तर प्रशासनाने त्याची दखल घेतली असून संबंधित विभागाचे अधिकारी महसूल मंडळात भेट देऊन पाहणी करणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी सी जे ठाकरे यांनी दिली.

१८ रोजी झालेल्या अतिवृष्टीबाबत महावेध च्या पावसाच्या नोंदीत मोठी तफावत आढळून आली. शेतकऱ्यांच्या शेतीतील माती , ठिबक नळ्या , बियाणे ,रोपे , खते वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. ६५ मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्यास अतिवृष्टी ग्राह्य धरली जाते. ही नोंद नुकसान भरपाई अथवा इतर शासनाकडून मिळणाऱ्या मदतीसाठी पात्र ठरते. चुकीच्या नोंदीमुळे शेकडो शेतकरी भविष्यातील मदतीपासून वंचित ठरू नये म्हणून जिल्हा किसान काँग्रेसचे अध्यक्ष सुरेश पाटील , कार्यध्यक्ष प्रा सुभाष पाटील , डॉ अनिल शिंदे ,धनगर पाटील यांनी जिल्हाधिकारी , उपविभागीय अधिकारी महादेव खेडकर ,तालुका कृषी अधिकारी सी जे ठाकरे यांच्या मार्फत प्रशासनला महावेध ची त्रुटी निदर्शनास आणून दिली. तीन दिवसात चुकीची नोंद अथवा उशिरा डेटा मिळाल्याने दुरुस्ती केली जाते. मात्र २१ जून पर्यंत दुरुस्ती आली नाही. कृषी अधिकारी ठाकरे यांनी तातडीने यासंदर्भात महावेध शी संपर्क साधल्याने महावेध चे अधिकारी अमळनेर तालुक्यात शिरूड , मारवड ,पातोंडा मंडळांसह अमळनेर तालुक्यात भेट देणार असल्याचे कृषी अधिकारी ठाकरे यांनी सांगितले. त्याच प्रमाणे जिल्हा पीक विमा अधिकारी किरण पाटील यांनी देखील शेतकरी नेते प्रा सुभाष पाटील यांच्याशी संपर्क साधून शिरूड मंडळातील गेल्या काही दिवसांपासूनच्या पावसाची चौकशी केली.

# जामनेर पोलीस स्टेशनवर हल्ला ; १० जणांना अटक

## आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी

**जामनेर। प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचखेडा येथे नऊ दिवसापूर्वी एका चिमुकलीवर अत्याचार करून खून करणाऱ्या फरार आरोपीला काल एलसीबी पथक व भुसावळ पोलिसांनी अटक करून त्याला ताब्यात घेऊन जळगाव येथे रवाना केले. मात्र सदर आरोपीला जामनेर पोलीस स्टेशनला आणल्याची अफवा वाऱ्यासारखी पसरली व रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास दीड ते दोन हजार लोकांचा जमाव लाठ्या- काठ्या, दगड -धोंडे घेऊन पोलीस स्टेशनवर चालून आला.

जमावाने पोलीस स्टेशनची तोडफोड करून पोलिसांवरही हल्ला चढवला. यात आठ ते दहा पोलिस गंभीरित्या जखमी झाले असून याप्रकरणी जामनेर पोलीस स्टेशनला गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी दहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांना आज कोर्टात हजर केले असता त्यांना पाच दिवसांची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. दरम्यान जामनेर मध्ये तणावपूर्ण शांतता असून अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर पवार या जामनेरमध्ये तळ ठोकून परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत.

तालुक्यातील एका गावातील सहा वर्षाच्या चिमुकलीवर चॉकलेटचे अमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करून खून केला होता. याप्रकरणी जामनेर पोलीस स्टेशनला आरोपी सुभाष उमाजी भिल याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर आरोपी तेव्हापासून फरार असल्याने त्याच्या शोधासाठी दहा पथके विविध ठिकाणी रवाना करण्यात आली होती. दरम्यान सदर आरोपी काल दिनांक २० जून रोजी संध्याकाळी एलसीबी व भुसावळ पोलिसांनी भुसावळ येथून तापी परिसर मंदिरा जवळील भिल्ल वस्ती मधून अटक करून ताब्यात घेतले. सदर आरोपीस जळगाव रवाना केले. मात्र आरोपी सुभाष भिल याला जामनेर पोलीस स्टेशनला आणल्याची अफवा वाऱ्यासारखी तालुक्यात पसरली.

बघता बघता रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास दीड ते दोन हजार लोकांचा जमाव पोलीस स्टेशनच्या समोर दाखल झाला. जमावाने टायर जाळून आंदोलन सुरू केले. रास्ता रोको करून सदर आरोपी आमच्या ताब्यात द्या ही मागणी लावून धरली. पोलीस निरीक्षक किरण शिंदे, पोलीस उपनिरीक्षक सानप यांनी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न करून आरोपी हा जळगावला आहे. असून तो जामनेरला नाही अशा प्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र जमाव समजण्याच्या पलीकडे जाऊन यावरून पोलीस व जमावत चकमक उडाली. संतप्त जमावाने पोलीस स्टेशनवर दगडफेक सुरू केली. पोलिसांनी बचावासाठी लाठ्या-काठ्यांचा मारा केला असता संतप्त जमावाने ही दंडुके घेऊन पोलिसांवर हल्ला चढवला.



दहा-पंधरा पोलीस कर्मचारी दीड ते दोन हजाराच्या जमावाला पांगवण्यास असमर्थ ठरले. जमावाने केलेल्या हल्ल्यात पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्यासह पोलीस कर्मचारी संजय खंडारे, राजू माळी, सुनील राठोड, रमेश कुमावत, प्रीतम बरकले निलेश महाजन, गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान जळगाव येथून दंगा नियंत्रण पथकाला पाचारण करण्यात आले. पोलीस जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर पवार, डीवायएसपी धनंजय येरुळे यांचे मार्गदर्शनाखाली एलसीबी पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यात यश मिळवले. या प्रकरणी जामनेर पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर नंबर ३१० भादवि कलम ३०७,३०८, ३५३,३३२,३३३,१४३,१४७,१४८,१४९,३४२३४१ ,४३५,३२३,५०४,५०६,४२७ सार्वजनिक मालमत्ता नुकसान ३०/७ मुंबई कायदा कलम ३७,१,३ कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल असून आरोपी शालू सिंग शेवाळे सर, राहणार गिरजा कॉलनी जामनेर, अशोक बंडू भिल खडकी, श्रीराम भिल जामनेर, हे तीन आरोपी फरार असून प्रमोद विश्वनाथ सुरवाडे जामनेर पुरा, प्रदीप रवींद्र कोळी सामरोद, मंगल ज्ञानेश्वर ठाकरे हिवरखेडा ,पंकज देविदास ठाकरे, रितेश जितू मोरे, दीपक अशोक पवार चिंचोली, अमोल हरिदास सोनवणे, आकाश सुनील पवार ओझर, युवराज सुखराम पवार इंदिरा आवास जामनेर, आकाश युवराज पवार, इंदिरा आवास जामनेर यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायाधीश पी.एन .चांमले यांनी सदर आरोपीस पाच दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

सरकार पक्षातर्फे सरकारी वकील कृतिका भट यांनी बाजू मांडली .याव्यतिरिक्त सुमारे ४०० ते ५०० जनांवर होण्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर पवार यांचे मार्गदर्शनाखाली एलसीबी पोलीस निरीक्षक बबन आव्हाड हे करीत आहे दरम्यान जामनेर येथे तणावपूर्ण शांतता असून इतर आरोपींचा शोध पोलीस घेत आहे.

## केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली - संदीप पाटील

**चोपडा। प्रतिनिधी –**




दरवर्षी बी-बियाणे,रासानिक खते व फवारणी औषधींच्या किंमतीत होणारी बेसुमार भाववाढ आणि महागाई भडकल्यामुळे मजुरीत झालेली वाढ त्यामुळे शेतमालाच्या उत्पादन खर्चात प्रचंड वाढ झाल्याने दिवसेंदिवस शेती व्यवसाय तोट्यात जाऊ लागला आहे. त्यात बाजारात शेतीमालाला भाव नसल्याने शेतकऱ्यांना शेती कसणे परवडत नाही कारण उत्पादन खर्च आणि शेतीत आलेले उत्पन्न याचा ताळमेळच बसत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.

यंदाच्या खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, मका, ज्वारी, बाजरी आदी पिकांसाठी केंद्र सरकारने हमीभावात तुटपुंजी वाढ नुकतीच जाहीर केलेली आहे. परंतु हमीभावात नाममात्र वाढ जाहीर करून केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली असल्याची टीका शेतकरी संघटनेचे विभागीय अध्यक्ष संदीप पाटील यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात कृषीमंत्री म्हणून शिवराजसिंह चौहान यांच्या सारख्या अनुभवी व जाणकार असलेल्या कृषी मंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्या नंतर शेती व्यवसायाला चांगले दिवस येतील अशी आशा देशातील शेतकरी बाळगून होते. प्रत्यक्षात मात्र येरे माझ्या मागल्या म्हणी प्रमाणे केंद्र सरकारने खरीप पिकांसाठी

हमीभावात नाममात्र वाढ करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले आहे. केंद्र सरकारने मध्यम धागा व लांब धागा कापसाच्या हमीभावात जेमतेम ५०१/- रूपयांची वाढ केली आहे. वास्तविक कापूस उत्पादकांना हमीभाव किमान १०,००० रूपये प्रति क्विंटल होण्याची अपेक्षा होती.

सोयाबीनचा भाव सुमारे ६००० रूपये प्रति क्विंटल पर्यंत जाण्याची अपेक्षा होती, प्रत्यक्षात केंद्र सरकारने हमीभावात फक्त २९२ रूपयांची वाढ केली आहे. मक्याच्या हमीभावात देखील जेमतेम १३५ रूपयांची वाढ केलेली आहे. तर कडधान्य व तेलबिया पिकांच्या हमीभावातील केलेली वाढ समाधानकारक नाही. त्यामुळे शेतकरी संघटनेसह शेतकऱ्यांनी केंद्र सरकारने खरीप पिकांसाठी जाहीर केलेल्या हमीभावा च्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. असे शेतकरी संघटनेने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



## रावेर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**रावेर। प्रतिनिधी –**

येथे सरदार जी.जी.हायस्कूल च्या मैदानावर जिल्हा क्रीडा अधिकारी व पं.स.रावेर, सरदार जी.जी. हायस्कूल व कमलाबाई गर्ल्स हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय योग दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी रावेर गटशिक्षण अधिकारी शैलेंद्र दखणे, शिक्षण विस्तारक अधिकारी विलास कोळी, रावेर शिक्षण संवर्धक संघाचे चेअरमन डॉ. दत्तप्रसाद दलाल, केंद्रप्रमुख गणेश धांडे, केंद्रप्रमुख दिलीप पाटील, सरदार जीजी हायस्कूलचे मुख्याध्यापक एस.पी.पाटील, कमलाबाई गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका जयश्री कुलकर्णी, उपमुख्याध्यापक रमण तायडे, प्रफुल मानकर, दीपक मराठे, क्रीडा शिक्षक जे.के.पाटील, युवराज माळी, अजय महाजन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तब्बल अडीच हजार नागरिकांनी योग दिनाच्या निमित्ताने योग प्राणायाम केले.

## भोरगाव लेवा पंचायत ठाया पाडळसे कुटुंबनायक प्रभारीपदी ललितकुमार पाटील यांची निवड

**पाडळसे ता.यावल । वार्ताहर –**

आज दिनांक २१ जून भोरगाव लेवा पंचायत ठाया पाडळसे तालुका यावल या संस्थेची कुटुंबनायक श्री रमेश दादा विठू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त प्रभारी कार्यकारिणीची सभा पाडळसे येथे संपन्न झाली. या सभेत कुटुंबनायक रमेश पाटील यांनी नवनियुक्त कार्यकारणीचे अभिनंदन केले. या सभेत श्री रमेश दादा पाटील यांनी तब्येतीच्या कारणास्तव मला कुटुंबनायक या पदाची जबाबदारी सांभाळणे शक्य होत नाही व डॉक्टरांनी मला फिरण्यासाठी निर्बंध लावले आहेत म्हणून कार्यकारणी मध्ये हा विषय मांडला त्यानंतर सर्व प्रभारी कार्यकारणी सदस्यांमध्ये चर्चा झाली. त्यात संस्थेच्या परंपरेप्रमाणे व नियमावली मधील तरतुदीनुसार कुटुंबनायकपद हे वंशपरंपरागत असल्याने व रमेश पाटील यांच्या तब्येतीच्या कारणास्तव त्यांना निर्बंध आल्याने प्रभारी कुटुंबनायक म्हणून रमेश दादांचे चिरंजीव ललितकुमार रमेश पाटील यांना प्रभारी कुटुंबनायक करण्याबाबत माजी मंत्री आ.एकनाथराव



खडसे यांनी प्रस्ताव मांडला. त्यास माजी खासदार डॉ. उल्हास पाटील व आमदार शिरीष चौधरी यांनी अनुमोदन दिले व भोरगाव लेवा पंचायतीच्या प्रभारी कुटुंब नायक म्हणून ललितकुमार पाटील यांची निवड करण्याचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला यापुढे तेच कुटुंबनायक म्हणून कामकाज पाहतील.

तसेच भोरगाव लेवा पंचायतीच्या जळगाव मलकापूर व भुसावळ येथे विभागीय शाखा सुरू करण्यात आलेल्या होत्या. परंतु आता भोरगाव लेवा पंचायतीची नवीन प्रभारी कार्यकारणी अस्तित्वात आल्याने शाखा बरखास्त करून पुनर्जीवित करण्यात याव्या असा प्रस्ताव माजी मंत्री आमदार एकनाथराव खडसे यांनी मांडला त्यास आमदार शिरीष दादा चौधरी यांनी अनुमोदन दिले. सर्वानुमते जळगाव, मलकापूर, भुसावळ येथील तिन्ही शाखा बरखास्त करण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला. त्यानंतर कार्यकारणीच्या संमतीने शाखा सुरू करण्याबाबत विचार करण्यात येईल असे ठरले.

या सभेमध्ये नामदार श्रीमती रक्षाताई खडसे यांची भारत सरकारमध्ये युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री म्हणून निवड झाल्याने सकल लेवा समाजाला हा पहिल्यांदाच बहुमान मिळत असल्याने सकल लेवा समाजाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला नामदार रक्षाताई खडसे च्या सोयीची तारीख घेऊन यथोचित सत्कार करण्यात येईल असे ठरले.

या सभेत कुटुंबनायक रमेश पाटील माजी मंत्री आमदार एकनाथराव खडसे, माजी खासदार डॉक्टर उल्हास पाटील, रावेर मतदारसंघाचे आ. शिरीष चौधरी, प्रभारी कुटुंबनायक ललितकुमार पाटील, बीके चौधरी, जळगाव महानगरपालिकेचे माजी महापौर विष्णू भंगाळे, फैजपुर माजी नगराध्यक्ष मिलिंद वाघुळदे, दिनेश सिताराम भंगाळे, ज्ञानेश्वर पाटील, ॲड. संजय राणे, एन. टी. पाटील, सौ. आरती चौधरी, डॉ. प्रियदर्शनी सरोदे , सुहास चौधरी यांची भोरगाव लेवा पंचायत ठाया पाडळसे या मुख्य शाखेची प्रभारी कार्यकारणी म्हणून जाहीर करण्यात आली.

## महाविकास आघाडीतर्फे एकदिवसीय धरणे आंदोलन; अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**पारोळा । प्रतिनिधी**




येथील महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यातर्फे तालुक्यात शासनाच्या भरड धान्य खरेदी योजने अंतर्गत ८५५ शेतकऱ्यांची नोंद झाली असून सरकारने फक्त ५००० क्विंटल ज्वारी खरेदीचे उदिष्ट दिले आहे. परंतु काल पर्यंत १०० शेतकऱ्यांची ज्वारी मोजली गेली व उदिष्ठ सम्पुष्टाकडे चालले. अजून कमीत कमी ३५००० क्विंटल ज्वारीचे उदिष्ठ सरकारने वाढवावे.

शेतकऱ्यांचे रखडलेले दुष्काळी अनुदान त्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावे.तसेच रासायनिक खतांच्या उपल्ब्ध संदर्भात योग्य ती खबरदारी घ्यावी व शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवावी. अन्यथा या पुढे तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यात येईल. लोड शेडींग व पिक विमा संदर्भात योग्य दखल घ्यावी अशा मागण्यांसाठी एक दिवसीय धरणे आंदोलन तहसीलदार कार्यालयाबाहेर करण्यात आले. तहसीलदार डॉ. उल्हास देवरे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी माजी पालकमंत्री डॉ. सतीश भास्करराव पाटील, उबाठा शिवसेना जिल्हाप्रमुख डॉक्टर हर्षल माने, काँग्रेस आय तालुका अध्यक्ष पिरण अनुष्ठान, माजी नगरसेवक रोहन मोरे, विधानसभा क्षेत्र प्रमुख डॉक्टर शांताराम पाटील, तालुका प्रमुख प्राध्यापक आर. बी. पाटील, शहरप्रमुख अशोक मराठे, माजी जिल्हा परिषद सदस्य रोहन सतीश पाटील, धूळपिंपरी सरपंच निंबा पाटील, जिभाऊ पाटील करमाड, माजी जि. प. सदस्य डॉक्टर प्रवीण पाटील, मराठखेडे सरपंच सुनील रामोशी, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष संतोष महाजन, शहराध्यक्ष जितू पाटील, महिला तालुका अध्यक्ष सुवर्णा पाटील, ॲड. स्वाती शिंदे, राष्ट्रवादी युवक जिल्हा उपाध्यक्ष कपिल चौधरी, रवींद्र जाधव, दादा पाटील, मेहु टेहू सरपंच विकास बोरसे, योगेश रोकडे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी एक दिवसीय धरणे आंदोलनात महायुतीचे सरकारला निष्क्रिय ठरवून सर्वसामान्य व शेतकऱ्यांचे विरोधातले सरकार असल्याची टीका करत बी-बियाणेमध्ये लूट केली गेली. शहरातही वीज वितरण कंपनीचे नियोजन नाही केव्हाही येते केव्हाही जाते याबाबत नागरिक हैराण झाले आहेत. ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवावे विकास सोसायटीचे कर्ज रुपये मिळत असलेले पैसे बँकेतून न देता सोसायटीतूनच मिळावे अशा अनेक तक्रारी डॉक्टर सतीश पाटील, डॉक्टर हर्षल माने, प्राध्यापक आर बी पाटील यांनी केल्यात या तक्रारीचे गेल्या आठ दिवसात निराकरण न झाल्यास पुढचे शुक्रवारी उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावे देण्यात आला.

यावेळी तहसीलदार डॉक्टर उल्हास देवरे यांनी सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना सूचना करून त्या दुरुस्तीसाठी पाठपुरावा करून सर्व प्रकारच्या अडीअडचणी सोडविण्यात येतील असे आश्वासन दिले.

याप्रसंगी तहसीलदार डॉक्टर उल्हास देवरे नायब तहसीलदार अनिल पाटील, लिपिक विठ्ठल वारकर, तालुका कृषी अधिकारी डी.पी डमाळे, वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता विजय सहारे, पारोळा शहर कनिष्ठ अभियंता गौतम मोरे, पंचायत समिती कृषी अधिकारी दिनेश कोते, तलाठी निशिकांत माने, शशिकांत गोविंदसिंग परदेशी निवडणूक महसूल सहाय्यक यांसह कर्मचारी उपस्थित होते.

**चाळीसगाव । प्रतिनिधी –**



चाळीसगाव येथे महाविकाआघाडीतर्फे येथील तहसील कचेरी समोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावेळी शेतकरी व सर्वसामन्याच्या प्रश्नावर खासदार उन्मेश पाटील, माजी आमदार राजीव देशमुख यांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी करीत स्थानिक लोकप्रतिनिधीच्या दबावाला बळी पडून तुमच्या जबाबदारीपासून तुम्ही लांब जात आहात. आपण शासनाचे प्रतिनिधी असून दबावाला बळी न पडता जनतेच्या सेवेसाठी काम करावे असे सांगत प्रांत कार्यालय,तहसील कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय, एम एस ई बी कार्यालय, कृषी विभाग, सहायक दुय्यम निबंधक कार्यालय, नगरपरिषद,यासारख्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना धरणे आंदोलनात चांगलेच धारवर धरले. त्यामुळे काहीकाळ वातावरण तंग झाले होते. सर्व प्रशासनाच्या वतीने प्रांताधिकारी प्रमोद हीले यांनी आपण दिलेल्या समस्यांबाबत आठ दिवसात कार्यवाहीचा लेखी खुलासा करतो असे सांगील्यामुळे वातावरण शांत झाले.

शेतकऱ्यांच्या समस्येबाबत राज्य सरकार ते स्थानिक प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे. दुष्काळी अनुदान असो किंवा ठिबकचे अनुदान शासनाचे लाभ घेताना हा आपला, हा जवळचा, हा दूरचा असा भेदभाव केला जात आहे. यामुळे पात्र लाभार्थी यापासून वंचित राहत असल्याने यापुढे प्रत्येक विभागाने आपल्या योजनातून जनतेच्या कामाबाबत दिरंगाई करू नये. लहान लहान गोष्टींसाठी शेतकऱ्यांना फिरवाफिरव करू नये अन्यथा महाविकास आघाडीला रस्त्यावर आंदोलन करावे लागेल होणाऱ्या परिणामास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील. असा सज्जड दम आज उन्मेश पाटील यांनी सरकारला भरला. तर माजी आ.राजीव देशमुख यांनी देखील सरकारवर हल्लाबोल करत शेतकऱ्यांसह सर्वसमान्याचे प्रश्न मार्गी लावण्याची जोरदार मागणी केली.

यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिनेश पाटील,उध्दवसेनेचे उपजिल्हाप्रमुख महेंद्र बापू पाटील, जेष्ठ पत्रकार जिल्हा सरचिटणीस किसनराव जोर्वेकर, दूध संघाचे संचालक प्रमोदबापू पाटील, शिवसेनेचे रमेश आबा चव्हाण, नाना कुमावत, मगनदास बैरागी, तुकाराम पाटील मजरे, सेनेचे विधानसभा क्षेत्र प्रमुख रतनसिंग परदेशी (पाचोरा), सहसंपर्कप्रमुख सुनील पाटील, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष ऍड.राहुल जाधव, अल्पसंख्यांक आघाडीचे वसीम चेअरमन,ज्येष्ठ शेतकरी गबादादा पाटील, दूध उत्पादक संजय पाटील यांचे सह मान्यवरांनी बळीराजाच्या जीवनाशी निगडित महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. आंदोलानात आजी-माजी नगरसेवक, महाविकास आघाडीच्या कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**धरणे आंदोलन ठरले प्रति आमसभा–** धरणे आंदोलनाला उपस्थित शेतकऱ्यांनी विविध समस्यांचा पाढा वाचला. प्रशासन अधिकारी व कर्मचारी ई के वाय सी च्या नावावर आम्हाला फिरवाफिरव करत आहे, शेतमालाला भाव मिळत नाही, भरड धान्य बाबत ऑफलाईन नोंदी स्वीकारल्या जात नाही. ठिबकचे अनुदान तीन वर्षापासून प्रलंबित आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांना फरकाची रक्कम दिली जात नाही. अशा विविध समस्या मांडत शेतकऱ्यांनी धरणे आंदोलनीं समस्यांचा पाढा वाचला. शेतकरी हवालदिल झाले असून आमचा कोणी वाली नाही अशा तक्रारी यावेळी शेतकरी बांधवांनी मान्यवरांसमोर केल्या.

## थोडक्यात...



### पाडळसे येथे हिवताप पंधरवडा साजरा

**पाडळसे, ता. यावल | वार्ताहर**

डेंगू चिकनगुनिया बाबत आरोग्य व शिक्षण जनजागृती करण्यात आली प्राथमिक आरोग्य केंद्र पाडळसे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर प्राजक्ता चव्हाण नेमाडे तालुका पर्यवेक्षक तसेच आरोग्य निरीक्षक स्वप्निल भालेराव, ए.जे. पाटील आरोग्य सेविका ए. आर. बोरसे, आरोग्य सेवक उभा केंद्रांतर्गत सर्व अशा सेविका गावातील लोकांना हिवतापाबद्दल डेंग्यू आजाराबद्दल जनजागृती करत आहेत

### पाडळसे सरपंच पतीने धमकावल्याची ग्रामपंचायत सदस्यांची तक्रार

**पाडळसे, ता. यावल | वार्ताहर**

पाडळसे येथील वार्ड क्र. १ ग्रामपंचायत सदस्य सुदेश कडू बाविस्कर यांनी फैजपूर पोलिसात तक्रार दिली की ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये सरपंच गुणवंती पाटील यांना कामाबद्दल आणि झालेल्या खर्चाबाबत विचारणा केली असता सरपंच पती सुरज मनोहर पाटील यांना राग आल्याने ते माझ्या घराजवळ येऊन मला शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली याबद्दल सुरज मनोहर पाटील यांच्या विरोधात फैजपूर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. याबाबत सुरज मनोहर पाटील यांच्याशी भेटून त्यांची प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी सांगितले की आमच्या वाड्यातील पिंपळाच्या झाडाच्या फांद्या मजूर तोडणी करत असताना ते पाहण्यासाठी गेलो असता सदस्य सुदेश कडू बाविस्कर यांनी मला मज्जाव केला व ते मला म्हणाले की, काम पाहणी करण्याचा अधिकार आम्हा सदस्यांचा आहे तुमचा याच्याशी काही एक संबंध नाही तरी मी त्यांना सांगितले की मी गावाचा नागरिक म्हणून गावातील कामकाज बघू शकतो याचाच राग सुदेश बाविस्कर यांना आल्याने त्यांनी माझ्या विरोधात तक्रार दाखल केली आहे.



### ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढविण्याची आ.राजेश एडके यांची छगन भुजबळ यांच्याकडे केली मागणी

**मलकापूर | प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यात ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात यावे अशी मागणी आमदार राजेश एकडे यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे केली असता या मागणीची दखल घेत नामदार भुजबळ यांनी या मागणी संदर्भात तातडीने उचित कार्यवाही करणेबाबत अन्न नागरी पुरवठा विभागाचे सचिव यांना तात्काळ सुचित केले. राज्य सरकारने आधारभूत किंमत योजनेअंतर्गत शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी ची घोषणा केली. त्या नुसार खरेदी सुरू केली. बुलढाणा जिल्ह्याला ३० हजार क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले. परंतु हे उद्दिष्ट उत्पादनाच्या प्रमाणात अतिशय कमी आहे, कारण बुलढाणा जिल्ह्यामध्ये ज्वारीचे उत्पादन जास्त झाल्यामुळे तसेच मलकापूर मतदारसंघांमध्ये शेतकऱ्यांनी ज्वारीचा पेरा जास्त केल्यामुळे उत्पादनात जास्त प्रमाणात वाढ झालेली आहे. मलकापुर विधानसभा मतदारसंघामध्ये ३५०० शेतकरींनी नोंदण्या केल्या आहे. तर खासगी बाजार पेठेत ज्वारीचे भाव कमी असल्यामुळे शेतकरी बांधवांचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्याकरीता ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून देण्यात यावे अशी मागणी आमदार एकडे यांनी थेट मंत्रालयात नामदार भुजबळ यांच्याकडे केली असता या संदर्भात तातडीने संबंधित विभागाच्या सचिवांना योग्य ती कारवाई करणे बाबत निश्चित करण्यात आले आहे.



### प्राथमिक आरोग्य केंद्र चिनावल येथे १९ जून राष्ट्रीय सिकलसेल दिवस साजरा

**चिनावल, ता.यावल | वार्ताहर**

प्राथमिक आरोग्य केंद्र चिनावल येथे १९ जून २०२४ रोजी राष्ट्रीय सिकलसेल दिवस साजरा करण्यात आला. मां. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन भायेकर, मां. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अजय रिंढे , वैद्यकीय अधिकारी डॉ. चित्रलेखा पाटील, डॉ. नीरज पाटील यांच्या मार्गर्शनाखाली चिनावल येथे सिकलसेल आजाराविषयी ग्रामस्थांना माहिती देण्यात आली.तसेच गावातील मुला मुलींची सिकल सेल टेस्ट करण्यात आली.प्रसंगी आरोग्य साहाय्यक जे. के. सोनवणे, पी. एन. तायडे, सुभाष ठाकूर, श्रीमती. मीनाक्षी हातेकर, यश भालेराव, चेतन लहासे महा लॅब व गावातील सर्व आशा सेविका उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या यशामध्ये शिक्षकांचेही मोलाचे योगदान - शरद महाजन

**न्हावी, ता.यावल | वार्ताहर**

विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवून स्वतःचे व शाळेचे नाव उज्वल करावे. विद्यार्थ्यांच्या मेहनती मागे शाळेतील शिक्षकांचेही मार्गदर्शनाच्या रुपाने मोलाचे योगदान आहे .विद्यार्थ्यांनी आज पारंपरिक शिक्षणाबरोबर जे नवीन शैक्षणिक मार्ग उपलब्ध आहेत त्यांचाही फायदा घ्यावा असे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शरद महाजन यांनी मार्च २०२४ दहावी व बारावी मध्ये चांगले गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून प्रतिपादन केले.

प्रथमतः सरस्वती मातेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही.बी. वारके यांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन, उपाध्यक्ष अनिल लढे, चेअरमन प्रा.डॉ.के.जी. पाटील, सचिव जयंत बेंडाळे व विद्यमान संचालक मंडळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक व्ही बी वारके, उपमुख्याध्यापिका सौ.संगीता फिरके, पर्यवेक्षक अनिल ठोसर या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. यावेळी संस्थेचे चेअरमन प्रा. डॉ. के जी पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायक मार्गदर्शन केले.त्यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या आहारी न जाता गरजेपुरता मर्यादित ठेवावा.कारण काळ हा सातत्याने बदलत आहे. म्हणून तुम्ही स्वतःला बदला. बदलाचा वेग हा प्रचंड वाढलेला आहे. यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष अनिल लढे यांनी सांगितले की विद्यार्थीनीं मनामध्ये जिद्द ठेवावी, मेहनत करावी , पुस्तकांचे वाचन करावे एकंदरीत खूप मेहनत केली की यश नक्की तुमचेच आहे.



गुणवंत विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे शरद महाजन,अनिल लढे, प्रा. डॉ. के जी पाटील, जयंत बेंडाळे ,व्ही बी वारके व मान्यवर (छाया- ललित फिरके)

कार्यक्रमास उपस्थित असलेल्या पालकांमधून न्हावी गावातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन प्रवीण वारके यांनी इयत्ता पाचवी ते आठवी मधील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च (दत्तक म्हणून )जाहीर केला.सदर कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन, उपाध्यक्ष अनिल लढे ,चेअरमन प्रा. डॉ. के जी पाटील, सचिव जयंत बेंडाळे व विद्यमान संचालक दीपक नेहेते, संदेश महाजन, डॉ. प्रमोद पाटील, नारायण कोलते, पालक प्रवीण वारके, राजेश चौधरी तसेच शाळेचे मुख्याध्यापक व्ही. बी. वारके, उपमुख्याध्यापिका सौ. संगीता फिरके, पर्यवेक्षक अनिल ठोसर सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.जे.एन. चौधरी यांनी केले तर आभार डी.पी. बोरोले यांनी मानले.

## किनगाव प्रा.आ.केंद्रामार्फत हिवताप प्रतिरोध महिना साजरा

**उंटावद, ता.यावल | वार्ताहर**

किनगाव प्राथमिक आरोग्यकेंन्द्रामार्फत मालोद व आडगांव या गावांमध्ये जुन महिना हिवताप प्रतिरोध महिना म्हणून साजरा करण्यात आला.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन भायेकर जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.तुषार देशमुख तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजू तडवी वैद्यकीय अधिकारी डॉ.दर्शना निकम,डॉ. तरन्नुम शेख व तालुका आरोग्य पर्यवेक्षक विजय नेमाडे यांच्या मार्गदर्शनानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र किनगाव अंतर्गत उपकेंद्र मालोद व आडगांव येथे दरवर्षी जून महिना हा हिवताप प्रतिरोध महिना म्हणून साजरा करण्यात येतो नागरिकांमध्ये हिवताप, डेंग्यू आजारांविषयी लक्षणे व उपाययोजना या बाबत जनजागृती करण्यात येते.

यावर्षी तालुका आरोग्य पर्यवेक्षक विजय नेमाडे यांनी मालोद व आडगांव येथे प्रत्यक्ष भेट देऊन हिवताप व डेंग्यू अजारांबाबत नागरीकांना मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य सेवक पवन काळे(पाटील), मनोज बरेला प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी सतीष सोनवणे यांनी मार्गदर्शन केले.यात गावात जलताप रुग्ण सर्वेक्षण,कंटेनर सर्वेक्षण, हस्त पत्रिका वाटणे इत्यादी बाबी करण्यात आल्या. तसेच गाव पातळीवर हिवतापाची लक्षणे,उपचार ,हिवताप प्रतिरोध उपाययोजनांबद्दल माहिती नागरिकांना देण्यात आली. नागरिकांनी आपापल्या घरातील पाणीसाठे झाकून ठेवणे,घरासमोरील नाल्या वाहत्या करणे,खिडक्यांना जाळ्या बसवणे, शौचालयाच्या व्हेण्ट पाईपला जाळी बसवणे, घरासमोर पाणी साचू न देणे,आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळणे अशा सूचना यावेळी नागरिकांना देण्यात आल्या. यामध्ये मालोद व आडगांव येथील सर्व कर्मचारी व आशा वर्कर यांनी सहभाग घेतला होता.





## फैजपूर येथे हिवताप प्रतिरोध महिना साजरा

**फैजपूर, ता.यावल | वार्ताहर**

येथील नागरी आरोग्य केंद्र, फैजपूर ता यावल येथे हिवताप प्रतिरोध महिना जुन २०२४ साजरा करण्यात आला. डॉ.श्री. सचिन भायेकर.साहेब जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.तुषार देशमुख साहेब जिल्हा हिवताप अधिकारी, मा. डॉ.राजू तडवी साहेब तालुका आरोग्य अधिकारी यावल व डॉ.समीर सय्यद, वैद्यकीय अधिकारी. तसेच विजय नेमाडे साहेब.आरोग्य पर्यवेक्षक रावेर - यावल. यांचे मार्गदर्शनाखाली दरवर्षी जुन महिना हा हिवताप प्रतिरोध महिना म्हणून नागरिकांमध्ये हिवताप, डेंग्यू आजार लक्षणे उपाययोजना या बाबत जनजागृती करण्यात येते विजय नेमाडे ( हि.तालुका पर्यवेक्षक)यांनी फैजपूर येथे भेट देऊन डेंग्यू आजारा बाबत मार्गदर्शन केले. यावेळी आरोग्य सेवक चंदन पाटील यांनी मार्गदर्शन केले. विवेक इंगळे, राजेश कोळी, आरोग्य सेविका श्रीमती.आरती पाटील,श्रीमती अलका वैदकर. सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले. आरोग्य सेवकांनी हिवताप (मलेरिया) आजारा बाबत माहिती उपाययोजना व प्रतिबंधक उपाय योजना नियंत्रण आणि औषधंउपचार, स्वच्छता, कोरडा दिवस पाळणे इत्यादी माहिती शहरातील नागरिकांना आरोग्य शिक्षण देण्यासाठी सभा घेतली व सविस्तर माहिती देवून हस्तपत्रिका दिल्या.

## स्वतःसाठी अन् समाजासाठी योग -ॲड.अर्जुन पाटील

**बोदवड | प्रतिनिधी**



विधीसेवा प्राधिकरणाचा व बोदवड न्यायालय यांच्या संयुक्त विद्यमानाने बोदवड येथिल दिवाणी व फौजदारी न्यायालयात 'आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले

यावेळी ॲड.अर्जुन पाटील अध्यक्ष बोदवड तालुका वकील संघ यांनी संबोधन केले की, तुमचे शरीर हीच तुमची सपंत्ती आहे. यावर पुढे बोलतान त्यांनी प्राचीन योगविद्येचा समृद्ध वारसा भारताला मिळाला आहे. योगा हे जणू भारताला मिळालेले मोठे वरदान आहे, असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही. भारताने जगाला योगाची ओळख करून दिली आणि जगभरात योगाचा प्रसार केला. योगाला आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष ओळख मिळाली आहे. सर्वात पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन हा २१ जून २०१५ मध्ये साजरा करण्यात आला. या दिवशी जगभरातील असंख्य लोकांनी एकत्रितपणे योगाचा सराव केला.

जगभरातील लोकांना योगाचे महत्व पटवून देण्यासाठी आणि योगाप्रती लोकांना जागरूक करण्यासाठी दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जातो.

आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जूनलाच साजरा करण्यामागे एक खास कारण आहे. २१ जून हा दिवस वर्षातील सर्वात मोठा दिवस मानला जातो. ज्याला ग्रीष्म संक्रांती असे ही म्हटले जाते. विशेष म्हणजे हा दिवस उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस आहे. या दिवसानंतर सूर्य दक्षिण गोलार्धात प्रवेश करतो. त्यामुळे, योग आणि अध्यात्मासाठी हा दिवस खूप खास मानला जातो. त्यामुळेच, २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिनाची एक विशिष्ट थीम ठरवली जाते. ही थीम घेऊन योग दिनाचे आयोजन केले जाते. यंदाच्या आतंरराष्ट्रीय योग दिनाची थीम ही 'स्वतः साठी आणि समाजासाठी योग' (Yoga For Self -nd Society) अशी आहे.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष न्यायाधिश क्यु.यु.एन शरवरी हे होते. बोदवड तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अर्जुन पाटील, योगशिक्षक शेखर चव्हाण, सचिव ॲड.धनराज सी. प्रजापती, ॲड.के.एस इंगळे, ॲड. किशोर महाजन, सरकारी वकील ॲड. निलेश लोखंडे यांनी अभ्यासपुर्ण मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रम यशस्वीते साठी बोदवड तालुका वकीलसंघ व न्यालयीन कर्मचारी विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष योगेश पाटील, प्रंशात बेदरकर, शुभम थोरात, अविनाश पोफळे, राजु ढुडाळे, यांनी परीश्रम घेतले. सदर कार्यक्रमास वकील बांधव व पक्षकार मोठ्या संख्येने हे उपस्थित होते.

# विविध ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

### न.ह.रांका विद्यालय

**बोदवड | प्रतिनिधी**

बोदवड, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व बोदवड एज्युकेशन सोसायटी संचलित न ह रांका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोदवड यांच्या संयुक्त विद्यमाने आज राष्ट्रीय योग दिन रांका विद्यालयाच्या मैदानावरती साजरा करण्यात आला, त्याप्रसंगी रांका विद्यालयात मुख्याध्यापक श्री पी एम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी योगगुरु शेखर सिंग चव्हाण, विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एम एस बडगुजर मॅडम, उप प्राचार्या एम टी नेमाडे मॅडम, जेष्ठ पर्यवेक्षक श्री आर के तायडे, श्री जे एन माळी, क्रीडा प्रमुख डॉक्टर संजय निकम, एनसीसी प्रमुख एस आर सावळे,क्रीडाशिक्षक एन यु बागुल ,एस ए तायडे, भूषण भोई तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग बंधू भगिनी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक तथा अध्यक्षीय सूचना डॉ.संजय निकम यांनी तर अनुमोदन संदिप तायडे यांनी दिले. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री पी एम पाटील म्हणाले आंतरराष्ट्रीय योग दिन हा २१ जून १९१५ पासून संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा केला जातो. आजच्या धकाधकीच्या जीवनापद्धतीत मानवी जीवनशैली सुधारण्यासाठी योग साधना अत्यंत महत्त्वाची व आवश्यक आहे.

याप्रसंगी योगगुरु शेखर सिंग चव्हाण यांनी विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष कृतींच्या माध्यमातून विविध प्रात्यक्षिके करून घेतली व योगसाधनेचे जीवनातील महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रम यशस्वी ते करिता स्काऊट गाईड विभाग, एनसीसी विभाग, क्रीडा विभाग यांनी व सुमित मोपारी, प्रेम वंजारी, शिवा मिस्तरी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### बालसंस्कार विद्या मंदिर

**यावल | प्रतिनिधी**

दि.२१ जून शुक्रवार रोजी बाल संस्कार विद्या मंदिर यावल शाळेत १० वा आंतर राष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता १ ली ते इयत्ता सातवी चे एकूण ४८५ विद्यार्थी व १३ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कृतियुक्त मार्गदर्शनप्रशांत महाजन सर, पंढरीनाथ महाले सर, सविता वारके मॅडम यांनी केले.

सदर प्रंसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री सुनील माळी सर यांनी विद्यार्थ्यांना निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी दैनंदिन जीवनात नियमित योग करणे बाबतचे महत्व सांगितले व आजपासून नियमित योग करण्याचे आवाहन केले तसेच आपल्या आईवडील यांना पण योगा करण्याचा आग्रह करावा असे सांगितले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.आसन व्यवस्था सुनील श्रावगी वप्रकाश जयकारे तर फलकलेखन श्री पुरुषोत्तम साठे सर व संजय चौधरी सर यांनी केले.

### धनाजी नाना विद्यालय

**खिरोदा, ता.रावेर. | वार्ताहर**

दि.२१जून धनाजी नाना विद्यालय व उच्च.माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.मनिषा महाजन यांनी आरोग्य हीच आपली खरी संपत्ती असुन ,निरोगी व सुखी जीवनासाठी योग महत्त्वाचा आहे.योग ही आध्यात्मिक शिस्त आहे. प्रत्येकाने वेळात वेळ काढुन दररोज योग साधना करणे आवश्यक असल्याचे सांगून योगदिनाची माहिती दिली. त्यानंतर आर्ट ऑफ लिव्हिंगच्या समन्वयिका श्रीमती इंदिरा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विदयार्थी व शिक्षकांची प्रार्थना घेऊन योगापूर्वीच्या शारीरिक हालचाली केल्या . विद्यालयातील विदयार्थी, शिक्षकांसाठी क्रीडांगणावर सामूहिक योग शिबीर श्रीमती इंदिरा पाटील यांनी घेतले. योगसाधनेचे महत्त्व समाजापर्यंत जाऊन निरोगी समाज घडवण्यासाठी विदयार्थी शिक्षकांनी प्रयत्न करावे असे आवाहन योग प्रशिक्षणार्थी श्रीमती इंदिरा पाटील यांनी केले.योग शिबीरासाठी विदयालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कार्यकर्ते व विदयार्थी उपस्थित होते.

### इंदिराबाई ललवाणी विद्यालय

**जामनेर | प्रतिनिधी**

येथील इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला सुरुवातीस प्रास्ताविक प्रा.समीर घोडेस्वार यांनी करो योग, रहो निरोग योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले

शासकीय प्रोटोकॉल नुसार योग साधनेस प्रारंभ झाला -प्रार्थना, ओमकार, शारीरिक हालचाली, उभे स्थितीतील ,पोटावरील, पाठीवरील,बैठक स्थितीतील विविध आसन, प्राणायाम, फेसिंग योग, हास्य योग, टाळ्यांचा व्यायाम, ध्यान, इ. प्रात्यक्षिके योग शिक्षक प्रा.समीर घोडेस्वार यांनी विद्यार्थ्यांना हसत खेळत योगाचे धडे दिले.

याप्रसंगी मुख्याध्यापक एस.आर. चव्हाण, उपमुख्याध्यापक एस.एन. चवरे, उपप्राचार्य प्रा.के.एन. मराठे, पर्यवेक्षक प्रा.के. डी. निमगडे, पर्यवेक्षक व्ही.जी. महाजन, जी.जे.पाटील यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

योग दिन कार्यक्रमाचे आयोजन क्रीडा विभागप्रमुख जी.सी.पाटील यांनी तर आभार प्रदर्शन बी.पी.बेनाडे, यांनी केले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.












देशदूत My भुसावळ
। शनिवार, दि. २२ जून २०२४ । पान ५ ।

## अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

**भुसावळ । प्रतिनिधी –** येथील रेल्वे स्थानकात दि. २१ जून २०२४ रोजी सकाळी ९.२० वाजेपूर्वी गाडी क्र. २२१८४ अप एक्सप्रेसच्या कोच एस-७ मध्ये चढत असतांना एक इसम गाडीतून पडून जखमी होवून मयत झाला. याबाबत ऑन ड्युटी स्टेशन मास्तर भुसावळ यांच्या माहितीवरून रेल्वे पो.स्टे.त अकस्मात मृत्यु रजि. क्र. ७५/२०२४ कलम १७४ सीआरपीसी प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. मयत पुरूष इसम अंदाजे वय ५० वर्ष, उंची अंदाजे पावणे सहा फुट, रंगाने गोरा, शरिर बांधा मजबूत, चेहरा उभट, अंगात गुलाबी रंगाचे हाफ शर्ट, खाकी रंगाची हाफ पँट अशा वर्णनाचा असून या इसमास ओळखणाऱ्यांनी रेल्वे पोलिस ठण्याशी ०२५८२-२२२३३८ यावर संपर्क साधावा, असे आवाहन तपासी अंमलदार पोना किशोर कांडेले यांनी केले आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा


श्री राधाकृष्ण प्रभात फेरी


बऱ्हाटे शैक्षणिक संकुल


वरणगाव आयुध निर्माणी


संतधाम योगा ग्रुप

**भुसावळ । प्रतिनिधी**

भुसावळसह परिसरातील शाळा, महाविद्यालय यासह सामाजिक संस्थांच्यावतीने शासकीय परिपत्रकानुसार २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग शिक्षकांनी उपस्थितांना योगाचे महत्व सांगुन प्रात्यक्षिक करून सर्वांकडून योगासने करून घेतले.

**श्री राधाकृष्ण प्रभात फेरी–** यांच्यातर्फे येथील श्री व्यंकटेश बालाजी मंदिर परिसरात सकाळी ६.३० ते ७.३० च्या दरम्यान अनेक बंधू भगिनींच्या उपस्थितीत जागतिक योगदिन मोठ्या उत्सहात साजरा झाला. प्रसंगी सुरूवातीला अध्यक्ष राधेश्याम लाहोटी यांनी योग आणि प्राणायाम याची जीवनातील महत्वपूर्ण माहिती सांगितली. यानंतर योग शिक्षक प्रभाकर झांबरे, अंजली वाघमारे, वंदना जंगले यांनी प्रत्यक्ष कृती करून योग साधना दाखवली. यावेळी संजय अग्रवाल, लीलाधर अग्रवाल, श्याम काबरा, जे.बी.कोटेचा, अ‍ॅड. गोकुल अग्रवाल, अर्जुन पटेल, गोपाल जांगीड, श्याम अग्रवाल, देवा अग्रवाल, वसंतराव विसपुते, रामकृष्ण पाटील, प्री.सूचित सर, संत शरण गुप्ता, संजय फालक, महेश पाटील, विनोद राठोड, विलास पवार, सुभाष शिरसाळे, गोपाल तिवारी, पिंटू हेडा, संजय चांडक, प्रेमराज लड्ढा, नरेंद्र लड्ढा, हेमंत खंबायत, संतोष नागला, सुरेश काबरा, राजू जैस्वाल, सुनील लाहोटी, रमाकांत मंत्री, भूषण आमोदकर, अजय अग्रवाल, संजय मंत्री, महेश पाटील, सत्यनारायण शर्मा, फुलचंद अग्रवाल, युवराज शर्मा, हेमंत जगताप, रामकृष्ण चौधरी यांच्यासह अनेक बंधू-भगिनींची उपस्थिती होती.

**बऱ्हाटे शैक्षणिक संकुल –** येथे आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. योगासनाचे महत्व व योगा केल्यामुळे शरीराला होणारे फायदे व उपयोग प्राथमिक विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका सौ.हेमांगीनी चौधरी यांनी विद्यार्थांना सांगितली. माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी उपस्थित होते. योगासनाचे विविध प्रकाराचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी केले. यामध्ये वृक्षासन, ताडासन, पादहस्तासन इत्यादी प्रात्यक्षिक प्रकार घेण्यात आले. योग शिक्षक पी.एम. परखड यांनी विद्यार्थ्यांना योगाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.आभार जयश्री चौधरी यांनी मानले.

**ताप्ती लेडीज क्लब –**येथील ताप्ती पब्लिक स्कूलच्या ग्राउंडवर ताप्ती लेडीज क्लबतर्फे आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करण्यात आला. प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.स्मिता फालक, डॉ.सुवर्णा गाडेकर, सौ.आरती चौधरी, भवरलाल प्रजापती तसेच क्लबच्या संस्थापिका डॉ.भाग्यश्री भंगाळे आणि इतर सर्व ताप्ती लेडीज क्लबच्या सदस्या उपस्थित होत्या. योग दिनाचे औचित्य साधून आयोजित आरोग्यदायी पाककृती स्पर्धेत सर्व महिलांनी भाग घेतला. यात प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेते काढण्यात आले. मान्यवरांनी अतिशय समर्पक शब्दात योगाचे महत्त्व पटवून दिले. भवरलाल प्रजापति यांनी योगाचे अनेक प्रात्यक्षिक दाखवले आणि अ‍ॅक्युपंक्चर आणि अ‍ॅक्युप्रेशर याचे रोगमुक्तीमध्ये किती महत्त्वाचे योगदान आहे हे सांगितले. तसेच योगाचा नियमित सराव करून आयुष्य निरोगी आणि आनंदी करा असा मौलिक सल्ला दिला. तसेच डॉ. सुवर्णा गाडेकर, सौ.आरती चौधरी यांनी आरोग्यदायी टिप्स गृहिणींना दिल्या. नियमित ताप्ती ग्राउंडवर योगा प्राणायाम तसेच एरोबिक्स निशुल्क घेतले जाते. कार्यक्रमासाठी संस्थाध्यक्ष डॉ.मोहन फालक, महेश फालक, प्राचार्य डॉ.एस.व्ही. पाटील यांचे सहकार्य लाभले.

**श्री संत गाडगेबाबा हिंदी महाविद्यालय–** येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. सर्वप्रथम योग प्रशिक्षक डॉ.सुधीर शर्मा यांनी विविध आसने, योगासन व प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक करून दाखवले आणि एकाग्रता पूर्वक ध्यान करून नेहमी योगासन करावे असे विचार व्यक्त केले. तसेच प्राचार्य डॉ. रमेश जोशी यांनी सर्वांनी दररोज एक तास योगासन करावे. स्वस्थ जीवनशैलीचे महत्त्व पटवून देत असताना 'हेल्थ इज वेल्थ' महामंत्र दिला. आपल्या दैनंदिन जीवनात दररोज योगासन करावे, असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमात सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी योगासन, प्राणायाम, ध्यान करून आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला.

**श्री संत गाडगेबाबा अभियांत्रिकी महाविद्यालय –** हिंदी सेवा मंडळ संचलित श्री संत गाडगे बाबा अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्राचार्य प्रा.डॉ. राहूल बारजिभे, योग शिक्षिका सौ.संध्या सोनी, डी के. सोनी उपस्थित होते. त्यांनी संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना योगाचे प्रात्याक्षिक करुन दाखवले व त्याच बरोबर प्रत्येक योगासनाचे फायदे, योगासनांचे महत्व समजावून सांगितले तसेच सर्वांकडून योगासन करुन घेतले. यामध्ये वृक्षासन, ताडासन, पद्मासन, वज्रासन, अनुलोम विलोम, कपाल भाती, शलभासन, भुजंगासन, प्राणायाम, हास्य योगा यांचा समावेश होता. यशस्वीतेसाठी क्रिडा संचालक प्रा.योगेश जोशी यांनी परीश्रम घेतले.

**वरणगाव, ता.भुसावळ –** वरणगाव आयुध निर्माणी मध्ये योग दिनानिमित्त येथील कम्युनिटी हॉलमध्ये सकाळी योग दिन - योग ध्यान शिबिराच्या माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.रविंद्र माळी यांनी योग ध्यान शिबिरात सर्वांना प्राणायाम, योगासन आणि ध्यान याविषयी जागरुक करून देत मूलभूत नियमानुसार योगासन व ध्यान केले. त्यानंतर, त्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व आणि योग करा, निरोगी राहा याविषयी सर्वांना माहिती दिली. तसेच ओंकाराचे आपल्या जीवनातील महत्त्वही सांगण्यात आले. कार्यक्रमाला मुख्य महाव्यवस्थापक राकेशकुमार ओझा, स महाव्यवस्थापक महेश शिंदे, सह महाव्यवस्थापक एस.आर. पाटील, उपमहाव्यवस्थापक राठोड, भुवनेश्वर वर्मा, नाईकनवरे आणि सहायक कार्य व्यवस्थापक कोल्हे आणि राणे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन धनेश्वर चौधरी व गणेश तिवारी यांनी केले. कार्यक्रमात सर्व युनियन, असोसिएशनचे पदाधिकारी व रहिवासी यांनी सहभाग घेतला होता. योग दिन २०२४ची थीम योग 'स्वत:साठी आणि समाजासाठी' सशक्त आणि मजबूत बनविण्यावर भर देण्यात आला आहे.

**खंडाळा, ता.भुसावळ –** येथून जवळच असलेल्या तालुक्यातील किन्ही येथील सर्वोदय हायस्कूल येथे योगाचे महत्व लक्षात घेऊन शासकीय परिपत्रकानुसार २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. क्रीडा शिक्षक एम.एम. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एल.व्ही. फेगडे व सर्व शिक्षक यांच्या सहकार्यातून शाळेतील सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी योगाचे प्रात्यक्षिके सादर केली. त्याचप्रमाणे जीवनात योगा का आवश्यक आहे यासंदर्भात क्रीडा शिक्षकांनी महत्व विशद केले. कार्यक्रमात मुख्याध्यापक डी.सी. बाविस्कर, एस.इ. चौधरी, एम.एम.चौधरी, जी. आर. भोळे, ए.झेड. परदेशी, एस. एम. पाटील, एल. व्ही. फेगडे, जी.बी. सोनवणे, पी.डी. चौधरी, जे. ए. ढाके, आर.एस. नेहेते, ए.एन. इंगळे, एस.व्ही. भंगाळे, श्रीमती जे.व्ही. बाविस्कर, श्रीमती के.बी. जैस्वार, सौ.व्ही.पी.फिरके, सौ. एस.एस. चौधरी, सौ.एम.पी. पाटील, सौ.व्ही.एन. पाटील, सौ.एन.एन. चौधरी, सौ.जी.पी. महाजन, बी.एन. कोळी, पी.एम. पाटील, एच.पी.येवले, जी.डी. चौधरी, के.एस. तायडे, डी. आर. भिरुड, श्रीमती मंगला मेढे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## उद्या ब्राह्मण संघाची सर्वसाधारण सभा

**भुसावळ । प्रतिनिधी**

येथील ब्राह्मण संघाच्या सभासदांची सर्वसाधारण वार्षिक सभा उद्या रविवार, दि. २३ जून रोजी सायंकाळी ४ वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे. सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचन, चिटणीसांच्या व मागील वर्षांचे ताळेबंद व लेखापरीक्षकांचा अहवालास मंजूरी, लेखापरीक्षकांची नेमणूक, ब्राह्मण संघाच्या शतक महोत्सवी वर्षात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाविषयी सूचना व त्यासाठी विविध समित्यांचे गठन करणे यासह विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष व समस्त कार्यकारिणीने केले आहे.

## वांजोळे येथे वटपौर्णिमा उत्साहात साजरी

**वांजोळे, ता.भुसावळ । वार्ताहर**

पतीस दीर्घायुष्य लाभो यासाठी रितीरीवाजाप्रमाणे वटपौर्णिमेनिमित्त सुवासिनी महिलांनी वडाच्या झाडाला दोरा गुंडाळून झाडाची पूजा करण्यात आली. यावेळी महिलांनी एकमेकांना हळदीकुंकी दिले. तसेच विविध खेळांसह फुगड्या व उखाण्यांचा कार्यक्रम घेत अनोख्या पध्दतीने वटपौर्णिमा उत्साहात साजरी केली. यावेळी उपस्थित महिलांनी मनोगत देखील व्यक्त केले.

## राहुल गांधी यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा

**भुसावळ । प्रतिनिधी**

येथील नरवानजी फाईल येथी राजीव गांधी वाचनालयात युवा नेते खा. राहुल गांधी यांचा वाढदिवस जिल्हा अल्पसंख्यांक काँग्रेसतर्फे साजरा करण्यात आला. यावेळी वृक्षारोपण करून गरिबांना अन्नदान व मिठाई वाटप करण्यात आली. प्रसंगी जिल्हाध्यक्ष मो.मुनव्वर खान, माजी आमदार निळकंठ फालक, जे.बी. कोटेचा, आर.जी. चौधरी, गोविंदा पाटील, प्रदीप नेहेते, प्रा.हमीद शेख, संजय खडसे, सलिम गवळी, जगपालसिंग गिल, कैलास चौधरी, संदीप देवडा, डॉ.नईम मझहर, महेबुब खान, फिरोज खान यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## मृत महिलेची ओळख पटविण्याचे आवाहन

**भुसावळ । प्रतिनिधी**

येथील रेल्वे स्टेशन रोडवरील अमर स्टोअरजवळ रोडवर सार्वजनिक जागी दि. २८ मे २४ रोजी सायंकाळी एक अनोळखी भिकारी महिला नाव गाव माहित नाही हिचा मृतदेह आढळून आला. याबाबत रिक्षा चालक फहिम शेख सलिम बागवान (वय २४) यांनी दिलेल्या खबरीवरून भुसावळ बाजारपेठ पो.स्टे.त अकस्मात मृत्यु रजि.नं. ४४/२०२४ सीआरपीसी १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. सदर महिला कोणत्यातरी आजाराने अथवा वृध्दापकाळाने मयत झाली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. मयत महिला अंदाजे वय ६५ वर्ष, काळ्या सावळ्या रंगाची, चेहरा लांब गोल, केस पांढरे, मजबूत बांधा, अंगात लाल रंगाचा ब्लाऊज, जांभळ्या रंगाची साडी, श्रीराम लिहिलेला गमजा, गळ्यात तुळशीची माळ, उजव्या हातावर घोडगे असे अस्पष्ट लिहिलेले अशा वर्णनाची असून या महिलेस ओळखणाऱ्यांनी भुसावळ बाजारपेठ पो.स्टे.शी संपर्क साधावा. तपास हेकाँ रविंद्र भावसार करित आहे.

## क्षेत्रीय रेल्वे प्रशिक्षण संस्थेत हिंदी स्पर्धा पुरस्कार वितरण समारंभ

**भुसावळ । प्रतिनिधी**

येथील क्षेत्रीय रेल्वे प्रशिक्षण संस्थेत हिंदी स्पर्धा पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेअंतर्गत भुसावळ क्षेत्रीय रेल्वे प्रशिक्षण संस्थेत दि.१८ ते २१ जून २०२४ या कालावधीत तीन प्रमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हिंदी निबंध लेखन, हिंदी टिप्पणी आणि मसुदा लेखन, हिंदी भाषण स्पर्धा यांचा समावेश होता.

या स्पर्धेचा मुख्य उद्देश भारतीय रेल्वेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये हिंदी भाषेबद्दल जागरूकता आणि आवड निर्माण करणे हा होता. या स्पर्धेत विविध विभागीय रेल्वे आणि विविध युनिटमधील एकूण ६८ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेच्या शेवटी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ यांच्या हस्ते रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. अशा स्पर्धा केवळ हिंदी भाषेच्या समृद्धीला प्रोत्साहन देत नाहीत तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या भाषेचे कौशल्य वाढवण्याची संधी देखील देतात. भारतीय रेल्वेमध्ये हिंदीचा वापर अधिक मजबूत करण्यात या स्पर्धेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भविष्यातही असे कार्यक्रम हिंदीच्या प्रसारासाठी आणि त्याचा व्यापक वापर करण्यासाठी उपयुक्त ठरतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती इति पांडे, विशेष अतिथी म्हणून रेल्वे बोर्डाचे राजभाषा संचालक डॉ.बरुण कुमार, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रशासन सुनील कुमार सुमन, उपसंचालक (रेल्वे बोर्ड), राजभाषा, डॉ. सतविंदर सिंग, मुंबई मुख्यालयातील



वरिष्ठ राजभाषा अधिकारी श्रीमती दीपा मांडयान, सहायक संचालक (रेल्वे बोर्ड) राजभाषा श्रीमती सुनीता पुरकायस्थ उपस्थित होते. विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्रीमती इति पांडे यांनी आयोजक संघाचे कौतुक करताना त्यांना २५ हजार रूपयांची प्रोत्साहन रक्कम जाहीर केली.

## कंत्राटदारास किरकोळ वादातून मारहाण

**फेकरी, ता.भुसावळ । वार्ताहर**

तालुक्यातील निंभोरा बुद्रुक येथील सरपंच यांचे पती व कंत्राटदार यांना शिवीगाळ करीत फायटरने मारहाण करण्यात आली. ही घटना बुधवार, दि.१९ रोजी सकाळी ११.३० वाजेच्या दरम्यान घडली. या प्रकरणी दोघांन विरोधात भुसावळ तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. दुर्गेश रामदास कोलते (वय ३६, रा.निंभोरा) हे कंत्राटदार आहेत. संशयित विशालने किरकोळ वादातून नाकावर मारून दुखावत केली. तसेच डोक्यावर बुक्क्यांनी मारून दुखापत केली. याप्रकरणी विशाल सतीश महाजन व गोकुळ काशिनाथ लोहार (रा.फेकरी) यांच्या विरोधात भुसावळ तालुका पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास भुसावळ तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक बबन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रेमचंद सपकाळे करीत आहे.



## सुनसगाव येथील स्वच्छतागृहाला आडोसा भिंत बांधण्याची मागणी

**सुनसगाव, ता.भुसावळ । वार्ताहर**

येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या अंतर्गत बेलव्हाळ रस्त्यावर असलेल्या पुरुषांच्या मुतारीची दयनीय अवस्था झालेली असून मूळात या मुतारीला आडोसा भिंत नसल्याने शेजारी राहणाऱ्या रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

या मुतारीचे बांधकाम तत्कालीन सरपंच व सदस्य यांच्या काळात झालेले होते. विशेष म्हणजे या मुतारीला बेसीन तसेच पाण्याची टाकी व इतर सुविधा होत्या, परंतु सर्व सुविधा गहाळ झाल्याचे चित्र दिसत आहे. या मुतारीला आडोसा भिंत बांधणे आवश्यक आहे कारण मुतारीच्या समोर रहिवाशी घरे आहेत त्यामुळे या रहिवाशांना याचा त्रास होतो. संबंधित रहिवाशांनी ग्रामपंचायतकडे तोंडी तक्रार केली परंतु कोणीही लक्ष देत नसल्याने वार्ड क्रमांक एकच्या एका महिला ग्रामपंचायत सदस्याने या मुतारीला आडोसा भिंत बांधण्यात यावी असे सांगितले. मात्र ग्रामपंचायत सदस्याला सांगूनही काही फायदा झाला नसल्याचे सांगितले जात आहे. आता तरी सरपंच व सदस्य यांनी याकडे लक्ष देऊन या मुतारीला आडोसा भिंत बांधावी, अशी मागणी केली जात आहे.

## अतिक्रमणाला प्रशासनाचे पाठबळ : वाहतुकीचा खोळंबा

### वरणगाव रेल्वे स्टेशन रस्ता प्रत्यक्ष १८ मीटरचा मात्र बनवला जातोय १५ मीटरचा

**वरणगाव, ता.भुसावळ । वार्ताहर**

येथील बसस्थानकापासून तर रेल्वे स्थानकापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाची मागणी अनेक दिवसांपासून होती. हा रस्ता १८ मीटरचा असला तरी बस स्थानक ते महात्मा गांधी विद्यालयापर्यंत अवघ्या पंधरा मीटरचा होत असल्याने अतिक्रमणाला प्रशासनाकडून पाठबळ मिळत आहे.

रस्त्याचे काम सुरू असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहतुकीचा खोळंबा होत आहे. शहरात सर्वत्र अतिक्रमण होत आहे शासनाच्या जागेवरती पक्के बांधकाम करून ते भाड्याने देखील दिले जात आहे. मात्र याकडे नगरपालिका प्रशासन व बांधकाम विभाग सोयीचे दुर्लक्ष करीत आहे. नुकतेच बस स्थानकापासून ते रेल्वे स्थानकापर्यंत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू झाले. रेल्वे स्थानकापासून महात्मा गांधी विद्यालयापर्यंत १८ मीटरचा रस्ता पूर्ण करण्यात आला. मात्र महात्मा गांधी विद्यालय ते बस स्थानकापर्यंत अतिक्रमण नेमके कोणाचे हा प्रश्न सुटत नसल्याने या ठिकाणी १५ मीटरचा रस्ता केला जात आहे. पंधरा मीटरचा रस्ता झाल्याने प्रशासनाकडूनच अतिक्रमणाला पाठबळ मिळत असल्याचे नागरिकांमध्ये चर्चा आहे.

हे अतिक्रमण काढण्यासाठी बांधकाम विभागाने पुढे आले पाहिजे अथवा यामागे राजकीय शक्ती तर नाही असाही प्रश्न निर्माण होत आहे. मुठभर लोकांसाठी सर्वसामान्यांना रस्त्याचे रुंदीकरण होत नसल्याने या ठिकाणी नाराजी व्यक्त केली जात आहे.



# मराठा-ओबीसी नेते आरक्षणावरून आमने-सामने; देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले...

**मुंबई – आरक्षणाच्या मुद्द्यावरून ओबीसी आणि मराठा नेते आमनेसामने आल्याचे चित्र आहे. यातच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली. लोकसभा निवडणुकीनंतर मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा दोन्ही समाजातील नेते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहेत. काही झाले तरी ओबीसीतून आरक्षण मिळावे, यावर मनोज जरांगे पाटील ठाम आहेत.**



मराठा आरक्षणासंदर्भातील 'सगेसोयरे' अध्यादेशाची अंमलबजावणी करावी, मराठा-कुणबी एकच असल्याचा कायदा पारित करावा, आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत आदी मागण्यांची पूर्तता करण्यास सरकारला एक महिन्याची मुदत देत मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. तर दुसरीकडे ओबीसी आरक्षणाला धक्का न लागण्यासाठी लक्ष्मण हाके यांचे आंदोलन सुरू आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून ओबीसी आणि मराठा नेते आमनेसामने आल्याचे चित्र आहे. यातच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली.

लोकसभा निवडणुकीनंतर मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा दोन्ही समाजातील नेते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहेत. काही झाले तरी ओबीसीतून आरक्षण मिळावे, यावर मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. तर ओबीसी आरक्षणाला धक्का लागता कामा नये, यासाठी ओबीसी समाजातील नेते आग्रही आहेत. मीडियाशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले.

कायद्याच्या चौकटीत राहून हा प्रश्न सोडवणार आहे दोन समाजामध्ये तेढ निर्माण होऊ नये हा आमचा प्रयत्न आहे. यासाठी आमची सह्याद्रीवर बैठक आहे. आमचे अहित केले असे कोणत्याही समाजाला वाटू नये. कायद्याच्या चौकटीत राहून हा प्रश्न सोडवणार आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

दुसरीकडे, आम्ही दिलेल्या व्याख्येप्रमाणे आम्हाला आरक्षण दिले पाहिजे. ते टीकलेही पाहिजे, आम्हाला हैदराबादचे गॅझेटही लागू केले पाहिजे.

आम्हाला नेहमी यांनी फसवले आहे. कितीही फसवणूक केली तरीही मी समाजाला ओबीसीमधूनच आरक्षण मिळवून देणार, तुम्ही आम्हाला फसवले तर आम्ही तुम्हाला डुबवले म्हणून समजायचे. तुम्ही गोड बोलून आम्हाला फसवत आहात, आता आम्ही तुमचा कार्यक्रम करणार आहे, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. दरम्यान, राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने ओबीसी नेते उपोषणकर्ते लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांची भेट घेतली. शिष्टमंडळाने लक्ष्मण हाके यांना उपोषण सोडण्याची विनंती केली.

परंतु हाके उपोषणावर ठाम आहेत. ओबीसी आरक्षणास कसा धक्का लागत नाही, सगेसोयरेचे काय, हे सरकारने सांगावे. येथे निवडणुकांच्या माध्यमातून दहशत निर्माण केली जात आहे. हे महाराष्ट्राने पहिल्यांदाच पाहिले आहे. आमच्या प्रश्नाचे उत्तर नाही मिळाले नाही तर हे उपोषण सुरुच राहणार. आम्ही लेखी घेतल्या शिवाय उपोषण सोडणार नाही. आमचा जीव गेले तरी चालेल. आमच्या २९ टक्क्याला कुठेही धक्का लागणार नाही, हे लिहून द्यावे.

मागच्या दाराने निघालेले ५७ लाख प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे, अशी मागणी उपोषणकर्ते नवनाथ वाघमारे यांनी केली.

## वरळीत बिनशर्त पाठिंबा दिल्याने मुलगा आमदार झाला



मुंबई । वृत्तसंस्था

शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गटाने दणक्यात वर्धापनदिन साजरा केला. दोन्ही गटातील नेत्यांनी एकमेकांवर टीकास्त्र सोडले. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटासह भाजपा, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज ठाकरे यांच्यावर खोचक शब्दांत टोलेबाजी केली. उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेला आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे यांनी थेट शब्दांत उत्तर दिले.

राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. यावरून वर्धापनदिनाच्या सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्यावर टीका केली. या लोकसभा निवडणुकीमुळे मित्र कोण आणि शत्रू कोण हे समोर आलं आहे. काही जणांनी केवळ उद्धव ठाकरे नको म्हणून 'बिन-शर्ट' पाठिंबा दिला. उघड पाठिंबा म्हणजे बिनशर्ट पाठिंबा दिला. तर काही जणांनी भाजपाला विरोध करण्याचे नाटक करून पाठिंबा दिला. आम्ही नाटक करणारी माणसे नाही. नाटक ही कला आहे. आणि ही कला मोदींना जमते आम्हाला जमत नाही, या शब्दांत उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला. याला मनसे नेत्यांनी उत्तर दिल्यानंतर आता उद्धव ठाकरे यांचे पुतणे असलेल्या अमित ठाकरेंनी काकांना प्रत्युत्तर दिले.

**वरळीत बिनशर्त पाठिंबा दिल्याने मुलगा आमदार**

पत्रकारांशी बोलताना अमित ठाकरे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी 'बिनशर्ट पाठिंबा' हा केलेला विनोद समजायला १० मिनिटे लागली. वरळीत राज ठाकरे यांनी बिनशर्त पाठिंबा दिला होता, तेव्हा त्यांना काही वाटले नाही. तेव्हा पाठिंबा घेतला आणि मुलाला आमदार केले. या गोष्टी विसरता कामा नये. राज ठाकरेंनी जो पक्ष काढला आहे, तो स्वतःच्या मेहनतीवर काढला आहे. पक्ष मोठा व्हायला वेळ लागला असेल तरीही तो आपल्या मेहनीतवर काढलेला पक्ष आहे हे कुणी विसरु नये. विधानसभा निवडणुकीत आम्ही आमची शक्ती दाखवू, असे अमित ठाकरे यांनी ठामपणे सांगितले. तसेच आमदार निवडून दिला की, त्याच्याकडे काम करण्यासाठी पाच वर्षे असतात. कोरोना काळात वरळी मतदारसंघ, वरळी कोळीवाड्यात ज्याप्रकारे फिरायला पाहिजे होते, तसे ते फिरताना दिसले नाहीत. शेवटच्या तीन महिन्यांमध्ये काम करुन काही होणार नाही. या गोष्टी लोकांशी बोलल्यावर कळतील. आम्ही त्यांना या अपेक्षेने बिनशर्त पाठिंबा दिला नव्हता.

आमची विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु झाली आहे लोकसभेनंतर आता विधानसभा निवडणुकीच्या तयारीला सुरुवात झाली आहे. याबाबत माहिती देताना अमित ठाकरे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीसाठी मनसे पक्ष कामाला लागला आहे. विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी बैठक होती. मी सगळ्या विधानसभा मतदारसंघांमध्ये फिरणार आहे. लोकांना भेटून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहे. आमची विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु झाली आहे.

## बिहारमध्ये जे घडले ते घडेलच असे नाही !

### आरक्षणावर अशोक चव्हाणांची प्रतिक्रिया

मुंबई – मवाढीव आरक्षणाबाबत बिहारमध्ये जे घडलं ते महाराष्ट्रात घडेल अस मानायच काही कारण नाही. कारण सुक्रे समितीने मराठा समाज मागास असल्याचा अहवाल दिला आहे. अशी प्रतिक्रिया खासदार अशोकराव चव्हाण यांनी दिली. पाटणा उच्च न्यायालयाने बिहार सरकारने दिलेले वाढीव आरक्षण रद्द करण्याचा निर्णय गुरुवारी दिला. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला दिलेले दहा टक्के आरक्षण टिकेल काय? या विषयावर चव्हाण म्हणाले, सुप्रिम कोर्टाने निर्णय घेताना सांगितले आहे की, अपवादात्मक स्थितीमध्ये एखादा समाज मागासलेला म्हणून सिद्ध होत असेल तर त्या बाबतीत विचार करता येतो. महाराष्ट्राच्या प्रकरणात सुक्रे समितीने जो रिपोर्ट दिला आहे की मराठा समाज कसा मागासलेला आहे हे सिद्ध करुन तो दिला आहे.

## छगन भुजबळांवर जरांगे पाटील बरसले

## राजकीय करिअर उठवणार – जरांगे



ठाणे । वृत्तसंस्था

दोन समाजात वाद लावण्याचे काम सुरू आहे. आम्ही मराठ्यांनी हे सुरू केले नाही. ओबीसी आंदोलनामगे येवलेवाले आहेत. त्यांनीच दोन जणांना हाताशी धरून उभे केले आहे. तुम्ही आमची शाळा करणार का, राजकीय करिअर उद्ध्वस्त केले नाही तर नाव बदलतो, मग तुम्ही किती पळता ते पाहतो, या शब्दांत मनोज जरांगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आमच्या भविष्याचे वाटोळे केले. लोकांना आंदोलनाला बसवायचे जमते. वाहने पुरवली जात आहेत. गावखेड्यांमध्ये आम्ही एक आहोत. जे लढत आहेत, त्यांनाही कळत नाही की आपण कुणासाठी लढत आहोत. ते राजकारणी आहेत. राजकीय फायद्यासाठी हे सगळे सुरू आहे. निवडणूक झाल्यावर बघू, असे सांगत होते. आम्हीही आता निवडणूक झाल्यावर पाहतो. आम्हाला जातीय तेढ नको, म्हणून आम्ही शांत आहोत. परंतु, तुम्ही खोटे बोलणार असाल, कुणबी नोंदी रद्द करा, अशी मागणी करणार असाल, तर मग आम्हीही बघून घेतो, मराठ्यांनो सावध व्हा, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले. ताकदीने आरक्षण घेणार. सरकार कसे आरक्षण देत नाही, तेच आता पाहू. तिथे जाऊन जातीय तेढ निर्माण करा, हे तेच येवलेवाले करत आहेत. असे आंदोलन करतात का, आम्ही आंदोलन सुरू केल्यावर आमच्यासमोर तुम्ही कुणी उभे करणार. आम्ही ओबीसींना आरक्षण मिळू द्यायचे नाही, असे ठरवल्यास यांना किती वाईट वाटेल, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

## आदित्य ठाकरेंनी कुठून लढायचे ते आम्ही ठरवू - अंबादास दानवे



मुंबई । वृत्तसंस्था

शिवसेना एकच आहे, ही गद्दारांची सेना आहे. स्वत:चं अपयश लपवण्यासाठी मुर्खांच्या नंदनवनात राहणारे टीका करतायेत. काँग्रेसच्या मतांवर निवडून आलो असतो तर मागील वेळी काँग्रेसचा १ खासदार निवडून आला होता. आता १३ खासदार निवडून आलेत.

त्यामुळे मानसशास्त्रात याला आंबट गोड प्रतिक्रिया म्हणतात. काँग्रेसच्या मतांवर आम्ही निवडून आलो असं कुणी म्हणत असेल तर त्यांनी त्यांच्या उन्मादातच राहावे अशी टीका ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केली आहे. अंबादास दानवे म्हणाले की, आदित्य ठाकरेंनी कुठून लढायचं हे आम्ही ठरवू. तुम्हाला तुमच्या जागा निवडून आणण्यासाठी काय काय आटापिटा करावा लागला, किती नोटांचे खोके काढावे लागले. रात्री बेरात्री कोणाकोणाला भेटावे लागले, किती गुंडाची मदत घ्यावी लागली याचाही हिशोब द्यावा. भिवंडीतून लढा, वरळीतून लढा, कुठून लढायचे ते लढतील. महाराष्ट्र त्यांचा आहे.

त्यामुळे सल्ले देण्याची आवश्यकता नाही. तुम्ही तुमच्या जागा वाचवा. निव्वळ पैशाच्या ताकदीवर तुम्ही जिंकत असाल तर ही तुमची सूज आहे. ज्यादिवशी तुमचे पैसे संपतील तेव्हा कुत्रंही विचारणार नाही असं त्यांनी सांगितले.

तसेच ज्या आमदारांवर अपात्रतेची कारवाई प्रलंबित आहे. विधानसभा अध्यक्षांनी एकांगी भूमिका घेतली, सुप्रीम कोर्टात प्रलंबित असताना आमदारांना मतदानाचा अधिकार आहे का? उद्या यातून कुणी निवडून आले तर त्या ११ जणांचे भवितव्य काय? कायदेशीर सल्ला घेऊन विधान परिषदेच्या ११ जागांबाबत निर्णय घेऊ. महाविकास आघाडी म्हणूनच आम्ही लढू.

निवडणुकीला बराच काळ आहे उमेदवार कोण यावर चर्चा होईल असं दानवेंनी म्हटलं. दरम्यान, माध्यमे एकांगी बाजूने भूमिका घेतो, नाना पटोलेंचा फोन घेतला नाही म्हणून माध्यमांनी हलकल्लोळ माजवला. आज महायुती पदवीधर, शिक्षक मतदारसंघात ३ उमेदवार आहेत. हे असतानाही प्रसार माध्यमे महायुती ३ बाजूला ३ ओढतायेत.

रामदास कदम उघड उघड बोलतायेत. प्रकाश आंबेडकर यांना भाजपाची बी टीम अशाप्रकारेच लोक संबोधतात आणि ओळखतात. ते जर आमच्यासोबत असते तर निकालाचे चित्र आणखी वेगळे असते. भाजपाचे लोक बोलत होते, आम्हाला ४०० जागा द्या, घटना बदलायचीय. हिंदु राष्ट्र बनवू अशी विधाने भाजपा नेतेच करत होते. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली घटना भाजपाला बदलायची आहे आणि अजूनही तेच मनसुबे आहेत असा आरोप अंबादास दानवेंनी भाजपावर केला असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# रामदास कदम बेजबाबदारपणे बोलताहेत!

## एकनाथ शिंदेंनी समज द्यावी; अजित पवार गट आक्रमक



मुंबई । वृत्तसंस्था

अजित पवार आणि देवेंद्र फडणवीसांचा शपथविधी यशस्वी झाला असता तर तुम्ही विरोधात असता, असा पलटवार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने शिवसेना शिंदे गटावर केला आहे. अजित पवार थोडे उशीरा आले असते, मंत्रिमंडळ विस्तार झाला असता तर ती ९ मंत्रिपदे आम्हाला मिळाली असती. अजितदादांबाबत प्रचंड आदर आहे. ते धाडसी व्यक्ती, प्रशासनावर पकड असलेले नेते आहेत. पण अजितदादा आणखी लेट आले असते तर आमच्या शिवसेनेचा फायदा झाला असता, असे सांगत शिवसेनेच्या वर्धापन दिन सोहळ्यादरम्यान रामदास कदम यांनी लोकसभा निवडणुकीतील महायुतीच्या पराभावचे खापर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार गटावर फोडण्याचा प्रयत्न केला. यावरून आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आक्रमक झाला असून, रामदास कदम यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समज द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. रामदास कदम यांच्या विधानावरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटातील तणाव वाढण्याची चिन्हे असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी रामदास कदम यांच्या विधानांचा खरपूस शब्दांत समाचार घेतला आहे. ते पत्रकारांशी बोलत होते. रामदास कदम यांनी शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त काही वक्तव्य केली आणि त्यानंतरही आक्षेपार्ह शब्द वापरले. महायुतीत चांगल्या पद्धतीने समन्वय राहिला पाहिजे. रामदास कदम हे बेजबाबदार पणे बोलत आहेत. रायगड मध्ये रामदास कदम यांचे योगदान काय? तुमचे तेवढे मूल्य आहे का? तुमच्या पात्रते प्रमाणे मुख्यमंत्र्यांनी तुम्हाला ठेवले आहे. तुमची पात्रता असती, तर तुम्हाला मंत्री केले असते. आम्ही ऐकून घेणार नाही, या शब्दांत पाटील यांनी प्रत्युत्तर दिले.

**मुख्यमंत्र्यांनी रामदास कदम यांना समज द्यावी**

रामदास कदम यांच्या मतदारसंघात ठाकरे गटाच्या उमेदवाराला लीड मिळाली आहे. मुख्यमंत्र्यांनी रामदास कदम यांना समज द्यावी. लोकसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांच्याबद्दल चुकीचे गैरसमज पसरवले जात आहे. महायुती म्हणून एकत्र निवडणूक लढणार. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांचा पहिला शपथ विधी यशस्वी झाला असता तर तुम्ही विरोधात असता, असे पाटील यांनी स्पष्टपणे सुनावले. दरम्यान, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी रामदास कदम यांच्या वक्तव्याला प्रत्युत्तर देत टीका केली आहे. यासंदर्भात अमोल मिटकरी यांनी एक ट्विट केले आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, रामदास कदमजी आपण जोरात बोललात. मागुन आलेले अजित दादा थोडे उशिरा आले असते तर बरं झालं असतं माहितीसाठी सांगतो ते वेळेत आले म्हणून तुमची लंगोट तरी वाचली उशिरा आले असते तर हिमालयात जप करायला जावं लागलं असतं दादांची कृपा म्हणून तुम्ही वाचलात हे विसरू नका, असे अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे.

## स्थानिक निवडणुकांना मुहूर्त मिळेना!

### सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या...



नागपूर । वृत्तसंस्था

राज्यात यंदा दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. १४ जिल्ह्यांत सुरुवातीच्या सरासरीच्या १०० टक्के तर पाच जिल्ह्यांत ७० टक्के पाऊस झाला आहे. यामुळे शेतकरी शेतीच्या कामाला लागला आहे. स्थानिक निवडणुकांना मुहूर्त मिळेना! सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या...

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या दोन वर्षांपासून होत नसताना पावसाळ्यामुळे हजारो सहकारी संस्थांच्या निवडणुकाही पुढे ढकलण्यात आल्या आहेत. राज्यातील ८३०५ सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या निवडणुका महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३कब मधील तरतुदीनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत राबविण्यात येतात. २०२४-२५ या वर्षात राज्यातील २४,७१० सहकारी संस्थांची निवडणूक प्रलंबित आहे. यापैकी ८३०५ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरु होती. ती पावसामुळे ३० सप्टेंबर पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

पावसाळा आणि शेतकरी शेतीत व्यस्त असणार या कारणामुळे राज्य सरकारने ही निवडणूक पुढे ढकलण्याचा आदेश काढला आहे. राज्यात यंदा दमदार पावसाला सुरुवात झाली आहे. १४ जिल्ह्यांत सुरुवातीच्या सरासरीच्या १०० टक्के तर पाच जिल्ह्यांत ७० टक्के पाऊस झाला आहे. यामुळे शेतकरी शेतीच्या कामाला लागला आहे. यामुळे निवडणुका घेणे उचित ठरणार नाही, असा विचार राज्य शासनाने केला आहे. नव्या वर्षात निवडणुकीस पात्र असलेल्या सहकारी संस्था तसेच आतापर्यंत पुढे ढकलण्यात आलेल्या सुमारे ३८ हजार ७४० सहकारी संस्थांच्या निवडणुकांना राज्य सरकारने यापूर्वी ३१ मेपर्यंत स्थगिती दिली होती. आता पावसाळा संपल्यानंतर विधानसभा लागणार आहे. यामुळे या निवडणुकांना जानेवारीच उजाडण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात...



### मारवड येथे कृषी अधिकारी कार्यालयामार्फत बीज प्रक्रिया जनजागृती दिवस साजरा

▶▶ अमळनेर । प्रतिनिधी

तालुक्यातील मारवड येथे अमळनेर तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत बीज प्रक्रिया जनजागृती दिवस साजरा साजरा करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख यांची १२५ वी जयंती निमित्ताने १७ जून ते १ जुलै या कालावधीत कृषी विभागाकडून कृषी संजीवनी पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. या पंधरवड्याच्या पहिल्या दिवशी तालुक्यातील मारवड येथे बीजप्रक्रिया जनजागृती दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कृषी सहायक महेंद्र पवार यांनी मार्गदर्शन करताना बीजप्रक्रियेबाबत माहिती देत प्रात्यक्षिक करून दाखवले. या पंधरवड्यात पी. एम. किसान उत्सव दिवस, जमीन सुपीकता, गुणवत्तापूर्ण निविष्ठा, ग्रामीण रोजगार हमी योजना, पीकविमा, सोयाबीन-मका-कडधान्य लागवड तंत्रज्ञान, कृषी महिला शेतकरी सन्मान दिन, पिकांवरील कीड व रोग, शेतकरी मासिक या सर्व विषयांवर कृषी विभागामार्फत संपूर्ण तालुक्यातील मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम यशस्वितेसाठी तालुका कृषी अधिकारी ठाकरे, मंडळ कृषी अधिकारी कोठावदे, व कृषी पर्यवेक्षक खैरनार यांचे मार्गदर्शन लाभले.

### पिंपळगाव परिसरातील अवैध धंद्याची थेट ज्ञानेश्वर अहिरे यांची मंत्रालयात तक्रार

▶▶ सातगाव (डों), ता.पाचोरा । वार्ताहर

पिंपळगाव पोलिस स्टेशन हद्दीत व सातगाव परिसरात अवैध धंदे बोकळावले आहेत त्यामुळे गावातील अनेकांना जीव गमवावा लागला आहे .हे धंदे त्वरित बंद करण्यात यावेत अशी मागणी सातगाव डोंगरी येथील सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर अहिरे यांनी प्रधान सचिव, सामान्य प्रशासन, विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.पिंपळगाव तसेच सातगाव डोंगरी परिसरात गावठी दारुभट्ट्या सर्रासपणे सुरू आहेत.अनेक तरूण व्यसनाधीन होत आहेत याचा परिणाम म्हणून २०/२५ वर्ष वयोगटातील सन २०२०/२४ आज पावेतो १८/२० मुले दारूच्या आहारी जाऊन तरुणपणीच मृत्यूमुखी पडले आहेत. यापुर्वी पिंपळगाव पोलीस स्टेशनने काही वेळा कारवाया केल्याचे निदर्शनास झाले मात्र त्यानंतरही हे धंदे सुरुच आहेत.तरुण अकाली मृत्युमुखी पडल्याने अनेकांचे संसार मुले आई वडील उघड्यावर आले आहेत. त्यांच्या उदरनिर्वाहचा ? निर्माण झाला आहे.



### परिश्रम गतिमंद शाळा पारोळा महाराष्ट्र राज्य नाशिक विभागातून दिशा मॉडेल स्कूल म्हणून निवड

▶▶ पारोळा । श.प्र.

तालुक्यातील वंजारी शिवारातील परिश्रम मतिमंद मुला मुलींची निवासी शाळेला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई व आयुक्त दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे,छखचक सिकंदराबाद व जय वकिल फौंडेशन व रिसर्च सेंटर, मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिशा अभ्यासक्रम २०२३-२४ यशस्वीपणे अंमलबजावणी केली त्याबद्दल नाशिक विभाग दिशा इम्प्लेमेंटिंग स्कूल २०२३-२४ प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.नाशिक विभागातून एकमेव परिश्रम मतिमंद मुला मुलींची निवासी शाळेची निवड करण्यात आली.महाराष्ट्र राज्यातून १७४ शाळा दिशा अभ्यासक्रम अंमलबजावणी शाळांची निवड करण्यात आली होती.बौध्दिक अक्षम प्रवर्गातील विशेष शाळांमध्ये हा अभ्यासक्रम राबविण्यात येतो.डॉ.योगेश रघुनाथ महाजन अध्यक्ष, परिश्रम मतिमंद मुला मुलींची निवासी शाळा पारोळा यांचा प्रशस्तीपत्र व सत्कार मानसिंग पावरा वैसाका, धुळे जि प दिव्यांग कल्याण विभाग, सुनील वाघ संस्थापक अध्यक्ष यमुनाई शैक्षणिक व सामाजिक महिला मंडळ संचलित श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह, श्रीमती शुभांगी देसाई ,दिशा अभियान प्रमुख, यांचे हस्ते देण्यात आले.समवेत शाळेचे मुख्याध्यापक मनिष जाधव, उपमुख्याध्यापक हेमंत महाजन, जगदिश सोनवणे विशेष शिक्षक, कुणाल महाजन तसेच स्नेहल बाईत ,कोकण विभाग समन्वयक, जयपाल राठोड, नाशिक विभाग समन्वयक, आकाश पाटील नाशिक विभाग समन्वयक तसेच धुळे,जळगाव व नंदुरबार जिल्ह्यातील मुख्याध्यापक व विशेष शिक्षक उपस्थित होते.

### तरुणाला फूस लावून पळविले, अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

▶▶ अमळनेर । प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळी प्र. जळोद येथील १७ वर्षीय तरुण कामाला जातो असं सांगून घरून निघाला मात्र तो परत घरी न आल्याने कुणीतरी अज्ञाताने त्याला पळवून नेल्याप्रकरणी अमळनेर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. तालुक्यातील पिंपळी प्र. जळोद येथील आकाश गोरख थोरात (वय-१७) हा आपल्या कुटुंबासह राहतो.१२ जून रोजी सकाळी ७ वाजता कामाला जातोय असे सांगून तो घरून निघाला मात्र सायंकाळ झाली तरी घरी न आल्याने कुटुंबाने आकाश चे मित्र,नातलग यांच्याकडे विचारपूस केली.मात्र आकाश कुठेही न आढळल्याने त्याला कुणीतरी अज्ञाताने फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# गरीब विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करणारी भानुबेन गो-शाळा - ना. अनिल पाटील

## गो-शाळेत जनकल्याण ग्रुपतर्फे १००४ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

▶▶ अमळनेर । प्रतिनिधी

कोविड काळात अन्नछत्र, दुष्काळात चारा छावणी, टँकर द्वारा पाणीपुरवठा व २०१५ पासून सुमारे ४०० गोमातांचे संरक्षण व संवर्धन याबरोबरच गेल्या सहा वर्षांपासून गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करणारी भानुबेन बाबुलाल शहा गोशाळा, अमळनेर ही अभिनंदनास पात्र असल्याची भावना मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी व्यक्त केली.

तसेच हर्षा बेन सावला यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथील जनकल्याण ग्रुप दरवर्षी हजार गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य साठी आर्थिक मदत करत असतात त्यांचाही आदर्श समाजाने घ्यावा असेही उद्गार मंत्री पाटील यांनी गोशाळेत १००४ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षपदावरून बोलताना काढले. यावेळी व्यासपीठावर जनकल्याण ग्रुप मुंबईच्या जागृती कोठारी, मोना शहा, हर्षा बेन सेठ, रश्मी शहा, सरला मामी पुरिया, निशा गोरडिया, रुहल घथलिया ,सारिका मोदी, रघुवीर स्वीट दिलीप भाई, एम टी सी ग्रुप के संजय मेहता व भानुबेन बाबूलाल शहा गोशाळेचे सचिव चेतन शहा उपस्थित होते .कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा .अशोक पवार यांनी केले. सूत्रसंचालन दयाराम पाटील सर तर स्वागत गीत मेघा पाटील व विद्यार्थिनींनी म्हटले.

दरम्यान भानूबेन बाबूलाल शहा, गोशाळा, अमळनेर व युवा कल्याण प्रतिष्ठान अमळनेर या संस्थांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात जनकल्याण ग्रुप मुंबईच्या वतीने मोनाबेन शहा यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे भाषण झाले .मुंगसे, बहादरवाडी, हिंगोने बुद्रुक, नंदगाव, लाडगाव, शिरसाळे, ढेकू सिम, हिंगोने खू.प्र., दहिवद खुर्द ,वाक टूकी, खोकर पाठ ,येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना तर समता युवक कल्याण केंद्र प्राथमिक शाळा, साने गुरुजी प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय प ष्टाने, पिंपळे रोड भिल्ल वस्ती, ताडेपुरा, शनी पेठ, गोशाळा परिसर, जैन मंदिर कर्मचाऱ्यांची पाल्य, येथील गरीब व गरजू विद्यार्थ्यास प्रत्येकी सातशे रुपये पर्यंतचे शैक्षणिक साहित्य एक हजार चार विद्यार्थ्यांना देण्यात आले. सर्व विद्यार्थी व शिक्षक, पालकांची भोजनाची व्यवस्था कार्यक्रम स्थळी करण्यात आली होती. पत्रकार बांधव देखील यावेळी उपस्थित होते.



सदर कार्यक्रमास माजी अप्पर जिल्हाधिकारी एच. टी. माळी, मंगळ ग्रह संस्थेचे अध्यक्ष राजू महाले, वीरेंद्र शहा, प्रकाश पारेख, निवृत्त मुख्याधिकारी प्रभाकर सोनवणे, माजी नगरसेवक श्याम पाटील, चेतन सोनार, प्रफुल्ल सिंघवी, बिपिन कोठारी, गिरीश शहा, डॉ शहा, आदी मान्यवर उपस्थित होते ,कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय पाटील ,योगेश पाटील, परदेशी सर ,डी ए पाटील ,विक्रम पाटील ,वाणी सर , भारती गाला, मालती पाटील, अर्चना गिरीश वर्मा ,रोहित सोनार, उमेश सोनार, अजय शहा, अथर्व डेरे, दिलीप डेरे प्रकाश डेरे, रमेश धनगर ,मुकेश महाजन, किसन महाराज ,सलीम भाई तडवी, महेश राजपूत, मनीष राजपूत, भैय्या पवार, रमेश पावरा, रतिलाल पावरा, लालू पावरा व छत्रपती शिवाजी महाराज गार्डन ग्रुपचे सदस्य आदींनी कठोर परिशन घेतले.

## पातोंडा मा.विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



▶▶ पातोंडा,ता.चाळीसगाव । वार्ताहर

येथील माध्यमिक विद्यालयात १९९५/९६ या वर्षात शिक्षण घेत असलेल्या माझी विद्यार्थयांचे आपल्या जन्म गावाबद्दल व आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळे बद्दलच प्रेम ज्या शाळेत श्रमदान देऊन शाळा उभी केली अगदी पाया भरणी पासून तर शाळेचे साहित्य स्तलांतर करून शिवाय मैत्रीची अशी अनोखी दाद मिळवणारे आणि सर्व गुरू जणांना एकत्र आणून स्नेहसंमेनाचे आयोजन करून संपूर्ण शाळेला नवीन रंगात रंगून नवे स्वरूप प्राप्त करून दिले आणि पंच क्रोशित ह्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी शाळेच्या प्रती एक आगळी वेगळी च नाळ जोडली आहे जी ह्या मित्र मैत्रिणी यांना जोडून ठेवते.

तसेच ह्या बॅच मधील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे आपल्या मित्रांची सुख दुःखात काळजी घेत असतात शिवाय ह्या बॅच मधील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी हे विविध पदांवर कार्यरत असून त्यांच्या मैत्रिणी पण ह्यात कमी नाहीत त्यांचे यजमान पण विविध स्तरावर कार्यरत असून ह्या ग्रुप ला पण त्यांचे मोलाचे योगदान लाभते ह्या अश्या बॅच कडून बरेच शिकण्या सारखे आहे जिथे रक्ताची नाती कमी पडतात तिथे मैत्रीची नाती जपण्यात हे कधीच कमी पडत नाहीत गावचा विकास व्हावा ह्या दृष्टीने ह्या बॅच मधील सरपंच आणि पोलीस पाटील पण ह्यात मोलाचे सहकार्य करतात आता नुकतेच आपल्या गावा लगत वाहत असणारी नदी तितूर माई सौंदर्यीकरण व सुशोभीकरण व वृक्षरोपण करण्यासाठी या विद्यार्थ्यांनी मदत करून एक आदर्श ठेवला तसेच त्यांना संपूर्ण मित्रांची आणि मैत्रिणीची मोलाची साथ लाभते.

## शिव व्याख्याते प्रदीप देसले यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार

▶▶ गुढे ता.भडगांव । वार्ताहर



येथून जवळच असलेल्या लोण पिराचे येथील भुमिपुत्र तथा सुप्रसिद्ध शिव व्याख्याते राष्ट्रीय सहकारी शिक्षण प्रसारक मंडळ चाळीसगांव संचलित माध्यमिक विद्यालय कळमडू येथे कार्यरत शिक्षक प्रदीप देसले सर यांना नुकताच अखिल भारतीय मराठा महासंघ तर्फे आदर्श समाजसेवक पुरस्कार नुकताच श्रीक्षेत्र पदमालय येथे नवनिर्वाचित खासदार स्मिता वाघ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच मराठा महासंघाचे पदाधिकारी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानपत्र स्मती चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन जळगाव जिल्हा मराठा महासंघाच्या वतीने भव्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस संभाजी राजे दहातोंडे, राष्ट्रीय संघटक डॉ गजेंद्र भोसले अखिल भारतीय मराठा महासंघ जळगांव जिल्हाध्यक्ष दिलीप बापू पाटील उपाध्यक्ष पी.एम.पाटील जिल्हा संपर्क प्रमुख खुशाल बिडे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश पाटील जिल्हा कोषाध्यक्ष अशोक भोसले जिल्हा, जिल्हा संघटक डॉ बी.बी.भोसले जिल्हा सल्लागार संभाजी इंगळे, मच्छिंद्र पाटील जिल्हा सचिव साहेबराव पाटील उबाठा गटाच्या जिल्हाध्यक्ष सौ.महानंदा पाटील पंचायत समिती सभापती तथा पद्मालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष आनंदराव पाटील आणि इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. प्रदीप देसले सर गेल्या दहा वर्षोपासून महाराष्ट्रभर शिव व्याख्याते म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांचा दैदिप्यमान इतिहास खेडोपाडी पोहचवत आहेत तसेच इतर राष्ट्रीय पुरुष यांचे देखील कार्य ते जयंती व पुण्यतिथी निमित्त लोकांना प्रबोधन करत असल्याने त्यांच्या कार्याची दखल मराठा महासंघाने घेऊन त्यांना मानाचा आदर्श समाजसेवकपुरस्कार देऊन गौरविण्यात आले त्याचे चाळीसगांवचे आ मंगेश चव्हाण, कुषीभूषण वुक्षमित्र अरुण निकंम, राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे माजी व्हा. चेअरमन डॉ संजय देशमुख,सर्वोदय शिक्षण संस्थेचे चेअरमन विकास पाटील पाचोरा भाजपा विधानसभा क्षेत्रप्रमुख अमोल शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

## विविध ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

### आदर्श विद्यालय

▶▶ पारोळा । श. प्र.

येथील न्यु पीपल्स एज्युकेशन सोसायटी संचालित आदर्श माध्यमिक विद्यालय व्यंकटेशनगर शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील योग शिक्षक उमेश विसावे यांनी निरामय जीवनासाठी योगाचे महत्व विशद केले तसेच प्राणायाम व सूक्ष्म व्यायाम यांचे प्रात्यक्षिके दाखविले. त्यांच्यासोबत सर्व विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील योग साधना केली. यावेळी संस्थापक डॉ शांताराम दाजीबा पाटील,डी बी पाटील, सी एम पाटील, एस. आर. पाटील, शैलेश पाटील, एकनाथ राठोड, प्रदीप कुमार पाटील, मनीषा वसावे, गणेश पाटील भागवत सोनवणे उपस्थित होते

### बोहरा सेंट्रल स्कूल

▶▶ पारोळा । श. प्र.

येथील बोहरा सेंट्रल स्कूल येथे जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला, यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकारी पारोळा यांच्या मार्गदर्शनाखाली पारोळा येथिल बोहरा सेंट्रल स्कूल येथे जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला, यादिवशी परिवारासह नियमित योगासन करुन आपल्या संपर्कातील सर्वांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी,प्रत्येक विद्यार्थ्याला,१० लोकांना सर्व प्रकारच्या व्यसनापासून दूर करण्याची जबादारी देण्यात आली, आज जवळपास १५०० मुलांना प्रत्येकी १० या प्रमाणे १५ हजार लोकांना व्यसन सोडण्यासाठी प्रवृत्त करण्याची जबाबदारी देवून व्यसन मुक्तीची शपथ देण्यात आली. आणि जळगांव जिल्हा कॅन्सर मुक्त करण्यासाठी डॉ.योगेंद्र पवार वैद्यकिय अधिकारी यांनी ही शपथ दिली, यावेळी सर्व योग साधक आणि बोहरा सेंट्रल स्कूल पारोळा येथील चेअरमन, संचालक, प्राचार्य, शिक्षक आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### प.रा. विद्यालय

▶▶ धरणगाव । प्रतिनिधी

येथील प. रा. विद्यालय ,राष्ट्रीय छात्र सेना, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिनानिमित्त योग शिक्षक गोपाल चौधरी यांच्याकडून विद्यार्थ्यांनी योगासने, योग साधना व प्राणायामचे धडे घेतले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक डॉ. संजीवकुमार सोनवणे यांनी योगारोग्याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने योगासनांसह प्राणायाम केला. रोज एक तास योगा व प्राणायामासाठी देणार असल्याचा संकल्प योग शिक्षक गोपाल चौधरी यांनी सुमारे ६१२ विद्यार्थ्यांकडून करून घेतला. याच वेळी आचार्य श्री महाश्रमण यांच्या अहिंसा यात्रनिमित उपस्थित साधू संतांमधून वर्धमानमुनी यांनी विद्यार्थ्यांना योगाचे मार्गदर्शन केले. क्रोध नाहीसा करण्यासाठी, मन एकाग्र करण्यासाठी, श्वासावर नियंत्रणासाठी विविध योग प्रकार विद्यार्थ्यांकडून घेतले.

कार्यक्रमाला संस्थेचे संचालक अजय पागारीयां, महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मेजर डॉ.अरुण वळवी, उपमुख्याध्यापिका डॉ. आशा शिरसाठ, पर्यवेक्षक कैलास वाघ, एनसीसी चीफ ऑफिसर डी.एस.पाटील, डॉ. बी.डी.शिरसाठ, गणेशसिंह सूर्यवंशी, निरज शिंदे, रामचंद्र धनगर,महेश पाठक, नवनीत सपकाळे, ज्ञानेश्वर कोळी, राजेश ठाकरे, वाय ए पाटील, डॉ. वैशाली गालापुरे, सुरेखा तावडे, वंदना सोनवणे यांच्यासह ४० शिक्षक व १५० पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डी.एस. पाटील यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. अरूण वळवी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, राष्ट्रीय छात्र सेनेचे जुनिअर सीनियर डिव्हिजनचे विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

### मा.विद्यालय शेळावे

▶▶ शेळावे ता पारोळा । वार्ताहर

दि.२१ जून आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त माध्यमिक विद्यालय शेळावे तालुका पारोळा येथे योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला विद्यालयातील सकाळ सत्र व दुपार सत्रातील विद्यार्थ्यांना एकत्र बोलून सकाळी सात वाजता योगशिक्षक श्री आर पी पाटील यांनी सुरुवातीला विद्यार्थ्यांना योग विषयी मार्गदर्शन केले. तसेच योग केल्यामुळे माणसाचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते म्हणून रोज योग करून आपले आरोग्य सुदृढ कसे होईल याविषयी सखोल मार्गदर्शन केले नंतर सर्व विद्यार्थी व शिक्षक बंधू यांनी सामूहिकरीत्या योगासने करून घेतले योग दिनानिमित्त विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.बी. कोळी सर तसेच योग शिक्षक आर. पी. पाटील सर, एन.टी. पाटील सर श्रीमती सरोदे मॅडम श्रीमती रूपाली सोनवणे मॅडम सी. एस. पाटील सर, सुनील पाटील सर, एम. एस. पारधी सर, श्रीमती सायली देसले मॅडम तसेच विद्यालयाचे भाऊसाहेब डी. एच. पाटील कैलास पाटील व श्री हेमंतराव पाटील उपस्थित होते. योग दिन विद्यालयात उत्साहात पार पडला.

### पतंजली योगपीठ

▶▶ अमळनेर । प्रतिनिधी

येथील पतंजली योगपीठ मार्फत दहावा जागतिक योग महोत्सव महिला योग साधकांच्या मार्फत साजरा करण्यात आला. याप्रसंगी 'महिला सशक्तीकरणासाठी योग साधना' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक श्री गजानन माळी यांनी यावेळी मार्गदर्शन करताना योग साधनेचे आयुष्यातील महत्त्व व महिलांच्या मानसिक व शारीरिक स्वास्थ्याच्या माध्यमातून महिला सशक्तिकरणामध्ये मोलाचे ठरेल असे सांगितले.

याप्रसंगी विविध योगासनांची व प्राणायमचे प्रात्यक्षिक उपस्थित महिला साधकांनी केलीत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रभारी ज्योती पाटील, तालुका प्रभारी रत्ना भदाणे, योगशिक्षिका कामिनी पवार, आरती पाटील, सविता पाटील आदींनी परिश्रम घेतले तर उपस्थित योग साधकांमध्ये प्रमुख योगसाधक प्रतिभा पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी शैलजा शिंदे यांचेसह महिला योग साधक यावेळी उपस्थित होत्या.सदर कार्यक्रमास खा.श्रीमती स्मिता वाघ व संदिप घोरपडे यांचे सहकार्य लाभले.सौ. रत्ना भदाणे यांनी आभार मानले.
















### जि.प.शाळा तांबोळे

▶▶ शेळावे ता पारोळा । वार्ताहर

जि.प.शाळा तांबोळे ता पारोळा येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. त्या अगोदर मुख्याध्यापक श्री .विलास पाटील सर यांनी योग करण्याचे फायदे विद्यार्थ्यांना व गावातील नागरिकांना सांगितले योग केल्यास आपले शरीर निरोगी व सुदृढ राहते.या कार्यक्रमासाठी शा.व्य समिती अध्यक्ष भरत युवराज भिल ,विशाल गोपाळ,महेंद्र भिल इ.मान्यवरांची उपस्थिती होती.श्री .विनोद पाटील सर यांनी विद्यार्थ्यांन कडून योगाचे प्रात्यक्षिक करुन घेतले.



## बस आगारातून दुचाकी लंपास

**जळगाव ।** शहरातील बस आगारातील मागच्या शेडच्या आवारातून एकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. अजितद खान बसिद खान वय-४२, रा. कासमवाडी, जळगाव हे बस आगारातील शेडमध्ये ते नोकरीला आहे. त्यांची दुचाकी (एमएच १९ बीई २८१०) ही आगारातील शेडमध्ये पार्किंगला लावलेली असतांना अज्ञात चोरट्याने चोरून नेली. त्यांनी याबाबत जिल्हापेठ पोलिसात तक्रार दिली.



**जळगाव –** जन्मोजन्मी हाच पती मिळावा आणि पतीला दीर्घ आयुष्य लाभावे, अशी प्रार्थना करत वटवृक्षाला सूत गुंडाळून सुवाशिनींनी वटपौर्णिमेचा सण साजरा केला.

### थोडक्यात...



## डॉ. भिसेंनी स्वीकारला अधिष्ठातापदाचा पदभार

**जळगाव ।** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठातापदाचा पदभार डॉ. सदानंद भिसे यांनी शुक्रवार दि. २१ जून रोजी सकाळी ११ वाजता स्वीकारला. मावळते अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकुर यांनी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करीत पदभार दिला. त्यानंतर घेण्यात आलेल्या समारंभात डॉ. गिरीश ठाकूर यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांची बदली अलिबाग येथे त्यांच्या मूळ पदावर झाली. तर जळगावच्या अधिष्ठातापदी परभणी येथील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. सदानंद भिसे यांची नियुक्ती राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने गुरुवार दि. २० रोजी डॉ. सदानंद भिसे यांनी शुक्रवार दि. २१ जून रोजी सकाळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठाता पदाचा पदभार मावळते अधिष्ठाता डॉक्टर गिरीश ठाकुर यांच्याकडून स्वीकारला. यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये डॉ. गिरीश ठाकुर यांचा निरोप समारंभ घेण्यात आला. समारंभामध्ये मंचावरती दोन्ही अधिष्ठाता, उप अधिष्ठाता डॉ. मारोती पोटे, डॉ. किशोर इंगोले, प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय बनसोडे, अतिरिक्त वैद्यकीय अधीक्षक डॉ. धर्मेंद्र पाटील, अधिसेविका प्रणिता गायकवाड उपस्थित होते. यावेळी डॉ. ठाकूर यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. तसेच डॉ. ठाकूर यांचाही सन्मान नवीन अधिष्ठाता डॉ. भिसे यांनी केला.

## वटवृक्षांच्या रोपांचे वाटप



**जळगाव ।** येथील खूबचंद सागरमल विद्यालय वटसावित्री पौर्णिमेनिमित्त वड या झाडांची रोपे वाटप करण्यात आली. याप्रसंगी सरकारी वकिल स्वाती निकम, ॲड भारती कुमावत, मुख्याध्यापिका योगिनी बेंडाळे, राष्ट्रीय हरित सेना प्रमुख प्रवीण पाटील, लक्ष्मीकांत महाजन, योगेंद्र पवार, भास्कर कोळी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## सावखेडा गावातून एकाची पाण्याची मोटार लंपास

**जळगाव ।** तालुक्यातील सावखेडा गावातून ११ हजार रुपये किमतीची पाण्याची इलेक्ट्रिक मोटर चोरून येण्याची घटना बुधवारी १९ जून रोजी सकाळी ६ वाजता समोर आली आहे. याबाबत गुरुवारी २० जून रोजी रात्री १० वाजता जळगाव तालुका पोलिसात अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला.समाधान विश्राम सोनवणे वय ४४ रा. सावखेडा ता. जळगाव ते आपल्या कुटुंबासह वास्तव्याला असून शेती काम करून ते आपला उदरनिर्वाह करत असतात. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी ११ हजार रुपये किमतीची इलेक्ट्रिक पाण्याची मोटार चोरून येण्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी समाधान सोनवणे यांनी पोलिसात तक्रार दिली.

## नूतन मराठा महाविद्यालयातून दुचाकी लांबविली

**जळगाव ।** शहरातील नूतन मराठा महाविद्यालयाच्या पार्किंग झोन मधून एकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना बुधवारी १९ जून रोजी दुपारी २ वाजता समोर आली आहे. याप्रकरणी गुरुवारी २० जून रोजी दुपारी दीड वाजता जिल्हापेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. रविंद्र नवल पाटील वय-५७, रा. श्रीकृष्ण कॉलनी, जळगाव हे आपल्या परिवारासह वास्तव्याला आहे. दरम्यान ते नूतन मराठा महाविद्यालयात नोकरीला आहे. बुधवारी १९ जून रोजी सकाळी ११ वाजता ते दुचाकी (एमएच १९ एव्ही ९२३५) ने महाविद्यालयात आले होते. त्यावेळी त्यांनी महाविद्यालयाच्या पार्किंग झोनमध्ये दुचाकी पार्क करून लावली व कामावर निघून गेले. दरम्यान अज्ञात चोरट्यांनी ही दुचाकी चोरून नेली. दुपारी २ वाजता ते दुचाकीजवळ आले असता दुचाकी चोरी झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्यांनी दुचाकीचा सर्वत्र शोध घेतला, पण दुचाकीबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही. अखेर गुरुवारी २० जून रोजी दुपारी दीड वाजता त्यांनी जिल्हापेठ पोलिसात धाव घेऊन तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दोन हजार विद्यार्थ्यांचे योग प्राणायाम

## जिल्हा प्रशासन, विद्यापीठ, महापालिकेतर्फेही योग दिनाचे प्रात्यक्षिक

**जळगाव । प्रतिनिधी**

दहावा आंतरराष्ट्रीय योगा दिन जळगाव मधील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात २ हजारापेक्षा अधिक खेळाडू, विद्यार्थी आणि नागरिकांनी सहभागाने उत्साहात साजरा झाला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने आणि जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगांव, नेहरू युवा केंद्र संघटन, जिल्हा क्रीडा शिक्षक महासंघ, जिल्हा क्रीडा संघटना महासंघ, जिल्हा योग संघटना, पतंजली योग समिती, भारत स्वाभिमान न्यास, यांचे संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल येथे सकाळी ७.०० वाजता जळगांव जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.

योगदिनाच्या कार्यक्रमाला यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकीत,प्रशिक्षणार्थी आय. ए. एस. अधिकारी वेवोतोलु केजो, शिक्षणाधिकारी माध्यमिक जयश्री चव्हाण, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अनिकेत पाटील, नरेंद्र, समन्वयक नेहरू युवा केंद्र संघटन, सरला पाटील गट शिक्षणाधिकारी, खलील शेख, गट शिक्षणाधिकारी, विनोद बियाणी, जयश्री पाटील, समाधान बर्कले, पतंजली योग समिती, डॉ अनिता पाटील, जिल्हा हौशी योग असोसिएशन, प्रा डॉ नारायण खडके, शिव छत्रपती पुरस्कार्थी, किशोर चौधरी, सुमेध तळवेलकर, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी आदी मान्यवर उपस्थीत होते. जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी सर्व मान्यवरांचे योगाचे पुस्तक देऊन स्वागत केले. त्या नंतर कॉमन योगा प्रोटोकॉलनुसार सर्व उपस्थितांनी योगासने आणि प्राणायाम केले. प्रात्यक्षिक क्रीडा शिक्षक स्मिता बुरकुल, श्वेता कोळी यांचे मार्गदर्शनाखाली सादर केले.

**यांनी घेतले परिश्रम**

सर्व विद्यार्थ्यांना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालया मार्फत सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. उपस्थितांचे आभार सुजाता गुल्हाणे, क्रीडा अधिकारी यांनी मानले.





कार्यक्रम यशस्वी करण्या करीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे मिनल थोरात, किशोर चौधरी, भारत देशमुख, विनोद कुलकर्णी, उमेश मराठे, गोविंद सोनवणे, विनोद माने, संजय महिरे, सुरज पवार, अविनाश महाजन यांनी परिश्रम घेतले.

**डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय**

येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक योग दिनानिमीत्त सामुहिक योगा दिना-चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, फिजीओथेरेपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नागूलकर, रजीस्ट्रार राहुल गिरी, होमिओपॅथी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.बी. पाटील यांच्यासह वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर, प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी डॉक्टर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी विविध योगासने केली. योगाचे प्रात्याक्षिक स्मीता चौधरी आणि माधुरी राणे यांनी सादर केले.

**कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त घेण्यात आलेल्या योग प्रात्यक्षिकांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सर्व घटक विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी १० वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा केला. विद्यापीठाच्या पदवी प्रदान सभागृहात सकाळी ७ ते ८ या वेळेत प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत तसेच महाराष्ट्र १८ एन.सी.सी. बटालियन सेनेच्या विद्यार्थ्यांसह साजरा केला. आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र- कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सचिन नांद्रे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, जिमखाना प्रमुख डॉ. के.एफ. पवार, १८ महाराष्ट्रीयन बटालियन राष्ट्रध्वज सेना मेजर सुभेदार प्रेमसिंग यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

**महापालिकेतर्फेही योगा दिन**

महापालिका प्रशासनातर्फेही जागतिक योग दिनानिमीत्त शहरातील सरदार वल्लभभाई पटेल सभागृहात कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महापालिकेचे आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, सहाय्यक आयुक्त पल्लवी भागवत यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध योगासने सादर केली.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

जळगावातील बँक ऑफ महाराष्ट्र ने ऑफिसर्स क्लब जळगाव येथे जिल्हा प्रशासन यांच्या सहकार्याने जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले. योग दिना साठी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, बँक ऑफ महाराष्ट्र जळगाव अंचल प्रबंधक प्रवीण कुमार सिंह, सहायक आयुक्त समाज कल्याण योगेश पाटील, ऑफिसर्स क्लब जळगाव चे सर्व सदस्य व बँक ऑफ महाराष्ट्र जळगाव शहरा-तील अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. या योग शिबिरासाठी योग गुरु आचार्य आदित्य जहागीरदार व तनया पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

## शिरसोली रस्त्यादरम्यान कंटेनरचा अपघात

**जळगाव । प्रतिनिधी**

**महामार्गावर वाहतूक ठप्प**

तालुक्यातील शिरसोली ते वावडदा दरम्यान एक अवजड कंटेनर रस्त्याचा अंदाज न आल्यामुळे रस्त्याच्या खाली उतरून अपघात झाल्याची घटना गुरूवार २० जून रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास घडली आहे. यात कंटेनरचा अर्धा भाग रस्त्याच्या खाली व अर्धा रस्त्यावर असल्यामुळे महामार्गावर वाहतूकीचा खोळंबा झाला होता. दरम्यान रात्री एक वाजेपर्यंत क्रेन येईपर्यंत वाहतूक सुरळीत करण्याचे काम एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी हे करीत होते.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, सदरहू कंटेनर क्रमांक (एमएच १९ झेड ४२०७) हे जळगाववरून मुंबईकडे निघाले होते. सर्व कंटेनरमध्ये माल भरलेला होता. शिरसोली ते वावडदा दरम्यान हॉटेल फौजी जवळ चालकाला रस्त्यावरचा अंदाज आला नाही. त्यामुळे ते रस्त्याच्या खाली उतरले. मात्र त्याचे पुढील चाक रस्त्याच्या खाली तर मागील भाग हा महामार्गावरच अडकून पडला. त्यामुळे इतर वाहनांना जाण्या येण्याचा मार्ग बंद पडल्याने जवळजवळ रस्ता बंदच झाला. घटनेमध्ये कोणीही जखमी झाले नाही अथवा जीवित हानी झालेली नाही. एमआयडीसी पोलीस स्टेशनला घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. सदरहू कंटेनर हा हटवता येत नव्हता. त्यामुळे दोन क्रेनची मदत घेण्यात येणार आहे. रात्री एक वाजेपर्यंत क्रेन येण्याची पोलीस वाट पाहत होते. दरम्यान वाहतूक सुरळीत करण्यासाठी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे कर्मचारी प्रयत्न करत होते. घटनास्थळी पंचक्रोशीतील ग्रामस्थ देखील जमा झाले होते.

## उपखेडचे तिघे जण निर्दोष

**जळगाव ।** उपखेड, ता. चाळीसगाव जि. जळगाव येथील सौ. ज्योतीबाई विश्वास कापडणे हिला तिच्या अंगावर रॉकेल टाकून तिला पेटवून तिचा खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपातून उपखेड येथील आरोपी मारोती महारु पाटील, कैलास मारोती पाटील व भूषण मारोती पाटील या तिघांची जळगाव येथील मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश एम.क्यू.एस.एम. शेख यांनी निर्दोष मुक्तता केली. तिनही आरोपींतर्फे जळगाव येथील ॲड. वसंत आर ढाके यांनी बचावाचे काम पाहिले. त्यांना ॲड. प्रसाद ढाके ॲड. निरंजन ढाके ॲड. श्याम जाधव यांनी सहकार्य केले.

## शहरातून अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविले

**जळगाव । प्रतिनिधी**

**तालुका पोलिसांत गुन्हा दाखल**

शहरातील भद्रकाली परिसरातील एका भागात राहणारी ११ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने काहीतरी आमिष दाखवत फूस लावून पाळवून नेल्याची घटना बुधवारी १९ जून रोजी सायंकाळी ५ वाजता समोर आली आहे. याप्रकरणी गुरुवारी २० जून रोजी मध्यरात्री दोन वाजता जळगाव तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस सूत्राने दिलेली माहिती अशी की, जळगाव शहरातील भद्रकाली चौक परिसरातील एका भागात ११ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही वास्तव्याला आहे. दरम्यान बुधवारी १९ जून रोजी सायंकाळी ५ वाजता नातेवाईकांकडे भेटायला जाते, अशी सांगून ती घरातून निघून गेली. दरम्यान तिला अज्ञात व्यक्तीने काहीतरी आमिष दाखवत तिला फूस लावून पळवून नेले आहे. अशी तक्रार पिडीत मुलीच्या तिच्या नातेवाईकांनी दिली आहे. त्यानुसार गुरुवारी २० जून रोजी मध्यरात्री २ वाजता जळगाव तालुका पोलिसात अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नयन पाटील करीत आहे.

## जैन इरिगेशनतर्फे श्री संत मुक्ताबाई रामपालखीचे स्वागत

**जळगाव । प्रतिनिधी**

टाळांची किण किण, मृदंगाचा नाद, विणेच्या तारेतून निघालेला तो मंद स्वर, जोडीला पंडीत भिमसेन जोशी यांच्या स्वरातली अजरामर अभंगवाणी तसेच रामकृष्ण हरी, आदी शक्ती मुक्ताबाई की जय हा जय घोष यामुळे जैन हिल्स येथील व्हीआयपी गेटचा परिसर भक्तीमय झाला नाही तर नवलच! हा प्रसंग आहे श्रीराम मंदिर संस्थान (कान्हदेशद्वारा संचालित) जळगाव ते श्रीक्षेत्र पंढरपूर येथे जाणाऱ्या वारीच्या स्वागताचा!



गेल्या दोन दशकांहून अधिक वर्षांपासून श्रीराम मंदिर संस्थानच्या पंढरीसाठी निघालेल्या पायी पालखी, वारीचे स्वागत पौर्णिमेच्या नियोजित दिवशी करण्यात येते. रितीरिवाजानुसार जैन हिल्सच्या व्हीआयपी गेटजवळ पोहोचली. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीतर्फे जैन परिवारातील सौ. ज्योती अशोक जैन, सौ. निशा अनिल जैन, सौ. शोभना अजित जैन तसेच अथांग व सौ. अंबिका जैन यांच्यासह कंपनीतील वरिष्ठ अधिकारी व सहकाऱ्यांतर्फे भव्य स्वागत करण्यात आले. जैन परिवारातील सदस्यांनी श्रीसंत मुक्ताबाई यांच्या पादुकांची पूजा केली. त्यानंतर सुलभा जोशी, मानव संसाधन विभागाचे पी. एस. नाईक, जी आर पाटील, एस. बी, ठाकरे, राजेश आगीवाल, सिक्युरिटी विभागाचे प्रमुख आनंद बलौदी, आर. डी. पाटील, एम.पी बागुल, संजय सोनजे, अजय काळे, जीआरएफचे विश्वस्त डॉ. सुदर्शन अयंगार, समन्वयक उदय महाजन, डॉ. आश्विन झाला, अब्दुलभाई, गिरीश कुळकर्णी यांच्यासह जैन हिल्स येथील सुमारे ४०० स्त्री-पुरुष सहकाऱ्यांनी पालखीचे दर्शन घेतले. मेहरुणच्या शिवाजी उद्यानातील संत मुक्ताबाई मंदिरात पुजेचा मान जैन इरिगेशनला दिला जातो. यावर्षी कंपनीच्यावतीने सहकारी अनिल जोशी यांच्याहस्ते ही पूजा केली गेली.

# महायुती सरकारच्या पुतळ्यावर काँग्रेसची चिखलफेक

## विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही तयार; जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार यांची माहिती

**जळगाव । प्रतिनिधी**

जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे महायुती सरकार विरोधात चिखलफेक आंदोलन जिल्हाध्यक्ष बाळासाहेब प्रदीप पवार यांचे नेतृत्वाखाील करण्यात आले. यावेळी महायुती सरकारच्या प्रतीकात्मक पुतळ्याला चिखल मारून निषेध करण्यात आला.

या प्रसंगी आमदार शिरीष चौधरी माजी जिल्हाध्यक्ष संदीप पाटील, माजी जि. प सदस्य प्रभाकर सोनवणे, माजी नगराध्यक्ष दारा मोहमद हरीश गणवाणी, जळगांव शहराध्यक्ष श्याम तायडे, डॉ ए.जी भंगाळे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेश पाटील, महिला जिल्हाध्यक्ष सुलोचना वाघ ,जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर





कोळी, जिल्हा सरचिटणीस आत्माराम जाधव, जिल्हा उपाध्यक्ष डॉ जगदीश पाटील, युवानेते धनंजय चौधरी, आशुतोष पवार, मुक्ताईनगर तालुकाध्यक्ष, दिनेश पाटील, व्हीजे एन टी अध्यक्ष सुभाष जाधव, ओबीसी अध्यक्ष डी डी पाटील, जामनेर तालुकाध्यक्ष शंकर राजपूत, जिल्हा उपाध्यक्ष एस टी पाटील, पाचोरा सचिन सोमवंशी, भडगांव तालुकाध्यक्ष रतीलाल महाजन, सेवादल अध्यक्ष संजय पाटील, बोडवड दिलीप पाटील, पिंटू पाटील, चोपडा अध्यक्ष नंदकिशोर संगोरे, जळगाव तालुकाध्यक्ष मनोज चौधरी, धरणगाव तालुकाध्यक्ष व्ही डी पाटील, शहराध्यक्ष अनंत परीहार, रावेर तालुकाध्यक्ष डॉ राजेंद्र पाटील, अमळनेर गोकुळ बोरसे, वाशिम काझी, देवीदास ठाकरे, मीराताई सोनवणे, युवराज खडके, दीपक सोनवणे,जलील पटेल, डॉ ऐश्वरी राठोड, यांचे सह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

**तेव्हा भाजपाच्या महिला कुठे होत्या? - प्रदीप पवार**

लोकसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेस पक्षाला चांगले यश मिळाले आहे. जळगाव जिल्ह्यात देखिल भाजपाच्या उमेदवारांचा लीड तब्बल तीन लाखाने कमी करण्यात आम्ही यशस्वी झालो. त्यामुळे आता आगामी विधानसभेच्या निवडणुकीसाठी आम्ही तयार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार यांनी दिली. तसेच नाना पटोलेंविरोधात भाजपाच्या महिलांनी केवळ इव्हेंट केला. मणिपूरमधील महिलांची धिंड निघाली तेव्हा भाजपाच्या महिला कुठे होत्या? कुस्तीपटूंचे भाजपाच्या खासदाराने लैंगिक शोषण केले तेव्हा ह्या महिला कुठे होत्या? असा सवालही प्रदीप पवार यांनी उपस्थित केला.

## थोडक्यात...



## शिवसेना शिंदे गटातर्फे यावल न.पा.ला कामांचे निवेदन

**यावल । प्रतिनिधी –**

यावल नगरपालिका आज रोजी शिंदे गट शिवसेना तर्फे दोन-तीन कामांचे निवेदन नगरपालिका मुख्याधिकारी यांना देण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने यावल येथील शमशानभूमीमधील ज्या ठिकाणी प्रेत जाळले जाते, त्या ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहे ते त्वरित बुजून नीटनेटके रॅम करण्यात यावा. स्मशानभूमीची दररोज साफसफाई करण्यात यावी. स्मशानभूमी सुशोभीकरण रंगरंगोटी करण्यात यावी. या संदर्भात नगरपालिका यांना निवेदन सादर करून मागणी करण्यात आली. याप्रसंगी समाजसेवक तथा शिंदे गट शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख नितीन सोनार व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

## अमळनेर बसस्थानकात ४२ हजारांचा मुद्देमाल चोरीस

**अमळनेर । प्रतिनिधी –**

येथील बस्थानकावर अज्ञात चोरट्यानी महिलेच्या गळयातील मंगल पोत व पर्स मधील रोख रक्कम असा ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला असून अमळनेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रजनी राजाराम चव्हाण रा.धुळे ह्या पती राजाराम चव्हाण व मुलगी वैशाली बडगुजर यांच्या सोबत २० रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास बुऱ्हाणपूर-शिर्डी बस क्र. एम एच १४ बी टी २२०४ मध्ये चढत असतांना अज्ञात व्यक्तीने गळयातील १२ ग्रॅम वजनाची ३६ हजार किमतीचे मंगळपोत आढळून आली नाही. तर मुलगी वैशाली बडगुजर हिच्या पर्स मधून ६ हजार रुपये रोख व बँकेचे ए टी एम चोरीला गेल्याचे आढळून आले असून याबाबत अज्ञात चोरट्याविरुद्ध अमळनेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## लाडकूबाई प्राथमिक विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा

**भडगाव । प्रतिनिधी –**

कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था संचलित लाडकुबाई प्राथमिक विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेतील शिक्षक श्री अनंत हिरे व श्री सुयोग पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष योगासने करून दाखवली. हिरे सर यांनी विद्यार्थ्यांना निरोगी आयुष्यासाठी योगासनाचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले. विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले त्यामध्ये वज्रासन, ताडासन, पद्मासन, भुजंगासन, नौकासग, वक्रासन, चक्रासन, पर्वतासन, मयूरासन, शवासन, वृक्षासन, कोनासन, वज्रासन, इत्यादी प्रकारचे योगासने करून दाखवले. शाळेचे मुख्याध्यापक श्री कमलेश शिंदे सर यांनी निरोगी आयुष्यासाठी विद्यार्थ्यांना योगासनाचे महत्त्व सांगितले तसेच नियमित योगासने करण्याची शपथ विद्यार्थ्यांना दिली. शाळेचे मुख्याध्यापक श्री कमलेश शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला. शाळेतील शिक्षक श्रीमती संगीता शेलार, सुनिता देवरे, अनिता सैंदाणे, ज्ञानेश्वर गांगुर्डे, अनंत हिरे, सुयोग पाटील, सचिन पाटील, हरिचंद्र पाटील, किरण पाटील व शिक्षकेतर कर्मचारी चंद्रकांत पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साठी परिश्रम घेतले.

# ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही - ना. गिरीश महाजन

**जामनेर । प्रतिनिधी –**

कोणत्याही परिस्थितीत ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, हीच सरकारची भूमिका असून या भूमिकेत कधीही बदल होणार नाही. असा विश्वास राज्याचे ग्रामविकास मंत्री व भाजपाचे संकट मोचक नामदार गिरीश महाजन यांनी यावेळी व्यक्त केला.

सरकारच्या भूमिकेवर विश्वास ठेवून उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घ्यावे, तसेच महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती यावेळी नामदार महाजन यांनी केली.

ओबीसी आरक्षणाच्या रक्षणासाठी वडीगोद्री येथे उपोषणास बसलेल्या लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची आज नामदार गिरीश महाजन, राज्याचे उद्योगमंत्री ना. उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री ना. अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे, आमदार गोपीचंद पडळकर आदी मान्यवर भेट घेतली.


सरकारचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी उपोषणकर्त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली.



**ओबीसी आरक्षणासाठी उपोषणास बसलेले लक्ष्मण हाके यांची भेट घेताना व त्यांच्याशी चर्चा करताना नामदार महाजन उद्योग मंत्री नामदार सामंत व इतर.**

## खंडव्यात ३.६ तीव्रतेच्या भूकंपाची नोंद

**बऱ्हाणपूर । प्रतिनिधी –**




खांडव्यात आज सकाळी ९.०५ च्या सुमारास भूगर्भीय हालचाली जाणवल्या. सकाळी ०९:०४:१९ वाजता, भू-स्थानिक केंद्र २१.७७ अंश उत्तर अक्षांश, ७६.५३ अंश पूर्व रेखांश ३.६ तीव्रतेचा भूकंप नोंदवण्यात आला आहे. बॉम्बस्फोटाचा आवाज दूर कुठून तरी आल्यासारखे भूकंपाचे धक्के जाणवत होते.

नागचून रोडवरील हाऊसिंग बोर्ड कॉलनी, एलआयजी, कीर्ती नगर, नवकार नगर, गुलमोहर कॉलनी, आनंद नगर, माता चौक, इमलीपुरा, हातमपुरा, सिंहगड तलाई, छायगावमखान आदी ठिकाणच्या लोकांनी याची पुष्टी केली. जलेबी चौक गुलमोहर कॉलनी येथून एका व्यक्तीचा फोन आला की, तो चहा पीत असताना कप कंपनामुळे हातातून निघून गेला. तसेच कीर्ती नगर येथील एक गृहिणी कंपन जाणवल्याने घराबाहेर पडली. हातमपुरा शिवाजी चौकात कंप जाणवला.घरात बसलेले लोक हादरले.



## चाळीसगाव परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**चाळीसगाव। प्रतिनिधी**

चाळीसगाव परिसरातील शाळा, महाविद्यालय, कॉलेजात आतंरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना योगाचे महत्व सांगून, त्यांच्याकडून योग करुन घेण्यात आला.

**चाळीसगाव महाविद्यालय–** शहरातील बी. पी. आर्ट्स एस.एम. ए. सायन्स अँड के. के. सी. कॉमर्स कॉलेज आणि के. आर. कोतकर ज्युनिअर कॉलेज येथे दि. २१ जून हा दिवस आंतराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात संकाळी योग वर्ग घेण्यात आला.

योगगुरु उपप्राचार्य प्रा. डी. एल. वसईकर आणि प्रा. एन. बी. बडगुजर यांनी सर्वांकडून योगाविषयी प्रात्यक्षिके घेऊन मार्गदर्शन केले. तसेच सर्वांना योग साधनेचे महत्त्व आणि त्याची माहिती विषद केली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अजय काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे एन.सी.सी. विभाग, एन.एस.एस. विभाग, क्रीडा विभाग तसेच ए. बी. बॉईज हायस्कूलचा एन.सी.सी. विभाग, ए. बी. गर्ल्स हायस्कूलचा एन.सी.सी. विभाग या सर्व विभागांचे अधिकारी, विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एन.सी.सी. विभाग प्रमुख डॉ. आर. एन. चंदनशिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

**आदिवासी आश्रमशाळा देवळी–** नानासो. उत्तमराव पाटील आदिवासी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा देवळी येथे योग दिन साजरा करण्यात आला. शाळेतील क्रीडा शिक्षक शरद सूर्यवंशी व भूषण बहिरम यांनी योगाचे महत्त्व व उपयोग याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. योगासन विविध आसनांचा सराव करून घेतला. यावेळी मुख्याध्यापक, अधिक्षक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन पाटील यांनी केले.

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ओझर–** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा ओझर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात आला. शालिग्राम निकम यांनी योग दिनाचे महत्व सांगितले. योगशिक्षक सतीलाल सोनवणे व योगिता पाटील यांनी योगाची प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यांच्यासोबत विद्यार्थ्यांनी कृतियुक्त सहभाग नोंदवला.

यावेळी ग्रेडेड मुख्याध्यापिका छाया पाटील, सहशिक्षिका मंदा चव्हाण , वंदना पाटील, संध्या शिंपी, धनंजय आमले, दिलीप महाजन व प्रियंका चौधरी आदि उपस्थित होते .

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी ॲक्शन मोडवर

**यावल । प्रतिनिधी –**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी एक्शन मोड पर आले असुन जामनेर जिल्हा जळगाव येथील विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थांना संस्था चालकांच्या भोंगळ गलथान व दुर्लक्षीत कारभारने विद्यार्थ्यांना निकृष्ठ जेवणासह शासकीय सोयी सुविधा व आदी योजनापासुन वंचीत ठेवण्यात येत असुन, संप्तत झालेल्या विद्यार्थी पालकांनी व आखिल भारतीय आदिवासी विकास परिषद या संघटनाच्या वतीने प्रकल्प अधिकारी यांची भेट घेवुन आपल्या तक्रारी मांडल्यात. यावेळी प्रकल्प अधिकारी अरूण पवार यांनी संबधीत स्कुलच्या शिक्षकांना चांगलेच धारेवर धरून पंधरा दिवसांच्या आत विद्यार्थ्यांच्या बाबतच्या सर्व तक्रारींचे निराकरण न झाल्यास आपण संस्थेची मान्यता रद्द करू अशी तंबी दिली आहे.



या संदर्भात आदिवासी विद्यार्थ्यांचे पालकवर्ग व आदिवासी बांधवांच्या न्याय हक्कासाठी लढा देणारी आखिल भारतीय आदिवासी विकास परिषदच्या संयुक्तरित्या देण्यात आलेल्या तक्रार निवेदनात म्हटले आहे की, जामनेर जिल्हा जळगाव येथील जैन इंटरनॅशनल स्कुलमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना गेल्या अनेक दिवसांपासुन निकृष्ठ प्रतिचे अवेळी जेवण दिले जात आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना एकच गणवेश व नाईट ड्रेस दिला जातो, विद्यार्थ्यांना वेळेवर वहया पुस्तके मिळत नसल्याने त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर मोठा परिणाम होत आहे.

विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वस्तीगृहाची अत्यंत दयानिय अवस्था झाली असुन त्यांना दिले जाणारे गादया, चादर, अंघोळीचे साबण, तेल, इत्यादी वस्तु या नावालाच दिल्या जात असुन, या ठीकाणी वस्तीगृहातील शौचालयची अवस्था ही अत्यंत वाईट असल्याची तक्रार पालकांनी केली आहे.

मुले आणी मुली हे एकाच वस्तीगृहात राहतात. याशिवाय अनेक तक्रारी या निवेदनात करण्यात आल्या असुन, विद्यार्थी पालक व संघटनेच्या पदाधिकारी यांनी प्रकल्प अधिकारी अरुण पवार यांची भेट घेवुन समस्यांचा पाढाच वाचला.

यावेळी जैन इन्टरनॅशनल स्कुलचे उपप्राचार्य निविन वानखेडे यांना प्रकल्प अधिकारी अरूण पवार यांनी आलेल्या तक्रारीबाबत १५ दिवसात दुरूस्ती करावी अशी सक्त ताकीद दिली असुन , १५ दिवसानंतर प्रकल्प स्तरीय समिती संबधीत स्कुलला भेट देवुन तक्रारींचे निराकरण झाले आहे का नाही याची तपासणी करेल. त्या जर दुरूस्ती आढळुन न आल्यास संबधित संस्थेविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल असा इशारा प्रकल्प अधिकारी पवार यांनी दिला आहे.

प्रकल्प अधिकारी यांना दिलेल्या निवेदनावर आखिल भारतीय आदिवासी विकास परिषदचे जळगाव जिल्हा अध्यक्ष नामा पावरा , संस्थेचे धुळे जिल्हा अध्यक्ष प्रविण पावरा यांच्यासह आदि पदाधिकारांच्या स्वाक्षरी आहे. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रशांत माहुरे , प्रकल्प विकास निरिक्षक जावेद तडवी, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मिनाक्षी सुल्ताने यांच्यासह आदि अधिकारी उपस्थित होते.

## रस्त्यांवर अवैध चाऱ्यांमुळे अपघात, सा.बां.विभागाचे मात्र दुर्लक्ष

**मुक्ताईनगर। प्रतिनिधी –**

तालुक्यातील नांदवेल ते कुऱ्हा काकोडापर्यंत करण्यात आलेल्या डांबरी रस्त्यावर शेतकऱ्यांतर्फे मोठ्या प्रमाणात अवैध चाऱ्या काढण्यात आल्या असल्याने रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात लहान मोठ्या अपघातांच्या संख्येत झाली आहे. याकडे मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे सबसे दुर्लक्ष आहे.

मुक्ताईनगर तालुक्यात मोठ्या प्रमाणात लोकप्रतिनिधींतर्फे विकास कामांसाठी निधी खर्च करण्यात आला आहे त्यात गटारी बांधकामे रस्ते या कामांचा समावेश आहे. त्याच माध्यमातून मुक्ताईनगर तालुक्यात डोलारखेडा पासून पुन्हा काकोडा पर्यंत डांबरी रस्ते तयार करण्यात आले आहेत. परंतु नव्याने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांवर शेतकऱ्यांनी अवैधरित्या रस्ते खोदून त्या रस्त्यांमधून पाईपलाईन कनेक्शन केलेले आहे.



प्रत्येक वेळेस नवीन रस्ता सुरू असताना त्यावेळेस हे खोदकाम न करता सदर रस्ता पूर्णपणे तयार झाल्यानंतर तो रस्ता मधोमध खोदला जातो व त्या ठिकाणी मोठमोठ्या चाऱ्या काढण्यात येतात. या साऱ्यांमुळे वेगाने असलेले वाहन या चारीत जोराने आदळते व बऱ्याचदा मोटर सायकलवर असलेले महिला पुरुष लहान बालक रस्त्यावर आदळतात त्यामुळे मोठ्या प्रमाणात लहान मोठे अपघात होत असतात. यामुळे काही वाहनधारकांना आपले अवयव गमवावे लागले आहेत तर काहींना मोठ्या प्रमाणात दुखापती झालेल्या आहेत नांदवेल पासून कुऱ्हा काकोडापर्यंत जाताना डांबरी मुख्य रस्त्यावर शेकडो ठिकाणी अशा चाऱ्या खोदलेल्या असल्याने वाहन चालकांना वाहन चालवताना अक्षरश तारेवरची कसरत करावी लागते.

याकडे तसेच शेतकऱ्यांच्या बांधाच्या पलीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आखत्यारीत तसेच महसूल विभागाच्या अखत्यारीत असलेल्या अनेक झाडांची कत्तल केली जात आहे.

याकडे सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे याकडे प्रशासनाने त्वरित लक्ष पुरवून भविष्यात होणारे अपघात थांबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# योग साधनेने ज्ञानात भर पडते - डॉ. हाजी हारून सेठ

**सावदा । प्रतिनिधी –**

आजच्या या धकाधकीच्या युगात बहुतांशी नागरिकांना आपल्या शरीर व्यवस्था या कडे दुर्लक्ष करीत असतात रोजच्या दैनंदिन जीवनात होणाऱ्या धावपळीमुळे आरोग्याकडे आपल्याला लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. आज मितीस प्रत्येकाने विद्यार्थी जीवना पासून सकाळचा थोडा वेळ योग साधनेसाठी राखलाच पाहिजे. त्यामुळे आपले शरीर संपत्ती सारखे कोणतेही सुख नाही निरोगी राहीलच आनंदी जीवणासह आपल्या ज्ञानातही भर पडते, असे प्रतिपादन डायमंड स्कूल चे अध्यक्ष डॉ हाजी हारून यांनी प्रतिपादन केले.




**डायमंड स्कूल येथे योगाभ्यास करताना विद्यार्थी.**

इकबाल शेख हुसैन मल्टीपर्पस फाऊंडेशन संचलित डायमंड स्कूल येथे योगाभ्यासाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी डॉ हाजी हारून सेठ फाउंडेशन चे अध्यक्ष नाजिम शेख, डायरेक्टर प्रोफेसर मोहसीन सर, डायरेक्टर सय्यद अहसान सर, सुपरवाइजर समन मॅडम, डायमंड स्कूलच्या मुख्याध्यापिका कविता मॅडम, मुख्याध्यापक अशपाक पठाण सर प्रशिक्षिका शितल मेढे मॅडम, प्रोफेसर तौसिफ सर, रुपाली मॅडम, स्वाती मॅडम, मोहसिन सर, प्रिती मॅडम, क्रीड़ा शिक्षक वासिम सर क्रीड़ा शिक्षिका प्रेरणा मॅडम आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेचे अध्यक्ष डॉ हाजी हारून सेठ म्हणाले, मुलांना लहान वयापासून योगाची आवड निर्माण व्हावी, यासाठी त्यांचे आरोग्य निरोही रहावे. त्याचबरोबर अभ्यासातही विद्यार्थी पुढे रहावेत, या उद्देशाने डायमंड स्कूल स्कूल येथे रोज सकाळी २० ते २५ मिनिटे विद्यार्थ्यांना योग शिकवण्यास सुरुवात करण्याचे प्रयत्न करणार. डायमंड स्कूल मध्ये मैदानी खेळाची तयारी करून घेतली जाते. तसेच रोज सकाळी योगामुळे शरीराला होणारे फायदे रोज शरीराला एक नवीन ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन डॉ हाजी हारून सेठ यांनी केले.

# मुसळधार पावसात भिंत पडल्याने खा.स्मिता वाघांनी केली पाहणी

**अमळनेर । प्रतिनिधी –**

दि. १८ रोजी रात्री झालेल्या मुसळधार पावसात भागवत रोडवरील रसमंजू कॉम्प्लेक्स मधील भिंत अचानक पडल्याने संपुर्ण कॉम्प्लेक्समध्ये पाणी शिरून यात बेसमेंट मधील व्यावसायिकांचे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान झाले होते.यासंदर्भात खासदार स्मिताताई वाघ यांनी पाहणी करून पुन्हा असा प्रकार घडू नये यासाठी पालिकेच्या मुख्याधिकारी यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. सदर कॉम्प्लेक्सच्या शेजारी असलेली गटार तुंबत असल्याने पाण्याचा निचरा होण्यास जागा मिळत नाही यामुळे जोरदार झालेल्या पावसाचे पाणी कॉम्प्लेक्सच्या संरक्षण भिंतीत मुरल्याने भली मोठी भिंत कोसळून संपूर्ण पाणी कॉम्प्लेक्सच्या बेसमेंट शिरले व तेथील सारी दुकाने जलमय होऊन व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले ही बाब दुकानदारांनी स्मिता वाघांच्या निदर्शनास आणून दिल्याने त्यांनी तातडीने पालिकेच्या मुख्याधिकारी तुषार नेरकर सदर गटार मोठी करून त्यात मोठा पाईप टाकण्याच्या सूचना केल्या. श्री नेरकर यांनी देखील लागलीच काम सुरू करण्याची ग्वाही खासदारांना दिली. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने सेवा देत रात्री साडे तीन वाजेपर्यंत पंप लावून पाणी काढल्याने स्मिता वाघांनी पालिका कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.व ज्या व्यावसायिकांचे यात मोठे नुकसान झाले त्यांना धीर दिला. यावेळी पाटील ॲग्रो चे प्रशांत पाटील, धवल ऑटो चे धवल शाह, जमिनी टेलर्स चे गुलाबराव पाटील, धनश्री सेल्स चे भरत जावदेकर,अक्षरा प्लायवूड चे रुपेश कोतवाल, हिंगलाज मसाज थेरपी सेंटरचे विजयकुमार ढवळे, बालाजी इलेक्ट्रिक चे धनराज बडगुजर यासह इतर व्यावसायिक उपस्थित होते.



**तहसिलदार धरणगांव यांचे कार्यालय**

क्र./कु.का/एसआर/०२/२०२४ दि.१८/०६/२०२४

**जाहीर नोटिस**

**महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कमल ३२ ग अन्वये**

**अर्जदार/वादी : १) सुधाकर गरबड पाटील,**
**रा. लाडली, ता.धरणगांव, जि. जळगांव**

**विरूध्द**

**सामनेवाला/प्रतिवादी : १) रामदास नानाभाई मेहता**
**रा. लाडली, ता. धरणगांव, जि.जळगांव**

या जाहिर नोटिशीव्दारे तुम्हांस कळविण्यात येते की, अर्जदार/वादी यांनी मौजे लाडली, ता.धरणगांव, जि.जळगांव येथील गट नं. ६३ क्षेत्र ० हे.८४ आर + पो.ख. क्षेत्र ० हे. ११ आर = एकूण क्षेत्र ० हे. ९५ आर, आकार रू.२.२५ पैसे या गटासंदर्भात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाचे १९४८ चे कलम ३२ ग अन्वये इकडील कार्यालयात अर्ज केलेला आहे. (यापुढे सदर प्रकरण संबोधले जाईल).

वादी/अर्जदार यांच्या माहितीप्रमाणे सामनेवाला / प्रतिवादी तपास लागत नसल्या कारणाने सदर जाहिर नोटिस वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात कोर्टास विनंती केली आहे. तरी सामनेवाला नं. १ १) रामदास नानाभाई मेहता यांना स्वतः व त्यांचे वारसांना या जाहिरनोटिशीव्दारे सूचित करण्यात येते की, सदर प्रकरणी खालीलप्रमाणे सुनावणी घेणेचे निश्चित केलेले आहे.

तरी सदर प्रकरणाच्या चौकशीकामी तहसिल कार्यालय, धरणगांव येथे दिनांक ०६/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवली आहे. तरी सदर दिवशी व वेळी आवश्यक ती कागदपत्रे व पुराव्यासह आपण बिनचूक हजर राहावे. सदर दिवशी हजर न राहिल्यास तुमचे काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरून निकाल केला जाईल.

सदर जाहीर नोटिस आज तारिख १८/०६/२०२४ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.

शिक्का

सही
तहसिलदार धरणगाव



## बालकवी विद्यालयात योग दिवस साजरा

**धरणगाव । प्रतिनिधी –**

येथील सारजाई दामोदर कुडे व बालकवी ठोंबरे विद्यालयात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील उपशिक्षक आर. डी. महाजन यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना योग दिवसाचे महत्त्व सांगितले. या प्रसंगी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी योग दिवसात सहभाग नोंदवला.एकूण सहभागी संख्या-३२४ इतकी होती. याप्रसंगी मुख्याध्यापक एस. एस. पाटील, मुख्याध्यापक जीवन पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक एस. एल. सूर्यवंशी तर कार्यक्रमाचे आभार क्रीडाशिक्षक कैलास माळी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

## नीट परीक्षेत घोळ करणाऱ्या दोषींवर कारवाईची युवक कॉंग्रेस व एनएसयूआयची मागणी

**चोपडा । प्रतिनिधी –**

नीट परीक्षेच्या निकालात उघड झालेला गैरप्रकार आणि युजीसी नीट पेपर फुटी प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करा या मागणीसाठी कॉंग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. संदीप सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोपडा तालुका युवक कॉंग्रेस व एनएसयुआयच्या वतीने निवासी नायब तहसीलदार सचिन बांबळे यांना निवेदन देण्यात आले.



नीट परीक्षेचा निकाल दि.१४ जून २०२४ रोजी जाहीर होणार होता परंतु परीक्षा घेणाऱ्या छढ संस्थेने कोणतीही पूर्व सुचना न देता दि.४ जून रोजी नीट परीक्षेचा निकाल जाहीर केला.देशातील २४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी छएएढ परीक्षेत भाग घेतला होता.

एकाच परीक्षा केंद्रातील सहा विद्यार्थी सर्वाधिक गुण मिळवून अव्वल तर बऱ्याच विद्यार्थ्यांना ग्रेस मार्क दिले आहेत जे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही,त्याच प्रमाणे युजीसी नीट परीक्षेत सुद्धा पेपरफुटी झालेली असून ती परीक्षा सरकारने रद्द केली आहे. याचा अर्थ सातत्याने होणाऱ्या पेपरफुटीवर नियंत्रण आणणे केंद्र सरकारला शक्य नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला जात आहे.

नीट व युजीसी नीट परीक्षेत झालेल्या घोळ संदर्भात देशातील विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे. आश्चर्यकारक बाब म्हणजे एवढ्या गंभीर विषयावर मात्र केंद्र सरकार मौन बाळगून असून, युवक कॉंग्रेस व एनएसयूआय संघटनेनेतर्फे तीव्र विरोध असून, नीट व युजीसी नीट परीक्षेतील गैरकारभारामुळे देशातील विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात पुनरावृत्ती टाळता येऊ शकते अशी मागणी एनएसयुआयचे प्रदेश सचिव चेतन बाविस्कर, कार्याध्यक्ष कुणाल पारधी, रोहित शिंदे, गणेश कोळी, गणेश बेलदार, द्रवेश सोलकर आदी कार्यकर्त्यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## प्रागतिक समविचारी संघटनेची उद्या अमळनेर येथे बैठक

**अमळनेर। प्रतिनिधी –**

नुकत्याच झालेली लोकसभा निवडणुक आणि पुढे येवु घातलेल्या महाराष्ट्र विधान सभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समविचारी संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्तेयांच्या विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी,भविष्यात एकजूटीने कामकरण्यासाठी ागतिक समविचारी संघटना- संस्था समन्वय मंच (सिव्हील सोसायटी) उत्तर महाराष्ट्रस्तरीय बैठक रविवारी, दि. २३ जुन २०२४ रोजी सकाळी १० वाजेपासून साने गुरुजी विद्यालय, धुळे रस्ता, अमळनेर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. उपस्थितीचे आवाहन संदिप घोरपडे आणि अविनाश पाटील यांनी केली आहे.

# जेथे पाऊस तेथील मैदानी चाचणी पुढे ढकलली!

## पोलीस भरतीसंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची महत्त्वाची माहिती



**मुंबई । वृत्तसंस्था**

राज्यात १९ जूनपासून सार्वत्रिक पोलीस भरती सुरू झालेली आहे. राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात १७ हजार ४७१ पदांसाठी ही पोलीस भरती प्रकिया पार पडत आहे. या भरती प्रकियेसाठी सध्या उमेदवारांची मैदानी चाचणी सुरू आहे. मात्र, अनेक ठिकाणी पावसामुळे उमेदवारांच्या मैदानी चाचणीला अडचणी येत आहेत. पावसामुळे पोलीस भरतीच्या मैदानी चाचणीसाठी मैदान सुस्थितीत राहत नाही. त्यामुळे त्याचा मैदानी चाचणीवर परिणाम होत असल्याचं काही उमेदवारांचं म्हणण आहे. याबाबत आता राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात महत्वाची माहिती दिली आहे. 'ज्या ठिकाणी पाऊस आहे. असा ठिकाणच्या उमेदवारांच्या मैदानी चाचण्या पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत', अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी माध्यमांशी बोलताना दिली.

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले ?**

राज्यात पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, ज्या ठिकाणी पाऊस आहे. त्या ठिकाणच्या उमेदवारांच्या मैदानी चाचण्या पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. आता यापुढे अजून पाऊस वाढण्याची शक्यता आहे. त्यानंतर विधानसभा निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पोलीस भरतीच्या मैदानी चाचण्या आणखी पुढे गेल्या तर अनेक उमेदवारांसाठी ही शेवटची संधी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम होतो. मात्र, त्या उमेदवाराला ती संधी मिळायला हवी, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज्यात पोलीस भरतीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, ज्या ठिकाणी पावसामुळे व्यत्यय निर्माण झाला असेल त्या ठिकाणच्या पोलीस भरतीच्या मैदानी चाचणी घेण्यासाठी पुढच्या तारखा देण्यात आलेल्या आहेत. मात्र, ज्या जिल्ह्यात पाऊस नाही तेथे भरती प्रक्रिया राबण्यात येत आहे. तसेच जे विद्यार्थी मैदानी चाचणीसाठी येत आहेत, त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात आम्ही सूचना केलेल्या आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# केंद्रीय निवडणूक आयोग विधानसभेच्या तयारीत

## याद्या अद्ययावत करण्याच्या अधिसूचना केल्या जारी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**




लोकसभा निवडणुकीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाकडून विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीर राज्यांच्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. आयोगाने निवडणूक याद्या अद्ययावत करण्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. घरोघरी जाऊन मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्राच्या काही अडचणी असतील, त्या दूर केल्या जाणार आहेत.

आगामी २५ जूनपासून म्हणजेच येत्या चार दिवसांपासून महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड, जम्मू काश्मीर या ठिकाणी निवडणुकीच्या आधीची तयारी सुरु होणार आहे. १८ व्या लोकसभेसाठीची निवडणूक पार पडल्यानंतर आता निवडणूक आयोगाने महाराष्ट्र, झारखंड, हरियाणा या ठिकाणी निवडणूक पूर्वतयारी सुरु केली आहे. हरियाणा विधानसभेचा कार्यकाळ ३ नोव्हेंबर, महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर तर झारखंड विधानसभेचा कार्यकाळ ५ जानेवारी २०२५ ला संपणार आहे. त्यादृष्टीने राज्यांना निवडणुकीच्या तयारीला लागण्यासंबंधी सूचना दिल्या.

### लोकसभेसाठी ६४.२ कोटी लोकांनी मतदान केले

भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत मतदान प्रक्रियेची माहिती दिली. हा एक चमत्कार आहे. जे झाले तो चमत्कार आहे. आपल्यासाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. जगभरात आपण एक विक्रम प्रस्थापित केला आहे. या निवडणुकीत ६४.२ कोटी मतदारांनी मतदान केलं आहे. या निवडणुकीत एकूण ३१.२ कोटी महिलांनी मतदान केले, असे राजीव कुमार यांनी सांगितले.




सिक्कीम : १५ हजार फुटापेक्षा जास्त उंचीवर असणाऱ्या सिक्कीमच्या मुगुथांग सब सेक्टरमध्ये 'आयटीबीपी'च्या जवानांनी १० व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योगासने केली.

# काड्या करणाऱ्यांना चार महिन्यांनी घरी पाठवणार : मनोज जरांगेंचा इशारा

**जालना । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मनोज जरांगेंचं आंदोलन सुरुच आहे. सगे-सोयऱ्यांची अंमलबजावणी झालीच पाहिजे ही त्यांची आग्रही मागणी आहे. त्यासाठी त्यांनी सरकारला १३ जुलैपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे. दुसरीकडे लक्ष्मण हाकेंनी ओबीसी आरक्षणासाठी उपोषण सुरु केले आहे. त्यांना उद्देशूनही मनोज जरांगेंनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे.

**काय म्हणाले मनोज जरांगे ?**

आंतरवली सराटीमध्ये आमचं आंदोलन सुरु आहे. मी रुग्णालयातून चाकरवाडीला जाणार आहे आणि पुन्हा रुग्णालयात येणार आहे. मला इथून कुणीही जायला सांगितलेले नाही. तसेच मी अशा गोष्टी ऐकतही नसतो. असे जरांगे म्हणाले. तसंच लक्ष्मण हाकेंना उद्देशूनही त्यांनी महत्त्वाचे विधान केले.



**लक्ष्मण हाकेंबाबत काय म्हणाले जरांगे ?**

लक्ष्मण हाकेंचं बेमुदत उपोषण सुरु आहे. हाके आंदोलन करत आहेत म्हटल्यावर सरकारी शिष्टमंडळ येणारच. आंदोलन केलं म्हटल्यावर यावंच लागणार. मात्र दोघांचीही सारखीच फजिती होणार आहे लक्षात ठेवा. सरकारने १५ ते २० वर्षे आम्हाला फसवलं आहे. आजपर्यंत आम्हाला पाणी पाजत होते, आता तुम्हाला पाणी पाजतील असा सावधगिरीचा इशारा मनोज जरांगेंनी दिला.

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांची भेट घेण्यासाठी सरकारचं शिष्टमंडळ छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झालं. या शिष्टमंडळात मंत्री उदय सामंत, गिरीश महाजन, अतुल सावे यांचा सहभाग आहे. छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून शिष्टमंडळ जालन्याकडे रवाना झाले. हे शिष्टमंडळ वडीगोद्री येथे जाऊन लक्ष्मण हाके यांची भेट घेणार आहे. या भेटीत काय घडणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मात्र त्याआधीच त्यांना सावध राहण्याचा इशारा मनोज जरांगेंनी दिला.

चार महिन्यांनी काड्या करणाऱ्यांना घरी पाठवणार

आणखी चार महिन्यांनी काड्या करणाऱ्यांना घरी पाठवणार, १०० टक्के घरी पाठवणार. आम्ही आता रडत बसणार नाही. असं म्हणत त्यांनी सरकारलाही इशारा दिला. सगे सोयऱ्यांची अंमलबजावणी करा ही आमची मुख्य मागणी आहे. आम्ही आता आंदोलन करणार नाही येत्या निवडणुकीत २८८ उभे करु किंवा २८८ जणांना पाडू असंही जरांगे म्हणाले.



# भाजपनेच एकनाथ शिंदे यांचा गेम केला - बच्चू कडू

**अमरावती । वृत्तसंस्था**

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक आणि अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बच्चू कडू महायुतीत आहेत. परंतु लोकसभा निवडणुकीत त्यांनी महायुतीच्या विरोधात भूमिका घेतली होती. आता बच्चू कडू यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्ला केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गेम भाजपने केला. अमरावतीत सर्व नवनीत राणा यांच्या विरोधात होते. त्यानंतरही शिवसेनेच्या या जागेवर नवनीत राणा यांना उमेदवारी दिली गेली. शिवसेनेच्या सोबत राहून भाजपने असे करने योग्य नाही. काही प्रमाणात एकनाथ शिंदे यांचा गेम झालाच आहे, असा हल्ला बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांच्यावर केला आहे.

भाजप काहीही करू शकते. उद्या ते एकनाथ शिंदे यांना पण म्हणतील या मतदार संघात उभे राहू नका, त्याऐवजी या मतदारसंघात उभे रहा. त्यांच्याकडे सत्ता आहे तर ते काहीही करतील. अमरावतीत भाजपचे कार्यकर्ते म्हणत होते तरी अमरावतीमध्ये उमेदवार बदलला नाही, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. उमेदवार एकनाथ शिंदे साहेबांचे आणि उमेदवारी द्यायची की नाही हे भाजप ठरवत होते. हा अफलातून कारभार आहे. अजित पवार यांचे उमेदवार देखील भाजपने ठरवले, असे त्यांनी म्हटले.

# पुणे जिल्ह्याकडे पालकमंत्र्यांचे लक्षच नाही -रोहित पवार

**पुणे । वृत्तसंस्था**



पुण्यातील शिवाजीनगर भागातील साखर संकुल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट नियामक मंडळाची बैठक पार पडली. त्या बैठकीला मंत्री दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, राजेश टोपे, रोहित पवार, हर्षवर्धन पाटील यांच्यासह अन्य मंडळी देखील उपस्थित होते.

राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुण्यात कोयता गँगच्या घटना वाढल्या आहेत. त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, राज्यात शांतता राहिली पाहिजे. यासाठी सर्वांनी पुढे येऊन काम करणे गरजेचे आहे. राज्यात सद्य:स्थितीला गुंडागर्दी देखील वाढली आहे. रस्त्यावर मुलींना मारले जात आहे. तर पुण्यात कोयता गँगचे प्रमाण वाढलं असून गुंडांनी धुडगूस घातला आहे. त्यावर पोलीस आयुक्तांचा वचक राहिला नाही. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस कुठे आहेत, असा प्रश्न निर्माण होत आहे, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला. तसेच पुणे शहर आणि जिल्ह्याकडे पालकमंत्री (अजित पवार) यांचे लक्ष नसल्याचे सांगत अजित पवार यांचे नाव न घेता अप्रत्यक्षपणे रोहित पवार यांनी टोला लगावला.

# अभिमान वाटेल असे काम मतदारसंघात करून दाखवू -विवेक कोल्हे

## शिक्षकांचा विश्वास सार्थ ठरवणार, वेळ पडली तर टोकाचीही भूमिका घेऊ

**नाशिक । प्रतिनिधी**



सत्तेसाठी नाही तर शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहोत. या निवडणुकीत आपण शिक्षकांसाठी एक विजन घेऊन सामोरे जाणार असून शिक्षकांनी आपल्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवून त्यांना अभिमान वाटेल असे काम करून दाखवू असे प्रतिपादन विवेक कोल्हे यांनी केले आहे.

यावेळी बोलताना कोल्हे म्हणाले की, कार्यकर्ते व शिक्षकांच्या आग्रहास्तव आपण नाशिक शिक्षक मतदार संघाची निवडणूक लढवत असून या निवडणुकीकडे आपण एक संधी म्हणून बघतो. यामुळे मला शिक्षकांचे प्रश्न शासन दरबारी पाठपुरावा करून सोडवता येणार आहे. अहमदनगर, धुळे ,नंदुरबार, जळगाव, नाशिक या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या विस्तीर्ण नाशिक मतदारसंघात अनेक समस्या प्रलंबित आहे. त्या आपण प्राधान्याने सोडवणार आहोत. केवळ निवडणुकीपुरते शिक्षकांकडे न जाता त्यांच्यासाठी आपण एक विकासात्मक दृष्टिकोन घेऊन जाणार आहोत.

आजवर या मतदारसंघात शिक्षकांची सातत्याने फसवणूक झाली आहे. केवळ निवडणुकीपुरते शिक्षक यांना विचारात घेतले जाते. वास्तविक पाहता शिक्षक हे समाजातील मोलाचे घटक असून त्यांच्या समस्या सोडवणे हे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. मात्र दुर्दैवाने असे न घडता त्यांच्याकडूनच चुकीच्या गोष्टी सुरू आहे हे या मतदारसंघासाठी घातक व अशोभनीय असेच आहे.

# कमिन्सची हॅट्ट्रिक

**न्यूयॉर्क । वृत्तसंस्था**



सुपर-८ मध्ये विजयी सलामी देण्यात बलाढ्य ऑस्ट्रेलियाला यश आले. प्रथम गोलंदाजीत मग फलंदाजीत आणि पावसाने केलेल्या मदतीमुळे कांगारूंचा विजय सोपा झाला. पॅट कमिन्सने हॅटट्रिक घेत ऐतिहासिक कामगिरी केली. २००७ मध्ये ब्रेट लीने ट्वेंटी-२० विश्वचषकात हॅटट्रिक घेण्याची किमया साधली होती. त्यानंतर विश्वचषकात हॅटट्रिक घेणारा कमिन्स दुसरा ऑस्ट्रेलियन गोलंदाज ठरला आहे. मात्र, सामन्यानंतर त्याच्या हॅटट्रिकबद्दल बोलताना कमिन्सने भन्नाट प्रतिक्रिया दिली. हॅटट्रिकबद्दल कोणतीही कल्पना नसल्याचे त्याने सांगितले. बांगलादेशने दिलेल्या १४१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी स्फोटक खेळी केली. पण, पावसाच्या व्यत्ययामुळे दोनवेळा सामना थांबवावा लागला. ६.२ षटकांनंतर पावसामुळे खेळ थांबला. पावसानंतर पुन्हा सामना सुरू होताच ऑस्ट्रेलियाला पहिला झटका बसला.




## विधीलिखित

सुरेशराव बोरकर,
ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर.
मो. : ९८५००१५५५८

शनिवार, दि. २२ जून २०२४

*-*-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-*-*

**मेष** – भाग्यकारक गोष्टी आज घडतील.
**वृषभ** – आरोग्याकडे लक्ष द्यावे लागणार आहे.
**मिथुन** – विवाहितांना तिर्थाटनाचा लाभ होईल.
**कर्क** – आज प्रथम विचार नंतर कार्य करावे.
**सिंह** – विद्यार्थीवर्गास अपेक्षेपेक्षा अधिक यश प्राप्ती.
**कन्या** – मातृ कार्यातून भाग्याचा लाभ मिळेल.
**तूळ** – नौकरी इच्छुकांना नोकरीचा लाभ मिळेल.
**वृश्चिक** – आर्थिक प्रगती होईल.
**धनू** – मनाला हुरहुर लागणार आहे.
**मकर** – मनात नको त्या शंका येतील.
**कुंभ** – नशिबाची साथ सोबत, आशीर्वादाची गरज.
**मीन** – वडिल-आई सोबत म्हणजे भाग्य सोबत.

# संभाजीनगरचे पालकमंत्रीपद मिळण्यासाठी भाजपची शिंदे गटावर कुरघोडी




**संभाजीनगर । वृत्तसंस्था**

महायुतीचे एकमेव खासदार म्हणून मराठवाड्यातून निवडून आलेले संदीपान भुमरे यांच्याकडील पालकमंत्री पदावर आता भाजपने दावा केला आहे. ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्याकडे हे पद दिले जावे असा दावा भाजपच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. रोजगार हमी मंत्री पदी असणाऱ्या संदीपान भुमरे यांचे मंत्रीपद औरंगाबाद पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय शिरसाठ यांना मिळावे यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. मंत्रिमंडळाचा विस्तार झालाच तर पुढील दोन महिन्यासाठी कामकाज पुढे नेण्यासाठी रिकाम्या खुर्च्यांवर रुमाल टाकला जात आहे.

मराठवाड्यातील सात जागांवर 'मराठा आरक्षणा'मुळे निर्माण झालेल्या रोषाचा फटका भाजपला बसला. मात्र, अशा स्थितीमध्येही शिवसेनेच्या संदीपान भुमरे निवडून आले. त्यांच्या विजयानंतर औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघातील आघाडीवरुन अतुल सावे यांना विधानसभा निवडणुकीमध्ये फटका बसू शकेल अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे येत्या काही महिन्यात शहरातील तिन्ही मतदारसंघावर अधिक लक्ष केंद्रीत करण्यासाठी त्यांच्याकडे पालकमंत्री पद देण्याची मागणी करण्यात आली आहे.

शिवसेनेचे प्रवक्ते म्हणून माध्यमांमध्ये चर्चेत असणारे संजय शिरसाठ यांना आता मंत्री पद मिळावे अशी मागणी केली जाऊ लागली आहे. मंत्री भुमरे यांच्याऐवजी शिवसेनेतून शिरसाठ यांना हे पद देण्यात येईल असे मानले जात आहे. मंत्रिमंडळ विस्तारात आपलाही नंबर लागू शकतो, असे शिंदे समर्थक आमदारांना वाटू लागले आहे.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता सकाळ मीडिया प्रा.लि., प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करुन देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने***. **फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)

cmyk